माझ्या स्वप्नांचा भारत

- मोहनदास करमचंद गांधी

माझ्या स्वप्नांचा भारत

गांधीजी

माझ्या स्वप्नांचा भारत

(संक्षिप्त)

महात्मा गांधी

२०१२

परंधाम प्रकाशन, पवनार (वर्धा)

प्रकाशकीय

महात्माजींचे हे संक्षिप्त पुस्तक 'गांधी : १२५' च्या निमित्ताने 'नवजीवन'च्या सौजन्यामुळे आम्ही प्रथम प्रकाशित करू शकलो.

'मेरे सपनों का भारत' या हिंदी पुस्तकाच्या आधाराने मराठीचे प्रसिद्ध लेखक श्री. माधवराव कानेटकर यांनी आमच्या विनंतीवरून हा भावानुवाद तयार केला. अनेक विषयांवर गांधीजींनी वेळोवेळी जे विचार प्रकट केले ते सुसंगत रूपात या पुस्तकात संकलित करण्यात आलेले आहेत. नवीन आवृत्तीत या अनुवादाचे आवश्यक संपादन करण्यात आले आहे. पुनरावृत्ती टाळली आहे. परंतु त्यामुळे प्रवाहात खंड पडणार नाही. हे पुस्तक वाचल्यानंतर ज्यांना गांधीजींचे हद्‌गत विस्ताराने समजून घेण्याची इच्छा होईल, त्यांनी नवजीवन तर्फे प्रकाशित झालेले मूळचे मोठे पुस्तक वाचावे.

महात्माजींनी आपल्या या भारताकडून विविध क्षेत्रांत कोणकोणत्या प्रकारच्या पुरुषार्थाची अपेक्षा केली होती ते हे पुस्तक वाचल्यावर कळेल, आणि आज आपण कुठे आहोत तेही लक्षात येईल. वाचकांना त्यातून प्रेरणा मिळावी.

– प्रकाशक

नवजीवन ट्रस्ट, अमदाबादच्या सौजन्याने

मूल्य २५ रुपये

आवृत्ती आठवी : प्रती ३००० : ऑक्टोबर २०१२

मुखपृष्ठ : प्रवीण बिसने

प्रकाशक – करुणा फुटाणे, परंधाम प्रकाशन, पवनार (जि. वर्धा) – ४४२१११

मुद्रक – रणजित् देसाई, परंधाम मुद्रणालय, पवनार (जि. वर्धा) – ४४२१११

अनुक्रमणिका

गांधीजींचे अखेरचे इच्छापत्र ---------- ४
१. भारताचा संदेश ---------- ५
२. स्वराज्याचा अर्थ ---------- ९
३. खरे स्वातंत्र्य ---------- १३
४. ग्रामस्वराज्य ---------- १९
५. उद्योगवादाचा अभिशाप ---------- २४
६. निढळाच्या घामाची भाकरी ---------- २९
७. परिग्रह संस्कारिता नव्हे, चोरी होय ---------- ३२
८. सर्वकल्याणकारी जीवनपद्धती ---------- ३४
९. समाजवाद, साम्यवाद आणि सर्वोदय ---------- ३८
१०. अहिंसक जीवनाची योजना ---------- ४३
११. शिक्षण ---------- ५५
१२. शिक्षणाचे माध्यम ---------- ६२
१३. राष्ट्रभाषा आणि लिपी ---------- ६८
१४. संतति-नियमन ---------- ७३
१५. नशाबाजी आणि स्पृश्यास्पृश्यता ---------- ७७
१६. वर्णाश्रम आणि जातिव्यवस्था ---------- ८१
१७. स्त्री-शक्ती ---------- ८३
१८. मजुरांनी काय करावे? ---------- ८६
१९. शांतिसेना ---------- ९२
२०. सत्याग्रह ---------- ९५
२१. युवक हे आह्वान स्वीकारतील काय? ---------- १०१
२२. स्वतंत्र भारताचे ध्येय ---------- १०६

गांधीजींचे अखेरचे इच्छापत्र

देशाचे विभाजन झाले असले तरी, काँग्रेसप्रणीत साधनांमुळे हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळाल्यामुळे आजच्या स्वरूपातल्या काँग्रेसचे काम आता संपले आहे. म्हणजे प्रचार व तद्द्वारा निवडणुकी लढविण्याचे साधन म्हणून तिची उपयुक्तता आता संपुष्टात आली आहे. शहरे आणि गावे यांहून अगदी निराळी अशी जी सात लाख खेडी आहेत त्यांच्या दृष्टीने भारताचे सामाजिक, नैतिक आणि आर्थिक स्वातंत्र्य अजून साध्य व्हायचे बाकी आहे. हिंदुस्थानची लोकशाहीकडे प्रगती होत असताना सैनिक सत्तेवर नागरिक सत्तेचे प्रभुत्व स्थापित होण्यासाठी लढाई अनिवार्य आहे. राजकीय पक्ष अथवा सांप्रदायिक संघटनांशी घाणेरडी स्पर्धा करण्यापासून काँग्रेसला आपण वाचवले पाहिजे. या व अशाच इतर कारणांमुळे अखिल भारतीय काँग्रेस कमिटीने पुढे दिलेल्या नियमांन्वये आपल्या आजच्या स्वरूपाचे विसर्जन करून लोकसेवक संघाच्या स्वरूपात प्रकट होण्याचा निश्चय करावा. आवश्यकते-नुसार सदर नियमांत फेरफार करण्याचा संघाला अधिकार राहील.

ग्रामीण अथवा ग्राम-मनोवृत्तीच्या पाच वयस्क स्त्री-पुरुषांची बनलेली पंचायत हे एकक (युनिट) राहील.

एकमेकांजवळच्या अशा दोन पंचायतींनी आपल्यांतील एकाला नेता निवडून त्याच्या सल्ल्याने काम करणारा आपला गट बनवावा.

अशा शंभर पंचायती झाल्या म्हणजे त्यांच्या पन्नास प्रमुखांनी आपसांतून एक प्रमुख निवडावा. अशा प्रकारे खालच्या स्तरातील नेत्यांनी वरच्या थरातील नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली काम करावे. संपूर्ण देश व्यापला जाईतो दोनदोनशे पंचायतींचे असे गट बनविण्याचे काम सुरू ठेवावे. या गटांनी पुन्हा आपल्यातून एक नेता निवडावा. या नेत्यांनी एकत्र येऊन सर्व मिळून अखिल भारताचे संचालन करावे आणि आपापल्या प्रदेशात स्वतंत्रपणे काम करावे. या वरच्या थरांनीही आवश्यकते- नुसार आपल्यातून एक प्रमुख निवडावा व निवडून आलेल्या प्रमुखाने निवडणाऱ्यांची इच्छा असेपर्यंत सर्व गटांची सेवा करावी.

२९ जानेवारी १९४८ **– मो. क. गांधी**

१. भारताचा संदेश

निव्वळ माझा म्हणून नव्हे, तर त्यात मला उत्तमोत्तमाचे दर्शन घडले म्हणून सर्व जगात भारत हा माझा सर्वाधिक प्रिय देश आहे. सर्वोच्च आकांक्षा ठेवणाऱ्या व्यक्तीला स्वत:च्या विकासाकरिता जे जे म्हणून हवे ते सर्व भारतात उपलब्ध आहे.

मूलत: भारत ही भोगभूमी नसून कर्मभूमी आहे.

आपल्या अधिकांश प्राचीन संस्था ज्या मोजक्या देशांनी आजही कायम ठेवल्या आहेत त्यांपैकी भारत एक आहे – मग त्यांच्यावर अंधविश्वास व भ्रमाची धूळ का बसलेली असेना. हे भ्रमपटल निवारण्याची, अंध-विश्वास दूर करण्याची, आणि अशा प्रकारे आपले शुद्ध स्वरूप पुन: प्रकट करण्याची क्षमताही भारतात आहे.

मला जे काही प्राप्त आहे ते सर्व मला भारताने दिले आहे, म्हणून मी त्याला भजतो. साऱ्या दुनियेला देण्याजोगा त्याच्याजंवळ संदेश आहे असा माझा दृढ विश्वास आहे. त्याला युरोपचे अंधानुकरण करण्याची मुळीच गरज नाही.

इतर देशांहून भारताचे ध्येय काहीसे निराळे आहे. धर्मक्षेत्रात भारत सर्वांपेक्षा मोठा ठरू शकेल अशी त्याची पात्रता आहे. भारताने स्वयंप्रेरणेने आत्मशुद्ध्यर्थ जसा प्रयत्न केला तसे दुसरे उदाहरण जगाच्या इतिहासात उपलब्ध नाही. त्याला पोलादी हत्यारांची गरज नाही. तो नेहमी दैवी संपत्तीच्या सहाय्यानेच लढत आला; आजही लढू शकतो. दुसरे देश पशुबलाचे पुजारी आहेत. त्या सर्वांवर आत्मबलाच्या सहाय्याने भारत विजय मिळवू शकतो. पशुबल हे आत्मबलाच्या पासंगासही लागत नाही याची असंख्य उदाहरणे जगाच्या इतिहासात उपलब्ध आहेत.

अहिंसेच्या सहाय्याने भारताने संपूर्ण जगाच्या वतीने शांतिदूताचे काम केलेले मला अतिशय आवडेल --- ज्या रक्तरंजित मार्गावर चालून पाश्चिमात्य थकले त्या मार्गावर भारताला स्वत:चे भवितव्य आढळणार नाही. सरळ धर्मप्रधान, अहिंसात्मक जीवनाद्वारा प्राप्त होणाऱ्या शांतिप्रधान जीवनातच त्याचे भविष्य साठलेले आहे. आज भारत स्वत:चा आत्मा गमावून बसतो की काय असे भय निर्माण झाले आहे, आणि आत्मा गमावून बसलेला भारत जगू शकेल हे सर्वथा अशक्य आहे. अतएव एखाद्या आळशी आणि हतबल व्यक्तीप्रमाणे त्याने असे म्हणू नये की पश्चिमेकडून येणाऱ्या लाटेपासून त्याला आत्मरक्षण करता येणार नाही. आपल्या आणि जगाच्या अंतिम कल्याणार्थ या लाटेला थोपविण्याचे सामर्थ्य त्याला अंगी बाणवावेच लागेल. स्वतंत्र आणि शक्तिशाली झालेला भारत पाहण्याची माझी आकांक्षा आहे, कारण अवश्य तर

जगाच्या कल्याणार्थ त्याला आत्माहुती देता आली पाहिजे असे मला वाटते.

आम्ही ज्याचे अनुकरण करावे आणि स्वत:च्या पदरी लाभ पाडून घ्यावा असे आम्हाला देण्यासारखे पाश्चिमात्यांजवळ पुष्कळच आहे हे मी नम्रपणे कबूल करतो. ज्ञान हे कोणा एका जातीच्या अथवा देशाच्या एकट्याच्या मालकीचे असू शकत नाही. पण आमच्याकडील अनेकांना वाटते की आपण डोळे मिटून पाश्चिमात्यांची फक्त नक्कल करावी, कारण त्यापेक्षा आपली अधिक पात्रता नाही. माझा संपूर्ण विरोध फक्त या विचार-विवेकशून्य वृत्तीला आहे. भारताने आवश्यकतेनुसार तितिक्षा आणि तपस्या यांचे अग्निदिव्य करून स्वत:च्या संस्कृतीचे – जी अपूर्ण असूनही आजतागायत कालौघाच्या लाटांना न जुमानता टिकून आहे – कोणत्याही दिशेकडून होणाऱ्या अनुचित आक्रमणापासून रक्षण केले तर जागतिक शांती आणि प्रगती या बाबतीत भारत स्थायी योगदान करू शकेल असा माझा दृढ विश्वास आहे.

युरोपियन संस्कृती तेथील लोकांना अनुकूल असेल, पण तिची सही सही नक्कल करून आम्ही फक्त आत्मनाशाला आमंत्रण देऊ. याचा असाही अर्थ नव्हे की तिच्यातील जे हितावह आणि आम्हाला पचण्यासारखे असेल त्याचाही आम्ही स्वीकार करू नये. तिच्यात जे दोष शिरले असतील ते त्यांनाही अवश्यमेव दूर करावेच लागतील.

शारीरिक सुखसाधनांचा शोध आणि त्यांच्यात होणारी बेसुमार वाढ हा असाच एक दोष आहे. या ज्या सुखसाधनांचे ते गुलाम बनत जात आहेत त्या साधनांच्या बोज्याखाली आपण चिरडून जाऊ नये असे जर त्यांना वाटत असेल तर त्यांना स्वत:चा दृष्टिकोण बदलावाच लागेल, असे म्हणण्याचे मी धार्ष्ट्य करतो. कदाचित् हा माझा निष्कर्ष चूकही असेल, पण हे तर निश्चितच आहे की भारताने जर पाश्चिमात्य मायेच्या कांचनमृगाचा पाठलाग केला तर आत्मनाशच पदरी पडेल. एका पाश्चिमात्य तत्त्वचिंतकानेच 'साधी राहणी आणि उच्च विचारसरणी'चा जो उद्घोष केला तो आम्ही आपल्या हृदयपटलावर कोरून ठेवावयास हवा. आज हे स्पष्ट आहे की आमच्या कोट्यवधी बांधवांना सुखसाधनांनी समृद्ध जीवन जगणे अशक्य आहे. आणि आम्ही जे मूठभर लोक सामान्य जनतेसाठी विचार करण्याचा दावा करतो, ते उच्च राहणीचा निरर्थक पाठलाग करून उच्च विचारसरणी गमावून बसण्याचा धोका पत्करत आहोत.

मी भारतासमोर आत्मत्यागाचा जुना आदर्श मांडण्याचे धार्ष्ट्य केले आहे. सत्याग्रह आणि त्याची उपांगे – असहकार आणि सविनय कायदेभंग – ही तपस्येचीच पर्यायवाचक नावे आहेत. हिंसामय जगतात ज्यांनी अहिंसेचा नियम शोधून काढला ते

ऋषी न्यूटनपेक्षाही अधिक मोठे संशोधक होते. वेलिंग्टनपेक्षा ते अधिक श्रेष्ठ योद्धे होते. त्यांना शस्त्रास्त्रांचा उपयोग माहीत होता, पण त्याचे विफलत्वही त्यांनी ओळखले होते. म्हणून त्यांनी हिंसाचाराला विटलेल्या जगाला शिकविले की त्याच्या मुक्ततेचा मार्ग हिंसेऐवजी अहिंसेत आहे. उघड्या डोळ्यांनी स्वेच्छापूर्वक कष्ट सहन करणे हे अहिंसेचे क्रियात्मक स्वरूप आहे. जुलूम करणाराला भिऊन त्याच्यापुढे गुडघे टेकणे असा ह्याचा अर्थ नाही. जुलूम करणाऱ्याच्या इच्छेचा विरोध करण्यात संपूर्ण आत्मिक बल पणाला लावणे असा त्याचा अर्थ आहे. या नियमानुसार चालल्यास एखादी एकाकी व्यक्तीसुद्धा एखाद्या शक्तिशाली साम्राज्याला स्वाभिमान, धर्म आणि आत्म्याच्या रक्षणार्थ आव्हान देऊ शकते आणि त्यायोगे ते साम्राज्य सुधारण्याचा अथवा नष्ट करण्याचा आरंभ करू शकते. भारत बलहीन आहे, म्हणून त्याने अहिंसेचा स्वीकार करावा असा माझा आशय नसून मला त्याच्या शूरत्वाबद्दल अभिमान असल्यामुळे त्याने अहिंसेचा अवलंब करावा अशी माझी इच्छा आहे. स्वत:ची शक्ती ओळखण्याकरिता त्याला शस्त्रास्त्रांच्या शिक्षणाची गरज नाही. आम्ही स्वत:ला निव्वळ शरीर मानतो म्हणून आम्हाला शस्त्रास्त्रांची गरज वाटते; परंतु आपण शरीरे नसून आत्मा आहोत, जो अमर आहे. तो सर्व प्रकारच्या शारीरिक दुर्बलतेला ओलांडून जगातील शारीरिक बलाच्या संपूर्ण बेरजेला आव्हान देऊ शकतो. हे भारताने ओळखावे अशी माझी इच्छा आहे.

हिंदू, मुसलमान, शीख, गुरखा इत्यादी सैनिक जमातींच्या वैयक्तिक शौर्यावरून हे स्पष्ट आहे की भारत भीरूंचा देश नाही. माझे म्हणणे आहे की भारताला युद्ध व रक्तपात प्रिय नाही. कोणी सांगावे, भविष्यकाळात जागतिक विकासाच्या दृष्टीने भारताला फार महत्त्वाची कामगिरी करावी लागेल. हे भवितव्य भावी काळच स्पष्ट करील.

भारताने कधीही एखाद्या राष्ट्राविरुद्ध युद्ध चालविले नाही. परकी आक्रमणापासून केवळ आत्मरक्षणाकरिता बरेच वेळा अर्धवट अथवा अयशस्वी संघटन केले हे अर्थातच खरे आहे. त्यामुळे त्याला शांततेची आकांक्षा निर्माण करण्याकरिता विशेष खटपटीची गरज नाही. ती त्याच्या रक्तातच आहे, मग या गोष्टीची जाणीव त्याला असो वा नसो. शांततेकरिता त्याने शांतिमय साधनांनीच स्वत:चे शोषण थांबवावयास हवे. म्हणजेच त्याने शांतिमय मार्गानेच स्वराज्य मिळवावयास हवे. यात जर तो यशस्वी झाला तर विश्वशांती प्रस्थापित करण्यात इतर कोणत्याही देशापेक्षा त्याचे सर्वाधिक आणि अनमोल सहाय्य होईल.

अनेक शंकाग्रस्त लोकांनी मला म्हटले आहे : ''पण तुम्ही जनतेला अहिंसा शिकवू शकणार नाही. अहिंसेचे पालन फक्त मोजके विरळ लोकच व्यक्तिश: करू

शकतील.'' माझ्या मते हा मोठा गैरसमज आहे. अहिंसा हा जर मानवाचा स्थायीभाव नसता तर त्याने केव्हाच आपल्या हातांनी आत्मनाश करून घेतला असता. परंतु हिंसा-अहिंसेच्या संघर्षात नेहमी अहिंसेचाच विजय झाला आहे. खरे तर असे आहे की राजनैतिक उद्देशांच्या प्राप्तीस्तव अहिंसेचे व्यापक शिक्षण देण्याचा आम्ही धीराने मन:पूर्वक प्रयत्नच केलेला नाही.

गरीबातल्या गरीबालासुद्धा आपला वाटावा, आणि ज्याच्या निर्मितीत त्याच्या मताला महत्त्व राहील असा भारत निर्माण करण्याचा मी प्रयत्न करीन. मी असा भारत निर्माण करण्याचा प्रयत्न करीन की जेथे उच्च आणि नीच असा वर्गभेद राहणार नाही व जेथे निरनिराळ्या पंथांमध्ये पूर्णपणे सामंजस्य राहील. अशा प्रकारच्या भारतात अस्पृश्यता किंवा दारू आणि इतर नशेच्या वस्तूंना स्थान राहणार नाही. त्यात स्त्री-पुरुषांना समान हक्क राहतील. संपूर्ण जगाशी आमचा संबंध शांततामय असेल, म्हणजेच आम्ही कोणाचे शोषण करणार नाही, तसेच कोणाकडून शोषण होऊही देणार नाही. म्हणून आमची सेना लघुतम राहील. ज्या हितसंबंधांचा कोट्यवधी मूक जनतेच्या हितसंबंधांशी विरोध नसेल अशा हितसंबंधांचा, मग ते देशी असोत किंवा विदेशी असोत, पूर्णपणे आदर केला जाईल. मी स्वत:पुरते तर असेही म्हणू शकतो की मला देशी व विदेशी ह्यांमध्ये फरक करण्याचा तिटकारा आहे. हा माझ्या स्वप्नसृष्टी-तील भारत आहे. ह्यापेक्षा कोणत्याही वेगळ्या व्यवस्थेपासून मला आनंद होणार नाही.

जर माझ्या जिवंतपणी भारताने हिंसेचा धर्म म्हणून स्वीकार केला तर मला भारतात राहणे आवडणार नाही. त्या वेळी भारताबद्दल मला अभिमान वाटणार नाही. माझे देशप्रेम माझ्या धर्माद्वारा नियंत्रित आहे. मला असे वाटते की भारत माझे आध्यात्मिक दृष्ट्या पोषण करतो, म्हणून एखादे लहान मूल ज्याप्रमाणे आपल्या आईच्या छातीशी बिलगून राहते त्याप्रमाणे मी भारताशी संबंधित आहे. त्याच्या वातावरणापासून मला माझ्या उच्चोच्च आकांक्षांना साद मिळते. कोणत्याही कारणामुळे जर माझा हा विश्वास ढळला किंवा नष्ट झाला तर माझी परिस्थिती, ज्या बालकाने पालक मिळविण्याची आशा टाकून दिली आहे अशा, अनाथ बालकासारखी होईल.

जर भारत तलवारीचा अवलंब करील तर क्षणैक विजय मिळवू शकेल. परंतु असा भारत माझ्या अभिमानाचा विषय राहणार नाही. भारताने तलवारीचा स्वीकार करण्याचा क्षण माझ्या कसोटीचा ठरेल. त्या परीक्षेत मी पूर्णपणे उतरेन अशी मला आशा आहे. माझा धर्म भौगोलिक सीमांनी मर्यादित नाही. माझा धर्मावर जर जिवंत विश्वास असेल तर तो माझ्या देशप्रेमाचे देखील अतिक्रमण करील.

२. स्वराज्याचा अर्थ

स्वराज्य हा एक पवित्र वैदिक शब्द असून आत्मशासन व आत्मसंयम असा त्याचा अर्थ आहे. सर्व प्रकारच्या मर्यादांपासून मुक्त व निरंकुश असे शासन हा 'इंडिपेंडंस' ह्या इंग्रजी शब्दाचा जो आशय आहे, तसा 'स्वराज्य' शब्दाचा नाही.

स्वराज्याचा माझा अर्थ, लोकमतानुसार होणारे भारताचे शासन हा आहे. लोकमताचा कौल अधिकाधिक मतसंख्येच्या माध्यमाने व्हावा. त्यात देशातील स्त्री आणि पुरुष, त्याचप्रमाणे येथे कायम वस्ती केलेल्या परकीयांचाही समावेश असेल. ज्यांनी शारीरिक श्रमाद्वारे राज्याची सेवा केली असेल व मतदारांच्या यादीमध्ये आपले नाव लिहून घेतले असेल असे ते लोक असावेत. स्वराज्याचा अर्थ मोजक्या लोकांच्या हाती सत्ता येणे असा नसून, सत्तेचा दुरुपयोग होताक्षणीच त्याचा प्रतिकार करण्याची शक्ती प्राप्त केल्यानेच लोकांना खरे स्वराज्य प्राप्त होऊ शकते. याचाच अर्थ असा की लोकांना आपल्यात सत्ता काबीज करून तिचे नियमन करण्याची शक्ती असल्याची जाणीव असावयास हवी.

शेवटी स्वराज्य हे आमच्या आंतरिक शक्तीवर, मोठ्यात मोठ्या संकटांशी झुंजण्याच्या शक्तीवर अवलंबून आहे. खरे म्हटले म्हणजे ज्या स्वराज्याच्या प्राप्तीकरिता अविरत प्रयत्न व ज्याच्या रक्षणाकरिता सतत जागृत राहण्याची आवश्यकता नाही, ते स्वराज्य 'स्वराज्य' म्हणण्यायोग्यच नाही. स्त्री-पुरुषांच्या व्यापक समष्टीचे राजनैतिक स्वराज्य म्हणजे एकेका व्यक्तिविशेषाच्या स्वराज्यापेक्षा निराळी किंवा अधिक चांगली गोष्ट नव्हे; अतएव ते प्राप्त करण्याचा मार्गही तोच, म्हणजे व्यक्तिश: आत्मस्वराज्य अथवा आत्मसंयमाचाच, असेल.

माझ्या कल्पनेतील स्वराज्य

माझ्या कल्पनेतील स्वराज्यात जाती वा धर्मभेदांना कुठलेही स्थान असू शकत नाही. त्यावर सुशिक्षित किंवा श्रीमंतांचा एकाधिकार असू शकणार नाही. ते सर्वांकरिता – सर्वांच्या कल्याणाकरिता राहील. सर्वांमध्ये शेतकरी तर येतातच, पण लुळे, लंगडे, आंधळे, भुकेले आणि लाखो-करोडो मेहनती मजूर पण अवश्य येतात.

काही लोक म्हणतात की भारतीय स्वराज्य हे बहुसंख्य असणाऱ्या हिंदूंचेच राज्य राहील. ह्यापेक्षा अधिक भयावह अपसमज संभवत नाही. हे बरोबर आहे असे सिद्ध झाल्यास मी त्याला मान्यता देण्याऐवजी माझी सर्व शक्ती पणाला लावून अशा स्वराज्याचा विरोध करीन. माझ्याकरिता हिंद-स्वराज्याचा अर्थ, सर्व लोकांचे राज्य,

न्यायाचे राज्य असा आहे.

स्वराज्य जितके एखाद्या राजाचे राहील तितकेच शेतकऱ्याचेही राहील; जितके एखाद्या श्रीमंत जमीनदाराचे तितकेच भूमिहीन शेतकऱ्याचे; जितके हिंदूंचे तितकेच मुसलमानांचे, जैन, ज्यू, शीख, पारशी व ख्रिश्चन लोकांचे राहील. त्यात जातपात, धर्म किंवा वर्गाच्या भेदभावाला कुठलेही स्थान राहणार नाही.

माझ्या स्वप्नातील स्वराज्य गरीबांचे स्वराज्य राहील. जीवनाच्या ज्या आवश्यकतांचा उपभोग राजे व श्रीमंत घेतात, त्या गरीबांकरिताही सुलभ असाव्यात. पण ह्याचा असा अर्थ नव्हे की आमच्याजवळ त्यांच्यासारखे महाल असावेत. सुखी जीवनाकरिता महाल असण्याची मुळीच गरज नाही. आम्हाला महालात ठेवल्यास आम्ही खरोखर घाबरून जाऊ. मात्र श्रीमंतांना उपलब्ध असलेल्या सामान्य सुविधा गरीबांना अवश्य मिळाल्या पाहिजेत. जोपर्यंत याची परिपूर्ण सोय होत नाही, तोपर्यंत त्याला खऱ्या अर्थाने स्वराज्य म्हणता येणार नाही.

स्वराज्याच्या माझ्या कल्पनेबद्दल कोणाचा कुठलाही गैरसमज असू नये. त्याचा अर्थ परदेशी नियंत्रणापासून पूर्ण मुक्ती आणि पूर्ण आर्थिक स्वातंत्र्य हा आहे. त्याची दुसरी दोन उद्दिष्टेही आहेत : एका टोकाला नैतिक व सामाजिक उद्दिष्ट आहे आणि दुसऱ्या टोकाला त्याच्याच तोलाचे उद्दिष्ट आहे धर्म. इथे धर्म शब्द त्याच्या सर्वोच्च अर्थांसह वापरलेला आहे. ह्या शब्दाच्या पोटात हिंदू धर्म, इस्लाम, ख्रिश्चन धर्म इत्यादी सर्वांचा समावेश तर होतोच, पण हा धर्म इतरांपेक्षा उच्च आहे. याला हवा तर आम्ही स्वराज्याचा 'समचतुर्भुज' म्हणू या. यांपैकी एकही कोन जरी विषम झाला तरी त्याचे संपूर्ण स्वरूपच विकृत होईल.

जर स्वराज्याचा अर्थ आम्हाला सभ्य बनविणे आणि आमच्या सभ्यतेला अधिक शुद्ध व शक्तिशाली बनविणे असा नसेल तर ते कवडीमोल ठरेल. आमच्या सभ्यतेचे मूल तत्त्वच हे आहे की आम्ही आमच्या सगळ्या वैयक्तिक किंवा सार्वजनिक कार्यामध्ये नीतीच्या पालनाला सर्वांत श्रेष्ठ स्थान देतो.

अहिंसाधारित स्वराज्य व लोकशाही

माझ्या कल्पनेचे स्वराज्य तेव्हाच निर्माण होईल जेव्हा आम्ही मनाशी अशी खूणगाठ बांधू की आम्हाला आमचे स्वराज्य सत्य व अहिंसेच्या शुद्ध साधनांद्वारेच प्राप्त करावयाचे आहे, त्यांच्या द्वारेच आम्हाला स्वातंत्र्याचे संचालन करून त्याला कायम टिकवावयाचे आहे. खरी लोकसत्ता वा जनतेचे स्वराज्य केव्हाही असत्यमय आणि

हिंसक साधनांनी येऊ शकत नाही. कारण तसे केल्यास त्याचा स्वाभाविक परिणाम विरोधकांची गळचेपी अथवा त्यांचा नाश करण्यात होईल. अशा परिस्थितीत वैयक्तिक स्वातंत्र्याचे रक्षण होऊ शकणार नाही. वैयक्तिक स्वातंत्र्याचा विकास करण्याची संधी केवळ विशुद्ध अहिंसेवर आधारलेल्या शासनातच मिळू शकेल.

अहिंसेवर आधारलेल्या शासनात लोकांना त्यांच्या हक्कांचे ज्ञान नसल्यास हरकत नाही, पण त्यांना त्यांच्या कर्तव्याचे ज्ञान असलेच पाहिजे. प्रत्येक कर्तव्याबरोबर त्याच्या तोडीचा हक्क संलग्न असतो व जे हक्क आपल्या कर्तव्यांचे योग्य रीतीने पालन करून प्राप्त केले जातात तेच खरे हक्क होत. याकरिता, ज्या राज्यात राहत असतील त्याची सेवा करणाऱ्या लोकांनाच तेथील नागरिकत्वाचे हक्क प्राप्त होऊ शकतात. आणि केवळ तेच त्या हक्कांचा न्याय्य वापर करू शकतात. प्रत्येक व्यक्तीला खोटे बोलण्याचा व गुंडगिरी करण्याचा हक्क आहे, पण या हक्काचा वापर ती व्यक्ती व समाज, दोघांनाही अनिष्ट ठरेल. परंतु सत्य व अहिंसेचे पालन केल्याने मोबदल्यात त्या व्यक्तीला प्रतिष्ठा प्राप्त होते व परिणामी तिला हक्क प्राप्त होतात. ज्या लोकांना कर्तव्यपालनाच्या मोबदल्यात हक्क प्राप्त होतात ते त्यांचा उपयोग स्वत:करिता न करता समाजसेवेकरताच करतात. कोणत्याही राष्ट्रीय समाजाच्या स्वराज्याचा अर्थ त्या समाजातील विविध व्यक्तींच्या स्वराज्याची, म्हणजेच आत्मशासनाची, गोळाबेरीज हा आहे आणि असे स्वराज्य व्यक्तींनी स्वत:ची नागरिक कर्तव्ये चोखपणे पार पाडली तर संभवते. त्यात कोणीही आपल्या हक्कांचा विचार करणार नाही. जेव्हा त्या हक्कांची आवश्यकता असते तेव्हा त्यांना ते विनासायास प्राप्त होतात आणि तेही त्यांनी स्वत:चे कर्तव्यपालन अधिकाधिक चांगले करावे म्हणून.

अहिंसेवर आधारलेल्या स्वराज्यात कोणी कोणाचा शत्रू नसतो. सर्वांचे कल्याण साध्य करण्यात प्रत्येक जण योगदान देत असतो. सर्वांना लिहितावाचता येते व त्यांचे ज्ञान वृद्धिंगत होत राहते. रोगराई किमान असावी अशी व्यवस्था असते. कोणीही कंगाल नसतो आणि मजुरी करू इच्छिणाराला योग्य काम मिळते. अशा समाजव्यवस्थेत जुगार, नशाबाजी, दुराचार अथवा वर्गद्वेष यांना कोठेही स्थान उरत नाही. श्रीमंत लोक स्वत:च्या पैशाचा वापर स्वत:च्या ऐषारामाकरिता वा शारीरिक सुखोपभोगाकरिता न करता बुद्धिपूर्वक उपयुक्त अशा कामाकरिताच करतील. अशा व्यवस्थेत काही मोजक्या श्रीमंतांनीच रत्नजडित महालात रहावे आणि कोट्यवधी दु:खी लोकांनी जेथे पुरेसा प्रकाश व स्वच्छ हवाही पोचणार नाही अशा झोपड्यांतून गुजराण करावी हे संभवणार नाही – असे होऊ नये. अहिंसाप्रधान स्वराज्यात कोणीही

दुसऱ्याच्या न्याय्य अधिकाराचे अतिक्रमण करू शकणार नाही. कोणालाही अन्याय्य अधिकार प्राप्त होणार नाहीत. कोणाचेही न्याय्य अधिकार अन्याय्य मार्गाने हिरावले जाण्याचा संभव नसेल. आणि समजा असे झाले तरी संबंधित अपहर्त्याला पदच्युत करण्यास हिंसेचा अवलंब करावा लागणार नाही. लोकशाहीचा हिंसेशी मेळ बसत नाही. आज जेथे केवळ नामधारी लोकशाही अस्तित्वात आहे तेथील लोकांनी एक तर स्पष्टपणे हुकुमशाहीचा स्वीकार करावा, अथवा खरी लोकशाही जर हवी असेल तर धैर्याने अहिंसक बनावे. अहिंसेचे पालन फक्त व्यक्तिश:च शक्य आहे, राष्ट्राला शक्य नाही या म्हणण्यात विचार नाही, कारण शेवटी राष्ट्र हे व्यक्ती मिळूनच होत नाही काय?

माझ्या दृष्टीने लोकशाहीचा अर्थच असा आहे की अशा राज्यव्यवस्थेत अगदी लहान व्यक्तीपासून तो अगदी मोठ्या व्यक्तीपर्यंत सर्वांनाच विकासाची समान संधी असावी. हे अहिंसेशिवाय शक्य नाही. कर्तव्य म्हणून दुर्बलांच्या हक्कांचे रक्षण करीत असलेला आज जगात एकही देश नाही. गरीबांकरिता आज काही केले जरी जात असेल, तरी ते उपकार म्हणून; कर्तव्य म्हणून नव्हे.

आजची पाश्चिमात्य लोकशाही ही जवळपास नाझी-फॅसिस्ट पद्धतीचीच होय. फार तर असे म्हणता येईल की साम्राज्यवादाचे स्पष्ट रूप झाकून ठेवण्याकरिता केवळ एक बुरखा म्हणून लोकशाहीचा वापर करण्यात येत आहे. भारताचा प्रयत्न यथार्थत्वाने लोकशाही निर्माण करण्याचा आहे. तीत हिंसेला स्थान नसेल.

खरे स्वराज्य – सरकारी नियंत्रणापासून मुक्तता

लोकांच्या हातीं सत्ता केंद्रित झाली म्हणजे त्याच्या स्वातंत्र्यात होणाऱ्या हस्तक्षेपाचे प्रमाण कमी-कमी होत जाते. जे राष्ट्र सरकारच्या हस्तक्षेपाशिवाय आपले कार्य शांततापूर्वक व परिणामकारकरीत्या करून दाखविते त्यालाच खऱ्या अर्थाने 'लोकशाहीप्रधान राज्य' म्हणता येईल. जेथे अशी परिस्थिती नसेल तेथे सरकारचे बाह्य स्वरूप कितीही लोकशाहीचे असले तरी ती केवळ नाममात्र लोकशाही ठरेल. दहा-वीस व्यक्ती एखाद्या केंद्रस्थानीं बसून खरी लोकशाही चालवू शकत नाहीत. तिला खालपासून गावोगावीच्या लोकांमार्फतच चालविता येईल.

सरकारी नियंत्रणापासून – मग ते सरकार देशी असो, नाहीतर विदेशी असो – मुक्त होण्याचा सतत प्रयत्न होत जाणे, हा स्वराज्याचा खरा अर्थ आहे. स्वराज्य आल्यावरही जर लहानसहान गोष्टींकरिता लोकांना सरकारच्या तोंडाकडे पाहणे भाग पडेल तर असले स्वराज्य-सरकार कुचकामी ठरेल.

३. खरे स्वातंत्र्य

माझी दृढ भावना आहे की भारताला, व त्याबरोबरच संपूर्ण जगाला, खरे स्वातंत्र्य मिळवायचे असल्यास पुढे-मागे आम्हाला हे पटावे लागेल की लोकांना शहरातील महालांतून नव्हे, तर गावोगावी झोपड्यांतून रहावयाचे आहे. कोट्यवधी लोक शहरांत किंवा महालात कधीही एकमेकांसोबत शांततेने राहू शकत नाहीत. तशा परिस्थितीत त्यांना हिंसा व असत्य या दोहोंचे साह्य घेण्याशिवाय दुसरा मार्ग शिल्लक उरणार नाही.

तसेच माझी अशी खात्री आहे की सत्य व अहिंसेच्या अभावी मानवजातीचा संपूर्ण नाश झाल्याशिवाय राहणार नाही. ग्रामीण जीवनाच्या साधेपणातच आपणास सत्य व अहिंसेचे खरे दर्शन होईल. जर आज संपूर्ण जग चुकीच्या मार्गावर जात असेल तर त्याची मला काळजी करण्याचे कारण नाही. कदाचित् भारतदेखील त्याच मार्गाने जाऊन, एखादा पतंग ज्याप्रमाणे सतत दिव्याभोवती पिंगा घालून शेवटी त्यावर झेप घेऊन जळून खाक होतो त्याप्रमाणे नष्ट होईल. परंतु भारतासकट संपूर्ण जगाचा विनाशापासून बचाव करण्याचा आटोकाट प्रयत्न करणे हे माझे सर्वश्रेष्ठ कर्तव्य होय.

माझ्या म्हणण्याचे सार हे आहे की माणसाने आपल्या जीवनावश्यक गरजा भागल्या म्हणजे पूर्ण संतोष मानावा आणि नेहमी स्वावलंबी असावे. तो अशी संयमशीलता जर अंगी बाणवणार नाही तर तो आत्मरक्षण करू शकणार नाही. मी आधुनिक विज्ञानाचा प्रशंसकच आहे, पण मला स्पष्ट दिसत आहे की त्याच्या प्रकाशात जुन्या गोष्टींचे संशोधन व नवीनीकरण करावे लागेल.

स्वातंत्र्य खालपासून सुरू व्हावे लागेल. गावोगावी लोकांचे किंवा पंचायतीचे राज्य असेल. पंचायतीपाशी पूर्ण शक्ती आणि सत्ता असेल. याचा अर्थ असा की प्रत्येक गावाला स्वत:च्या पायावर उभे रहावे लागेल. आपल्या गरजा स्वत:च भागवून घ्याव्या लागतील. म्हणजेच त्यांना स्वत:च पूर्ण कारभार चालविता येईल. संपूर्ण जगाविरुद्ध आत्मरक्षण करावे लागले तरी त्यांना ते करता येईल. बाहेरून आक्रमण करणाराचा विरोध करीत असता अवश्य तर प्राणार्पण करण्यास तयार असण्याचे त्यांना शिक्षण द्यावे लागेल. अशा प्रकारे शेवटी आमची पूर्ण मदार व्यक्तीवर राहील. याचा हा अर्थ नव्हे की आम्ही शेजाऱ्यावर किंवा जगावर विश्वास ठेवू नये, अथवा त्यांनी स्वेच्छेने केलेले साह्य घेऊ नये. यामागील कल्पना हीच की सगळे लोक स्वतंत्र होतील आणि एकमेकांवर आपला प्रभाव पाडू शकतील. ज्या समाजातील माणसाला आपण

काय केले पाहिजे याची जाणीव असते, आणि याहीपेक्षा अधिक महत्त्वाचे म्हणजे त्याला मनोमन वाटते की आपल्याएवढी मेहनत केली असली तरी इतरांना जे मिळत नाही त्याचा स्वत:ही उपभोग घेता कामा नये, त्या समाजाची सभ्यता खरोखरच वरच्या दर्जाची असेल.

अशा समाजाची रचना केवळ सत्य व अहिंसेवर आधारित असू शकते. आणि मला वाटते की ईश्वरावर जिवंत विश्वास असल्याशिवाय सत्य आणि अहिंसा यांचे पालन अशक्य आहे. ईश्वर सर्वशक्तिमान असल्यामुळे ईश्वरी शक्तीला इतर साह्यांची गरज वाटत नाही. इतकेच नव्हे तर जगातील यच्चयावत् इतर शक्तींना ती पुरून उरते.

असा समाज असंख्य गावांचा बनलेला असेल. त्याचा विस्तार एकावर एक या पद्धतीने न होता लाटांप्रमाणे एकानंतर एक अशा स्वरूपात होईल. मनोऱ्याचे सर्वांत उंच टोक जसे खालच्या रुंद पायावर उभारले असते तसे जीवन तेथे असणार नाही. तेथे जीवन हे समुद्रातील, एकीच्या पोटात दुसरी अशा, असंख्य लाटांप्रमाणे राहील व व्यक्ती हा त्याचा केंद्रबिंदू असेल. व्यक्ती सदैव आपल्या गावाच्या कल्याणार्थ आत्माहुती देण्यास तयार राहील. गाव आसपासच्या गावांसाठी असेच करण्यास तयार राहील. असा समाज अशा लोकांचा असेल, जे कधीही कोणावर आक्रमण करणार नाहीत, उलट नम्र असतील आणि ज्या समुद्राचे ते अंग आहेत त्या समुद्राचे वैभव अनुभवतील. या वर्तुळाकार समाजव्यवस्थेत कोणत्याही बाहेरील वर्तुळातील लोक आतील वर्तुळातील लोकांना दाबण्याचा प्रयत्न करणार नाहीत; उलट ते त्यांना पाठबळ देत राहतील आणि त्यांच्यापासून शक्ती मिळवतील.

''हे सर्व तुमचे दिवास्वप्न आहे; याचा विचार करण्यात आम्ही वेळ कां दवडावा?'' असा टोमणेवजा प्रश्न मला विचारता येईल. युक्लिडच्या व्याख्येप्रमाणे कोणी बिंदू काढला नाही आणि काढणे शक्य नाही, तरीही बिंदूचे महत्त्व आहे ना? तद्वतच माझ्या या कल्पनाचित्राचेही मोल आहे. या ध्येयाकरिता माणसाला जगता येईल. हे चित्र पूर्णपणे रंगविता न येवो, पण भारताच्या जीवनाचे ते ध्येय असायलाच हवे. आमच्या ध्येयाचे यथार्थ चित्र आमच्या डोळ्यांसमोर असेल तरच आम्हाला त्याच्या जवळपासचा मुक्काम गाठता येईल. भारताच्या प्रत्येक गावी जर पंचायत राज्य* झाले तर मी माझ्या चित्रणाचे यथार्थत्व सिद्ध करू शकेन. या व्यवस्थेत पहिला

* आजच्या पंचायत राज्याची गांधींजींना अभिप्रेत असलेल्या पंचायत राज्याशी गफलत करू नये. – सं.

व शेवटचा समसमान असतील; हवे तर असे म्हणा की कोणीही पहिला राहणार नाही आणि कोणीही शेवटचा राहणार नाही.

या चित्रात सर्व धर्मांना आपापली जागा राहील. आम्ही सर्व एकाच भव्य वृक्षाची पाने आहोत. या वृक्षांच्या मुळांना धक्का लावता येत नाही, कारण ती पाताळापावेतो गेलेली आहेत. मोठ्यातली मोठी वावटळसुद्धा या वृक्षाला उन्मळू शकणार नाही.

जी यंत्रे माणसाला बाजूला सारून मोजक्या लोकांच्या हाती शक्ती केंद्रित होण्यास सहाय्य करतात अशा यंत्रांना या चित्रात स्थान नाही. सुसंस्कृत समाजात शरीरश्रमाचे एक आगळे स्थान आहे. अशा समाजात फक्त माणसाला सहाय्य करू शकतील अशाच यंत्रांना स्थान राहील.

पंचायत राज्य होईल तेव्हा लोकमत अशी अनेक कामे करील, जी हिंसा कधीच करू शकत नाही. सामान्य जनतेला स्वत:च्या शक्तीची जाणीव नसेपावेतोच जमीनदार, भांडवलवाले आणि राजेलोक यांची सत्ता चालू शकेल. जनतेने या लोकांशी असहकार केला तर ते आपोआप नष्ट होतील. पंचायत राज्यात फक्त पंचायतीच्याच आज्ञेचे पालन होईल, व तिने बनविलेल्या नियमांन्वयेच तिचा कारभार चालेल.

भारत खेड्यांतून वसलेला आहे

भारत आपल्या काही मोजक्या शहरांतून नव्हे, तर सात लाख खेड्यांतून वसलेला आहे, या गोष्टीची मी अनेक वेळा पुनरावृत्ती केली आहे. परंतु आम्हा शहरांतील लोकांना वाटते की भारत शहरांतून वसलेला असून शहरांच्या आवश्यकता पूर्ण करण्यासाठीच खेड्यांची निर्मिती झाली आहे. त्या गरीबांना पोटापुरते अन्न व शरीराचे संरक्षण करण्यापुरते तरी वस्त्र मिळते किंवा नाही, तसेच ऊन-पावसापासून संरक्षण करण्याकरिता आश्रय आहे किंवा नाही, याचा विचार करण्याचा आम्ही प्रयत्नच करीत नाही.

शहरी लोकांनी खेडुतांचे सामान्यत: शोषणच केले आहे असे मला आढळून आले आहे. वास्तविक ते त्यांच्या कष्टावरच जगत आहेत. भारतातील खेडुतांना पोटभर अन्न मिळते असे कोणीच म्हणत नाही. उलट अधिकाधिक लोक जवळपास भुकेले असतात. दहा टक्के अर्धपोटी असतात आणि कोट्यवधी लोक यंत्रांनी पॉलिश केलेले नि:सत्त्व तांदूळ आणि सोबत थोडी मीठमिरची अथवा इतर जाडेभरडे अन्न यांवर आपला उदरनिर्वाह करतात.

आमच्या लोकसंख्येपैकी पंचाहत्तर टक्क्यांपेक्षा अधिक लोक शेतीवर अवलंबून

आहेत. परंतु त्यांनी कष्टाने मिळविलेले जर आम्ही लुबाडू अथवा इतरांना लुबाडू देऊ, तर ते आमच्यातील स्वराज्यभावनेचे द्योतक मानता येणार नाही.

शहरे स्वत: आपली काळजी घेऊ शकतात; सबब आम्ही आमचे लक्ष खेड्यांवरच केंद्रित केले पाहिजे. आम्ही त्यांच्याबरोबर राहून त्यांच्या सुखदु:खांत सहभागी झालो तरच त्यांची संकुचित दृष्टी आणि अपसमज दूर होऊ शकतील आणि त्यांच्यात शिक्षण आणि इतर उपयुक्त ज्ञानाचा प्रचार करता येईल.

शहरांचे कर्तव्य

खेडी व शहरे यांच्यात पोषक व नीतियुक्त संबंध निर्माण होण्याकरिता शहरांतून अशी जाणीव निर्माण व्हावी लागेल की खेड्यांचे केवळ स्वार्थासाठी शोषण करण्यापेक्षा गावकऱ्यांकडून मिळणाऱ्या पोषक शक्तीचा त्यांना पुरेसा मोबदला दिला पाहिजे.

भारतातील कोट्यवधी अर्धपोटी लोक कशा प्रकारे दिवसेंदिवस मृतवत् होत आहेत याची कल्पना शहरांतील लोक क्वचितच करू शकतील. त्यांचे ऐषाराम ही भांडवलदारांची धन करण्यासाठी ते जी मेहनत करतात, तिची दलाली तेवढी आहे, गरीबांच्या पिळवणुकीचा तो परिणाम आहे, याचा त्यांना मागमूसही नाही. कोणत्याही प्रकारच्या वादविवादाने, आकड्याने आणि दिखाऊ कोष्टकांनी भारतातील खेड्यांचे मूर्तिमंत दारिद्र्य व कंगाली लपू शकणार नाही.

खेड्यांची सुधारणा करण्याची मोहीम ही केवळ खेडुतांच्या शिक्षणाची बाब नसून तिच्यापासून शहरी लोकांनाही तितकेच शिक्षण घ्यावयाचे आहे. या कामात पुढाकार घेणाऱ्या शहरांतील कार्यकर्त्यांनी आपली मानसिकता बदलून खेड्यांतील लोकांप्रमाणे राहण्याची कला अवगत करून घेतली पाहिजे. याचा अर्थ असा नव्हे की त्यांनीही ग्रामीणांगत उपाशी मरावे, मात्र त्यांना त्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल अवश्य करावा लागेल.

याचा एकच मार्ग आहे : आम्ही त्यांच्यात मिसळून जावे, आणि त्यांचे उपकारकर्ते बनून नव्हे, तर सेवक बनून निष्ठापूर्वक त्यांची सेवा करावी. आम्ही त्यांचे भंगी बनावे, त्यांच्या आरोग्याचे रक्षण करावे. आम्हाला आमचे सगळे गैरसमज दूर केले पाहिजेत. घटकाभर आम्ही स्वराज्याला विसरावे आणि श्रीमंतांचे अस्तित्व आम्हाला पावलोपावली बोचत असले तरी त्यांनाही विसरावे. ते आपल्या जागी आहेतच. अनेक लोक मोठे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करीत आहेत. आम्ही स्वत:ला

खेड्यांची सुधारणा करण्याच्या लहानशा कामाला जुंपून घेणे आज महत्त्वाचे आहे, आणि स्वराज्यप्राप्तीनंतही ते तेवढेच महत्त्वाचे राहील. किंबहुना खेड्यातील कामाची सफलता आम्हाला आमच्या अंतिम उद्दिष्टाच्या (स्वराज्याच्या) जवळ घेऊन जाईल.

तीन रोग

खेड्यांना जखडून ठेवणाऱ्या तीन रोगांवर आम्हाला इलाज करायचा आहे –

१. सार्वजनिक स्वच्छतेची कमतरता,

२. पुरेशा सकस आहाराची कमतरता,

३. खेडुतांची जडता.

खेड्यांतील लोक स्वत:च्या विकासाबाबत उदासीन आहेत. स्वच्छतेचे आधुनिक उपाय त्यांना माहीत नाहीत आणि त्यांत त्यांना रस नाही. आपल्या शेतात नांगरण, वखरण, पेरणी व त्यासारखे इतर कष्ट करण्यापलीकडे जास्त कष्ट करण्यास ते तयार नाहीत. या वास्तविक आणि गंभीर अडचणी आहेत. पण आम्हाला घाबरण्याचे किंवा हतोत्साह होण्याचे कारण नाही. आमचे ध्येय आणि कार्य यांवर आमची अनन्य श्रद्धा असावयास हवी. आमचे व्यवहार धीराने चालावे. ग्रामसेवेत शेवटी आम्ही नवशिकेच आहोत. आम्हाला एका जुनाट दु:साध्य रोगावर इलाज करावयाचा आहे. आमच्यात पुरेसा धीर आणि परिश्रमशीलता असेल तर अडचणीचे पर्वतसुद्धा बाजूला सारता येतील. रोग असाध्य आहे या सबबीच्या आडोशाने ज्याप्रमाणे परिचारिकांना रोग्याला वाऱ्यावर सोडून जाता येत नाही, तीच गत याबाबतीत आमची आहे.

आमची आजची खेडी आज आहेत तशीच पूर्वी होती काय, या प्रश्नाचा कीस काढीत बसण्यात अर्थ नाही. पूर्वी ती आजच्यापेक्षा चांगली नसतील तर त्यावरून हेच सिद्ध होईल की ज्या जुन्या संस्कृतीचा आम्हाला एवढा अभिमान वाटतो तिच्यात दोष असावा. पण ती आजपेक्षा पूर्वी अधिक चांगली नसतील तर, त्यांच्या विनाशाची जी प्रक्रिया आम्ही पाहतो व जी त्या खेड्यांनी शतकानुशतके सहन केली आहे, ती त्यांना कशी सहन करता आली असेल? या विनाशी प्रक्रियेला थोपवणे, भारतातील खेड्यांचे पुनर्निर्माण करणे – ज्यायोगे खेड्यात राहणेही शहरात राहण्याइतकेच सोपे होईल – हे काम आज प्रत्येक देशप्रेमी माणसापुढे उपस्थित आहे.

मोजक्या लोकांच्या हाती भांडवल गोळा व्हावे याची भारताला गरज नाही. उलट ज्या साडेसात लाख खेड्यांचा हा १९०० मैल लांब आणि १५०० मैल रुंदीचा विशाल देश बनला आहे, त्या गावांना सहज उपलब्ध होईल असे भांडवलाचे वाटप असावे. या

खेड्यांचे पुनरुत्थान होण्याची गरज आहे. भारताची खेडी भारतीय शहरांच्या सर्व गरजा भागवीत असत. पण शहरांनी जेव्हा परदेशी वस्तूंच्या बाजारपेठेचे रूप धारण केले आणि स्वस्त व निकृष्ट माल ग्रामीणांच्या गळ्यात बांधून त्यांना नागविण्यास सुरुवात केली, तेव्हापासून भारताचे दारिद्र्य सुरू झाले.

शेतकऱ्यांचे – मग ते भूमिहीन असोत की स्वत: राबणारे शेतमालक असोत – स्थान प्रथम आहे. त्यांच्याच परिश्रमाने पृथ्वी फलप्रसू आणि समृद्ध होत असते. अतएव जमीन त्यांचीच असते – किंवा असावयास हवी. जमिनीपासून दूर राहणाऱ्या जमीनदारांची ती कशी असणार? पण अहिंसात्मक योजनेत शेतकरी अथवा मजूर जमीनदारांची जमीन बळजोरीने हिसकावू शकत नाहीत. त्यांनी अशा तऱ्हेने काम करायला हवे की जमीनदारांना त्यांचे शोषण करता येणार नाही. यासाठी शेतकऱ्यांत घनिष्ठ परस्पर-सहकार्य असण्याची नितांत आवश्यकता आहे.

लोकतांत्रिक स्वराज्यात शेतकऱ्यांच्या हाती राजकीयच नव्हे, तर सर्व प्रकारची सत्ता राहील यात मला शंका नाही. त्यांना त्यांचे योग्य स्थान मिळावे आणि त्यांच्या मताला देशात अग्रमान असावा. खेड्यांनी जगायला तर हवेच, त्यांनी शक्तिशाली आणि समृद्धही व्हावे असे आम्हाला वाटत असेल तर आमची संपूर्ण विचारसरणी ग्रामाभिमुखच असावी लागेल.

४. ग्रामस्वराज्य

खरे म्हणजे आम्हाला शहरी आणि ग्रामीण भारत यांपैकी एकाला निवडावे लागेल. आमची खेडी भारताइतकीच जुनी आहेत. शहरे मात्र परकीय सत्तेने तयार केली आहेत. जेव्हा ही सत्ता विसर्जित होईल तेव्हा शहरांना खेड्यांपेक्षा दुय्यम स्थान मिळेल. आज शहरांचाच बोलबाला असून ती खेड्यांतील सर्व दौलत धुऊन नेत आहेत. यामुळे खेड्यांचा ह्रास आणि नाश होत आहे. खेड्यांचे शोषण हाही संघटित हिंसेचा एक प्रकार आहे. आम्हाला जर अहिंसाधिष्ठित स्वराज्य स्थापन करायचे असेल तर त्यात खेड्यांना त्यांचे योग्य स्थान द्यावे लागेल. त्यांचा नाश म्हणजेच भारताचा नाश असे माझे मत आहे. त्यामुळे भारताची अस्मिताच नष्ट होईल. परिणामी जगाला जो संदेश त्याला द्यावयाचा आहे, तो त्याला देता येणार नाही.

ग्रामस्वराज्याची माझी कल्पना अशी आहे की ते एक पूर्ण लोकतंत्र असेल. त्यात कोणतेही गाव आपल्या प्राथमिक गरजांबाबत शेजाऱ्यांवर विसंबून असणार नाही, आणि तरीही इतर गरजांसाठी जेव्हा शेजाऱ्यांशी सहकार्य आवश्यक असेल तेव्हा ते करील. प्रत्येक खेडे प्रथम स्वत:च्या गरजेपुरते धान्य आणि वस्त्रप्रावरणांना पुरेल इतका कापूस पिकवील. गुरांना चरण्यापुरती आणि गावकऱ्यांना व त्यांच्या मुलाबाळांना खेळ आदींकरिता जागा राखून ठेवली असेल. यानंतर जर जमीन वाचली तर ती पैसा उभारण्याकरिता इतर उपयोगी पिकांकरिता वापरली जाईल – मात्र गांजा, अफू, तंबाखू यांकरिता मात्र नव्हे.

प्रत्येक गावी त्याचे स्वत:चे नाट्यगृह, शाळा आणि सभागृह राहील. पाण्याची स्वतंत्र व्यवस्था असेल, ज्यायोगे गावातील सर्वांना शुद्ध पाणी मिळेल. विहिरी आणि तलाव यांचे योग्य नियंत्रण केल्यास ते सहज साध्य होईल. बुनियादी शिक्षण अनिवार्य राहील. शक्य तोवर गावची सर्व कामे सहकाराने करण्यात येतील. जातपात आणि अस्पृश्यता अशा ग्रामसमाजात आढळणार नाहीत.

सत्याग्रह आणि असहकार या शस्त्रांसोबत अहिंसेच्या सत्तेच्या आधारानेच गावाचे शासन चालेल. ग्रामसैनिकांची एक चमू गावात आळीपाळीने पहारा देईल. त्यातील लोकांची नावे एका ठिकाणी नमूद असतील. गावाचे शासन चालविण्यासाठी प्रत्येक गावात पाच पंचांची निवड करण्यात येईल. मान्य नियमांन्वये विशिष्ट योग्यतेच्या प्रौढ स्त्री-पुरुषांना हे पंच निवडण्याचा अधिकार राहील. या पंचायतीजवळ सर्व प्रकारची आवश्यक सत्ता राहील.

आजच्या रूढार्थाने अशा शासनात शिक्षेची पद्धती नसल्यामुळे कायदेमंडळ, न्यायालय आणि प्रशासन यांची सर्व कामे ही पंचायत आपल्या वर्षभराच्या मुदतीच्या काळात करेल.

आजसुद्धा एखाद्या खेड्याची इच्छा असेल तर ते खेडे स्वत:पुरती अशी व्यवस्था निर्माण करू शकेल. त्याच्या अशा कामात आजचे सरकारसुद्धा फाजील हस्तक्षेप करणार नाही. कारण फक्त मालगुजारी-वसुलीपुरताच सरकारचा खेड्यांशी संबंध असतो. अशा खेड्याचे शेजारच्या खेड्यांशी अथवा प्रांतीय वा केंद्र सरकारशी कशा प्रकारचे संबंध राहतील याचा मी या ठिकाणी विचार केलेला नाही. मला फक्त ग्रामराज्याचे एक चित्र रेखाटायचे आहे. या ग्रामशासनात व्यक्तिगत स्वातंत्र्यावर आधारलेले पूर्ण प्रजातंत्र काम करील. व्यक्तीच आपल्या सरकारची निर्माती असेल. ती आणि तिचे सरकार दोघेहि अहिंसेचे पालन करतील. व्यक्ती व तिचे खेडे अखिल जगाविरुद्ध उभे ठाकू शकेल, कारण प्रत्येक गावकऱ्याच्या जीवनाचा सर्वांत मोठा नियमच मुळी हा असेल की प्रत्येकाने स्वत:च्या व गावाच्या प्रतिष्ठेकरिता आत्मबलिदान करावे.

असे गाव निर्माण करण्यासाठी एखाद्याला संपूर्ण आयुष्य वेचावे लागण्याची शक्यता आहे. खरे प्रजातंत्र आणि ग्रामीण जीवन यांच्याबद्दल प्रेम असणारा कोणीही एका गावी जाऊन तेथे स्थाईक होऊ शकतो. गावालाच सर्वस्व मानून तो या कामात मग्न राहू शकतो. परिणाम खात्रीने चांगलाच होईल. तो खेड्यात जाताक्षणी एकसमयावच्छेदेकरून गावचा भंगी, कातणारा, चौकीदार, वैद्य आणि शिक्षक बनेल. समजा, खेड्यातील इतर कोणी त्याच्या वाऱ्याला न गेला, तरी तो सफाई आणि कताईचे काम संतोषपूर्वक करीत राहील.

ज्या कला व कारागिरीला बाहेरील जगात पेठ असेल अशांचा खेड्यांतून विकास व्हावयास हवा. खेडी जेव्हा पूर्णत: विकसित होतील तेव्हा तेथे कलाकारांची वाण राहणार नाही. खेड्यात शिल्पकार, भाषापंडित, संशोधक – सर्व असतील. थोडक्यात, कोणतीही जीवनोपयोगी वस्तू गावात मिळत नाही असे होणार नाही. आजची आमची खेडी उद्ध्वस्त झालेली आहेत, उकिरड्यासारखी आहेत. उद्या तीच सुंदर उद्याने बनतील. गावकऱ्याना लुबाडणे, त्यांचे शोषण करणे अशक्य होईल. गावाच्या पुनर्रचनेच्या या कामास आतापासूनच सुरुवात झाली पाहिजे. आणि ते कामचलाऊ नसून स्थायी झाले पाहिजे.

सध्या शहरे ग्रामीणांचे शोषण करून त्यांना नागवीत आहेत. माझ्या योजनेत खेड्यांतून तितकाच चांगला बनू शकणारा जिन्नस शहरांना बनवू दिला जाणार नाही. शहरांनी खरे म्हणजे ग्रामीण उत्पादनाच्या बाजारपेठेचे काम करावयास हवे. गावांना स्वावलंबीच बनावे लागेल. अहिंसेच्या दृष्टीने जर आम्हाला काम करायचे असेल तर माझ्या मते याव्यतिरिक्त दुसरा मार्ग नाही.

माझ्या योजनेत गाव हेच सर्वाधिक शक्तिशाली एकक असेल. स्वावलंबनाच्या पायावर उभे केले तर ते खूप काही करू शकेल.

आदर्श भारतीय खेड्यात स्वच्छतेची पुरेशी व सुलभ व्यवस्था राहील. त्यातील सर्व झोपड्यांतून भरपूर हवा व प्रकाश राहील, आणि पाच मैलांच्या परीघात उपलब्ध असलेल्या साधनसामुग्रीच्या साहाय्याने त्या बनलेल्या असतील. त्यांना अंगण असेल, जेथे भाजीपाला पिकवता येईल, गुरेढोरेही बांधता येतील. खेड्यांतील रस्त्यांवर धूळ शक्यतो राहणार नाही. पुरेशा आणि सर्वांना खुल्या विहिरी राहतील. सर्वांची आपापली उपासना-स्थळे असतील. एक सभागृह राहील. गुरांना चराईची जागा राहील. दुग्धयोजना असेल. प्राथमिक आणि माध्यमिक शाळा असतील. त्यांतून मुख्यत: औद्योगिक शिक्षण दिले जाईल. ग्रामपंचायत भांडणे मिटविण्याचे काम करील. आपल्याला लागणारे धान्य, भाजी, फळे आणि खादी ते खेडे स्वत: निर्माण करील.

खेड्यांची आज होणारी लूटमार थांबली तरच त्यांना संजीवन मिळेल. मोठ्या प्रमाणावर मालाची निर्मिती करण्याचा अपरिहार्य परिणाम म्हणून व्यापारी स्पर्धा आणि खेड्याची लूटमार होते. म्हणूनच आम्ही खेड्यांना स्वावलंबी व स्वयंपूर्ण बनविण्यावर पूर्ण कटाक्ष ठेवावयास हवा. त्यांनी फक्त स्वत:च्या गरजा भागविण्यापुरतेच उत्पादन करावे. हे धोरण पक्के केल्यानंतर, जी आधुनिक यंत्रे-अवजारे गावकरी स्वत: बनवू शकतील वा खरीदू शकतील अशा यंत्रांचा त्यांनी खुशाल वापर करावा. अट एवढीच की अशा यंत्रांचा त्यांनी इतरांस नागविण्याकरिता उपयोग करू नये.

ग्रामोद्योगांच्या योजनेमागील माझी कल्पना ही आहे की आम्ही आपल्या दैनंदिन गरजा खेड्यांतून निर्माण होऊ शकणाऱ्या जिन्नसांद्वारेच भागवाव्या. जे गावातून मिळत नसेल ते थोडे परिश्रम आणि संघटन करून किफायतीने उत्पन्न करता येईल की नाही, याची तपासणी करावी, आणि किफायतीचाही विचार व्यक्तिगत नसावा. पूर्ण गावाच्या कल्याणाचा तो असावा. सुरुवातीला आम्हाला थोडी जास्त किंमत देऊनही कनिष्ठ प्रतीच्या जिन्नसा मिळतील अशी शक्यता आहे. परंतु आम्ही संबंधित

कारागीरांच्या कामात रस घेतला; त्यांनी जिन्नसा उत्तरोत्तर श्रेष्ठ प्रतीच्या बनवाव्या याचा केवळ आग्रहच धरला नाही, तर त्यांना यासाठी मदतही केली, तर गावातील उत्पादनांचा विकास निश्चितच होईल. ग्रामोद्योगांचा लोप झाल्यास सात लाख खेड्यांचा सर्वनाश अटळ आहे.

माझ्या ग्रामोद्योग योजनेवर होणारी टीका माझ्या लक्षात आहे. कित्येक म्हणतात की माणसाने शोधक बुद्धीने ज्या निसर्गशक्तींना वश करून घेतले आहे, त्यांचा उपयोग करण्यातच खेड्यांची मुक्ती आहे. त्यांच्या म्हणण्याचा सारांश असा की प्रगत पाश्चिमात्य देशांतून जसा वीज, पाणी, तेल इत्यादींचा वापर होत आहे तसा तो आम्हीही करावा. प्रत्येक अमेरिकन त्यामुळे ३३ गुलामांना राबवून घेऊ शकतो, अर्थात् या शक्तींद्वारा तो ३३ गुलामांचे काम करवून घेऊ शकतो असेही ते म्हणतात. माझी पूर्ण खात्री आहे की आम्हीही जर त्या मार्गाचा अवलंब केला तर प्रत्येक मनुष्याला ३३ गुलाम तर मिळणार नाहीत, उलट त्याची गुलामी ३३ पटींनी वाढेल.

ठराविक काम पूर्ण करण्याकरिता माणसे कमी पडत असतील तरच यंत्रांचा वापर करणे शहाणपणाचे होईल. परंतु भारतात मनुष्यबळाला वाण तर नाहीच. उलट आमच्याकडे असंख्य बेकार आहेत. अशा स्थितीत यंत्राचा उपयोग केल्यास बेकारी कमी होईल की वाढेल? जर थोडीशीच जमीन असेल तर मी नांगराचासुद्धा उपयोग करणार नाही. हातानेही ते करता येईल. लोकांना शरीश्रमापासून मुक्त कसे करावे ही आमची मुळी समस्याच नाही, उलट ज्यांना वर्षांतील काही महिने आळसात (म्हणूनच दारिद्र्यात) काढावे लागतात त्यांना त्यांच्या फावल्या वेळी कोणते उत्पादनक्षम काम द्यावे ही आमची खरी समस्या आहे. लोकांना माझे म्हणणे पटणार नाही, पण वस्तुत: प्रत्येक कापड गिरणी हे गावकऱ्यांवर एक महासंकट आहे. ती मायाविनी अनेकांना बेकार करून त्यांच्या तोंडचे घास काढून घेत आहे. माझा अंदाज आहे की प्रत्येक मिलमजूर गावातील दहा मजुरांची रोजी हिरावीत असतो. त्याचे स्वत:चे उत्पन्न खुशाल वाढलेले असेल, परंतु अशा प्रकारे कापड गिरण्यांनी खेडोपाड्यांतील असंख्य लोकांचे उपजीविकेचे एक मोठे साधन हिरावून घेतले आहे.

गिरण्यांचे कापड चांगले आणि स्वस्त असते हे म्हणणे निरर्थक आहे. कारण, हजारो मजूर जर बेकार झाले असतील तर परिणामी हे स्वस्त गिरणी-कापड खेड्यांतील महागातल्या महाग खादीपेक्षा महाग पडेल. कोळशाच्या खाणीत काम करणाऱ्या मजुरांना त्याच ठिकाणचा कोळसा महाग पडणार नाही, तद्वत् ग्रामीण लोक आपापली

खादी बसल्या ठिकाणी जर निर्माण करतील तर तीही त्यांना महाग पडणार नाही. गिरण्या जशा लोकांची रोजी हिरावून घेत आहेत, तद्वत् तांदूळ सडण्याच्या आणि पिठाच्या गिरण्या स्त्रीवर्गाला बेकार करीत आहेत; शिवाय आरोग्याचा नाश करीत आहेत, ते निराळे. मांसाहार मान्य असणाऱ्या आणि परवडणाऱ्या देशांतील नागरिकांना गिरण्यांतून सडलेले तांदूळ अथवा मैदा यांनी अपाय होत नसेल, पण ज्या आमच्या देशात मांसाहाराला प्रत्यवाय नसणारांनाही तो मिळतच नाही, त्यांना हातकुटाईचे सकस तांदूळ आणि हातपिसाईच्या पौष्टिक पिठापासून वंचित करणे हे पाप आहे. डॉक्टर आणि आहारतज्ञांनी याबाबतीत जनतेला योग्य इशारा द्यावयास हवा. ते त्यांचे कर्तव्य आहे.

मी केवळ ठळक गोष्टींचा उल्लेख केला आहे. ग्रामीणांना काम द्यायचे असेल तर ते यंत्राधिष्ठित असू शकत नाही एवढेच मला स्पष्ट करायचे आहे. जे ग्रामोद्योग आजपावेतो कसेबसे रखडत चालले त्यांना नवजीवन देणे हा ग्रामीणांच्या उद्धार-उत्कर्षाचा एकमेव मार्ग आहे.

५. उद्योगवादाचा अभिशाप

एका टोकाला भौतिक समृद्धीची अक्षय पिपासा आणि परिणामी निर्माण होणारे युद्ध दुसऱ्या टोकाला, हे आजच्या पाश्चात्य संस्कृतीचे जे स्वरूप आहे तिच्याकडे शंकाग्रस्ततेने पाहणाऱ्या विवेकी लोकांची संख्या वाढीवर आहे. पण ती संस्कृती भली असो की बुरी, भारताने पाश्चिमात्य औद्योगिकरणाची नक्कल करण्याची गरज काय? पाश्चिमात्य सभ्यता शहरी सभ्यता आहे. इंग्लंड, इटलीसारखे लहान देश शहरीकरण करू शकतील. अमेरिकेचा व्याप मोठा असला तरी लोकसंख्या कमी, म्हणून त्यांनाही शहरीकरण अवश्य असेल. पण भारत व्यापक असून त्याची जनसंख्या अफाट आहे. शिवाय येथील ग्रामप्रधान अर्थोद्योग परंपरा शतकानुशतकांची जुनी असून आमच्या सर्व गरजा समाधानकारकरीत्या भागवत आली आहे. सबब, आम्हाला पाश्चिमात्यांचे अनुकरण करण्याची मुळीच गरज नाही. आम्ही ते करू नये. 'एकाचे जे अन्न तेच दुसऱ्याला विष' ठरू शकते. एखाद्या देशाला उपकारक काय होईल हे ठरविताना भौगोलिक रचनेचा विचार करायलाच हवा. उत्तर ध्रुवाजवळ राहणाऱ्यांना लोकरी पोषाख अवश्य असेल; विषुववृत्तावर राहणाऱ्याला त्यामुळे श्वास घेणे जड जाईल.

उद्योगाशिवाय माणूस जगू शकत नाही हे मला समजते, त्यामुळे मी औद्योगिकरणाचा विरोध करणे शक्य नाही. पण यंत्रोद्योग मात्र मोठ्या काळजीचे कारण आहे. यंत्रोद्योगामुळे उत्पादन भरमसाट वाढते, आणि त्यामुळे निर्माण होणारी अर्थव्यवस्था मला तरी अनाकलनीय आहे. लाभापेक्षा हानीच ज्यामुळे जास्त होते, अशी योजना मला ग्राह्य वाटत नाही. आमच्या देशातील कोट्यवधी मूक जनता सुखा-समाधानात असावी आणि तिचा आध्यात्मिक विकासही व्हावा अशी माझी इच्छा आहे. या दृष्टीने निदान आजच्या क्षणी आम्हाला यंत्रांची गरज नाही. जेव्हा खरी गरज वाटेल तेव्हा आम्ही अवश्य त्यांचा स्वीकार करू. उद्योग हवा असेल तर आम्हाला परिश्रमी बनावे लागेल. आम्ही स्वावलंबी झालो तर दुसऱ्यांच्या ओंजळीने पाणी प्यावे लागणार नाही. आम्ही अहिंसेच्या पायावर कायम उभे झालो म्हणजे आम्हाला यंत्रांचे नियंत्रण कसे करायचे हे कळेल.

उद्योगांचे राष्ट्रीयीकरण केले म्हणजे त्यांतील भांडवलवादाच्या दोषांचे निरसन होईल असा पं. नेहरूंचा समज असल्यामुळे ते औद्योगिकरणाच्या मताचे आहेत. माझ्या मते हे दोष उद्योगवादात अंगभूत आहेत, आणि म्हणून राष्ट्रीयीकरणाने ते दूर होणार नाहीत. यांत्रिकीकरणाची बैठक अहिंसेला पुष्ट करणार नाही. हे कार्य स्वाश्रयी

खेड्यांच्या आधारे होऊ शकते. मला अभिप्रेत ग्रामीण आर्थिक व्यवस्थेत शोषणाला स्थानच नसणार, आणि शोषणच तर हिंसेचे सार आहे. अहिंसा-आधारित समाज खेड्यांत वसलेले समुदाय मिळूनच बनू शकतो – स्वैच्छिक सहकार्य जेथे प्रतिष्ठित व शांतिमय जीवनाची आवश्यक पूर्व-अट असेल.

प्रत्येकाला काम असावे. अन्नवस्त्राची वाण असू नये. याकरिता उत्पादन-साधनांवर पूर्णत: जनतेचेच नियंत्रण असावे लागेल. हवा आणि पाणी ज्याप्रमाणे मोकळेपणी सर्वांना उपलब्ध असतात, तशीच ही साधनेही उपलब्ध असावी. दुसऱ्यांच्या शोषणाचे साधन म्हणून त्यांचा उपयोग करता कामा नये.

मला स्पष्टपणे सांगून टाकावेसे वाटते की जगावरील आजच्या यच्चयावत् संकटाचे मूळ आमच्या भरमसाट उत्पादनाच्या वेडात आहे. यंत्रे मानवजातीच्या सर्व गरजा भागवू शकतात असे घटकाभर गृहीत धरले तरी, सर्व उत्पादन त्यामुळे मोजक्या ठिकाणी केंद्रित होईल हे तर उघडच आहे, आणि त्याच्या वाटपाकरिता मग प्रदीर्घ द्राविडी प्राणायाम करावा लागेल. उलट ज्या ठिकाणी जे हवे त्याचे उत्पादन-वितरण त्याच ठिकाणी झाल्यास वाटपाचे नियंत्रण आपोआप होईल. त्यात कमीत कमी धोका राहील व सट्ट्याला तर मुदली वावच उरणार नाही.

उत्पादन आणि उपभोग यांचे क्षेत्र मर्यादित झाले म्हणजे कसेही करून भरमसाट उत्पादन करण्याचे प्रलोभनच उरणार नाही. त्यामुळे आजच्या अर्थव्यवस्थेमुळे निर्मित आमचे अनेक प्रश्न आपोआप राहणार नाहीत.

मोठ्या प्रमाणावरील उत्पादन उपभोक्त्यांच्या खऱ्या गरजा कधीच लक्षात घेत नसते. ते जर हितकारी असेल तर मग त्याची अनंतपटीने वाढ व्हावयास हवी. पण या भरमसाट उत्पादनालाही मर्यादा असते हे सिद्ध करणे सोपे आहे. जगातील सगळे देश मोठ्या प्रमाणावर उत्पादन करू लागले तर त्यांच्या मालाला बाजारच मिळणार नाही. अशा स्थितीत ते थांबावेच लागेल.

पाश्चिमात्य राष्ट्रे जगातील तथाकथित दुबळ्या, असंघटित राष्ट्रांचे शोषण करीत असल्याचे आपण पाहत आहोतच. एकदा हे शोषित राष्ट्रांच्या लक्षात आले आणि स्वत:चे शोषण होऊ न देण्याचा त्यांनी निश्चय केला म्हणजे मग ती जे स्वत: निर्माण करू शकतील त्यावरच संतुष्ट राहतील. असे झाले म्हणजे निदान जीवनावश्यक गरजांच्या बाबतीत तरी भरमसाट उत्पादन होणार नाही.

शोषण हे आजच्या अराजक व अंदाधुंदीचे कारण आहे. आणि यंत्रांना मी

विरोध करण्याचे कारणच हे आहे की या यंत्रांनीच पाश्चात्य राष्ट्रांना दुसऱ्यांचे शोषण करण्याचे सामर्थ्य दिले आहे.

ज्या यंत्रांमुळे शारीरिक परिश्रमाचे उच्चाटन होऊन हजारो लोकांवर उपाशी मरण्याची आणि अर्धनग्न राहण्याची पाळी येते अशा यंत्रवेडेपणाला माझा विरोध आहे; यंत्रांना नव्हे. श्रम आणि वेळ यांची बचत झालेली मलाही आवडेल, पण हे अखिल मानवजातीकरिता व्हावे. त्यांची बचत करून मूठभर लोकांनी धनाढ्य होऊन बसावे हे मला असह्य वाटते. आमच्या यंत्रप्रेमाचे मूळ जनसेवेच्या भावनेत नसून आमच्या द्रव्यलोभात आहे. यंत्रांच्या या दुरुपयोगाविरुद्ध मी आपले शक्तिसर्वस्व पणाला लावून लढत आहे.

माणसांनी करावयाची कामे यंत्रांकरवी करून घेण्यात भूषण नाही. घराघरातून चालविता येण्यासारख्या सुधारलेल्या यंत्रांचे मी स्वागत करीन, पण लक्षावधी शेतकऱ्यांना इतर उद्योग देण्यापूर्वी, ते हातांनी करू शकत असलेल्या कताई-विणाईचे काम इतर यंत्रांद्वारा करून घेणे हा गुन्हा आहे.

यंत्रांच्या नेत्रदीपक यशाने मी दिपून जाणार नाही. आणि मारक यंत्रांना तर माझा तीव्र विरोध आहे. याबाबतीत तडजोड अशक्य आहे. अर्थात् ज्या सुलभ (यांत्रिक) साधनांनी वैयक्तिक परिश्रम वाचतील आणि परिणामी झोपड्यांत राहणाऱ्या लाखो-करोडो लोकांवरील श्रमभार हलका होईल अशांचे मी अवश्य स्वागत करीन.

निर्जीव आणि सजीव यंत्रांमधील द्वंद्वयुद्ध

भारताच्या सात लाख ग्रामीण जनतारूपी यंत्राच्या स्पर्धेत निर्जीव यंत्रांनी उभे राहता कामा नये. माणसांना साह्य करतील तीच यथार्थत्वाने यंत्रे होत. आजची यंत्रे मूठभर व्यक्तींच्या हाती संपत्ती गोळा करून असंख्य जनतेला बिनमुर्वत उपाशी मारण्यास मदत करीत आहेत.

मोठ्या प्रमाणावरील औद्योगिकरणाचा अपरिहार्य परिणाम म्हणजे, जसजशी स्पर्धा आणि बाजाराची समस्या वाढेल तसतसे खेड्यांचे प्रकट-अप्रकट शोषण होईल. म्हणून, खेडे स्वयंपूर्ण बनावे व त्याने स्वतःच्या उपयोगासाठी वस्तूंचे उत्पादन करावे यासाठी प्रयत्न करण्यावर आपण शक्ती केंद्रित केली पाहिजे. उत्पादनाच्या या पद्धतीचा स्वीकार केला तर मग गावकऱ्यांनी खुशाल अशा आधुनिक यंत्रांचा आणि अवजारांचा उपयोग करावा, जी त्यांना बनवता येतील आणि आर्थिक दृष्टीने परवडतील. याला काही हरकत नाही. मात्र त्यांचा उपयोग इतरांच्या शोषणासाठी होऊ नये.

माझ्या मते, औद्योगिकरणाची कोणत्याच देशाला खरी गरज नाही; भारताला तर मुळीच नाही. आपल्या गावांचा विकास करून, जगाशी मित्रत्वाने वागून आणि साध्या, उदात्त जीवनाचा स्वीकार करूनच भारत आजच्या विव्हळणाऱ्या जगाचे ऋण फेडू शकेल. द्रव्यलोभाने लादलेल्या फाजील गतिमान जीवनाशी 'उच्च विचारसरणी'चे जमणे अशक्य आहे. उच्च श्रेणीचे जीवन जगण्यानेच जीवनातील संपूर्ण सौंदर्य विकसित होऊ शकेल.

विकेंद्रीकरण अपरिहार्य

लोकांना सुखी करून त्यांची नैतिक व आध्यात्मिक उन्नती करणे हे आमचे ध्येय आहे. ते विकेंद्रीकरणाद्वाराच साध्य होईल. केंद्रीकरण अहिंसेशी विसंगत आहे.

भारताला आपला विकास अहिंसेच्या दिशेने करावयाचा असेल, तर त्याला अनेक गोष्टींचे विकेंद्रीकरण करावे लागेल. केंद्रीकरण करण्यासाठी आणि त्याच्या रक्षणासाठी हिंसा अनिवार्य आहे. ज्या झोपड्यांतून लुटून नेण्यासारखे काहीही नसते, त्यांचे रक्षण करण्याकरिता पोलीस लागत नाहीत. मात्र श्रीमंतांचे रक्षण करण्याकरिता बलवान पहारेकरी लागतात. हेच मोठ्या कारखान्यांनाही लागू आहे. रक्षणदृष्ट्या शहरे कितीही सज्ज केली तरी खेड्यांना केंद्रबिंदू मानून निर्माण केलेल्या भारतापेक्षा शहरी भारत निःसंशय अधिक धोक्यात असेल.

ज्या जगाने नखशिखांत पोलादी शस्त्रे धारण केली असून जे ऐषारामात लोळत आहे, अशा जगात एखाद्या देशाला (उदाहरणार्थ, भारत) एकट्यानेच – मग तो क्षेत्रफळ आणि लोकसंख्या यांच्या दृष्टीने कितीही मोठा का असेना – असे साधे जीवन जगता येईल काय, असा कोणालाही स्वभावतः प्रश्न पडेल. उत्तर सोपे आहे. साधे जीवन जर चांगले असेल तर त्यासाठी प्रयत्न केलाच पाहिजे – मग तसा प्रयत्न एखाद्या व्यक्तीचा असो की राष्ट्राचा असो.

काही मोठ्या उद्योगांची गरज मला मान्य आहे. अर्थात् आरामखुर्चीवर बसून असलेल्या अथवा हिंसाप्रचुर समाजवादावर माझा यत्किंचित् विश्वास नाही. स्वतःला प्रशस्त वाटणारा आचार आपण करावा असे माझे मत आहे आणि याकरिता इतरांना माझे म्हणणे पटेपावेतो वाट पाहण्याची मला गरज वाटत नाही. सबब, मला अभिप्रेत असणाऱ्या मोठ्या उद्योगांची नावनिशी देण्याच्या भानगडीत न पडता मी एवढेच म्हणेन की ज्या उद्योगांत फार मोठ्या संख्येने लोकांनी काम करणे अवश्य असेल असे उद्योग राज्याच्या मालकीचे असावेत. त्यांच्या उत्पादनाची मालकीही (राज्यामार्फत)

त्यांचीच राहील. पण असे राज्यही अहिंसाधिष्ठित असावे अशी माझी कल्पना असल्यामुळे श्रीमंतांपासून त्यांची संपत्ती मी जुलमाने लुबाडणार नाही, उलट राज्याची मालकी प्रस्थापित करण्यासाठी मी त्यांच्या सहकार्याची मागणी करीन. श्रीमंत आणि गरीब ही एकाच रोगाची दोन रूपे होत. खरे हे आहे की शेवटी आम्ही सर्व माणसे आहोत, त्यांत कोणीही अस्पृश्य वा पतित असू शकत नाही.

सध्या दिल्ली, मुंबई, कलकत्ता आदी मोठी शहरे ही शक्तिकेंद्रे आहेत. त्यांची शक्ती सात लाख खेड्यांतून वाटून देण्याची माझी इच्छा आहे.

६. निढळाच्या घामाची भाकरी

आपल्या देशातील भयावह गरीबी आणि बेकारी पाहून मला अनेक वेळा रडू कोसळले आहे. पण हे सर्व आमचे अज्ञान आणि निष्काळजीपणामुळेच आहे हे मला कबूल केले पाहिजे. शरीरश्रमाच्या गौरवाचे आम्हाला भान नाही. उदाहरणार्थ, चांभार इतर काम करण्याने आपल्या प्रतिष्ठेला बाध येतो असे मानतो. हा गैरसमज दूर व्हावयास हवा. जे आपल्या हातापायांनी काम करू इच्छितील अशा सर्वांसाठी भारतात भरपूर उद्योग आहे. ईश्वराने प्रत्येकाला काम करण्याची आणि पोटास पुरून उरेल एवढे कमावण्याची शक्ती दिली आहे. आणि तशी इच्छा असणाऱ्याला काम मिळू शकेल. निढळाच्या भाकरीचे महत्त्व असणाराने कोणतेही काम कमी दर्जाचे लेखण्याचे कारण नाही. आम्ही फक्त हातापायांचा उपयोग करावयास तयार असलो म्हणजे पुरे.

निसर्गाचा आदेश असाच आहे की आम्ही घाम गाळून स्वत:ची रोटी कमवावी. अतएव जो कोणी स्वत:चा एक क्षणसुद्धा वाया दवडत असेल त्याचा बोजा तेवढ्या प्रमाणावर शेजाऱ्यावर पडत असतो. अशाने अहिंसेच्या अगदी पहिल्या नियमाचाच भंग होतो. शेजाऱ्याच्या सुखदु:खाची पर्वा नसणे ही अहिंसा कशी ठरणार? आळशी व्यक्ती अहिंसेच्या या प्राथमिक कसोटीवरच हिणकस ठरेल.

स्वत:च्या भाकरीकरिता प्रत्येकाने कंबर मोडून राबावे असा ईश्वरी संकेत आहे. गीतेच्या तिसऱ्या अध्यायात मला त्याचे दर्शन घडले. यज्ञ केल्याशिवाय जो खातो तो चोरीचे अन्न खात असतो, या शब्दांत यज्ञ न करणाऱ्याला शाप दिला आहे. येथे यज्ञाचा अर्थ, माझ्या मते, स्वकष्टार्जित भाकरी हा करणेच योग्य होईल. तर्कानेसुद्धा हेच अनुमान निघते की न राबणाऱ्याला खाण्याचा हक्क कसा असू शकेल? बायबलही म्हणते : "स्वत:ची रोटी आपला घाम गाळून कमव." एखादा कोट्यधीशसुद्धा सतत पलंगावर लोळत राहील आणि कोणीतरी दुसरा त्याला जेवण भरवील तर त्यालासुद्धा या व्यवस्थेत फार वेळ गोडी वाटणार नाही. तोसुद्धा भूक वाढावी म्हणून व्यायाम करतो आणि स्वत:च्याच हाताने जेवतो. अशा प्रकारे व्यायाम जर आवश्यकच असेल तर आम्ही सर्वांनी अन्नोत्पादनाचा व्यायाम कां करू नये? शेतकऱ्याला कोणीही व्यायाम करण्यास सांगत नाही. जगातील नव्वद टक्क्यांपेक्षाही जास्त लोक शेतीवरच आपली गुजराण करतात. बाकीच्या दहा टक्के लोकांनीही जर त्यांचे अनुकरण केले तर जगात किती आरोग्य, सुख आणि शांती निर्माण होईल! इतकेच नव्हे तर, शेतीला जर बुद्धीची जोड दिली तर शेतीतील अनेक अडचणी दूर होतील. शिवाय, शरीरश्रमाच्या निरपवाद

नियमाचे जर सर्व लोक पालन करतील तर उच्च-नीच भेदसुद्धा नाहीसा होईल.

उच्च-नीच भावनेचा जेथे पूर्वी गंधसुद्धा नव्हता, त्या वर्णव्यवस्थेतही ती भावना आज शिरली आहे. मालक-मजूर हा भेद सर्वत्र कायमचा झाला आहे. गरीब श्रीमंतांचा मत्सर करतात. सर्व जर परिश्रम करतील तर हा भेदभाव उरणार नाही. तरीही धनिक वर्ग हा राहीलच. पण तो स्वत:ला संपत्तीचा मालक नव्हे, तर ट्रस्टी मानेल आणि तिचा उपयोग लोकांच्या सेवेकरताच करेल.

सत्य, अहिंसा, ब्रह्मचर्य यांचे ज्याला पालन करायचे आहे त्याच्या दृष्टीने शरीरश्रम हा जणू रामबाण इलाज होय. शेतीकाम हे यासाठी योग्य आहे. पण आज सर्वांना शेती करता येत नाही. म्हणून कताई, विणाई, सुतारकाम, लोहारकाम अशासारखी कामे आम्ही करावी. सर्वप्रथम तर आम्ही स्वत:चे भंगीकाम करावे. जो जेवतो तो शौचासही जातो, अतएव प्रत्येकाने स्वत:च्या विष्ठेला मूठमाती देणे हा उत्कृष्ट रिवाज ठरेल. न जमल्यास कुटुंबाने आपसात हे कर्तव्यपालन करावे.

स्वत:च्या परिश्रमाचे लोकांनी खाण्यास सुरुवात केली म्हणजे जगात अन्न कमी पडणार नाही. सर्वांना भरपूर फुरसत मिळेल. रोगराई होणार नाही. वाढत्या लोकसंख्येचे भय उरणार नाही. आणि कष्ट-क्लेशाच्या भयापासूनही आम्ही मुक्त होऊ. हा सर्वोच्च प्रकारचा यज्ञ ठरेल. या व्यवस्थेत कोणी राव असणार नाही की रंक. उच्च-नीच किंवा स्पृश्यास्पृश्यतेची भावना पूर्णत: नष्ट होऊन जाईल.

असे आम्ही केले तर आमच्या गरजा कमी होतील. जेवण साधे आणि जगण्याकरिताच राहील. खाण्याकरिताच आम्ही जगणार नाही. शंका असणारांनी अनुभव घेऊन पहावा. निढळाच्या घामाच्या भाकरीची गोडी काही और आढळून येईल. आरोग्य उत्तम राहील. आणि लक्षात येईल की जी विलास-साधने आम्ही आमच्यावर लादली आहेत ती सर्व निरर्थक आहेत.

शरीरश्रमाला मी 'जाणीवपूर्वक' असण्याची अट घातली ती अशाकरिता की त्याशिवाय त्याला समाजसेवेचे स्वरूप येऊ शकणार नाही. समाजसेवेचा उद्देश असेल तरच 'शरीरश्रम' हे सेवेच्या दर्जाचे ठरतील. नाही तर प्रत्येक मजूर समाजसेवाच करतो, असे म्हणावे लागेल. तसे हेही काही अंशी खरे आहे, पण येथे आशय पुष्कळच व्यापक आहे. सर्वांच्या कल्याणाकरिता जो झटत असेल तो समाजसेवाच करीत असतो व त्याच्या गरजा भागल्याच पाहिजेत. असा शरीरश्रम समाजसेवेपासून भिन्न मानता येणार नाही. पण जुलुमाचा रामराम म्हणून रोटीकरिता गाळलेल्या घामातून

गरीबी, रोग आणि असंतोष यांचा जन्म होत असतो. तो गुलामीचा एक प्रकार आहे. त्याऐवजी स्वेच्छेने गाळलेल्या घामातून संतोष आणि आरोग्य यांची प्राप्ती होते.

बौद्धिक श्रम करून उपजीविका करू नये काय? नाही. शारीरिक गरजा शारीरिक श्रमानेच भागल्या पाहिजेत. बौद्धिक व मानसिक श्रम केवळ आत्मसंतोषार्थच असू शकतात. आणि त्याबद्दल पुरस्काराची अपेक्षा असू नये. आदर्श राज्यात डॉक्टर, वकील हे स्वार्थाकरिता नव्हे, तर समाजसेवी वृत्तीनेच काम करतील. शरीरश्रमाच्या नियमपालनाने समाजात एक शांततामय क्रांती घडून येईल. आजच्या जीवन-कलहाऐवजी जर परस्परसेवेची स्पर्धा सुरू झाली तर तो माणसाचा विजय ठरेल. मग पाशवी वृत्ती पदच्युत होऊन मानवधर्म प्रस्थापित होईल.

आमच्या देशात अंगमेहनतीकडे तिरस्काराने पाहण्यास ज्या दिवशी सुरुवात झाली असेल, तो आमचा घातवार असावा. हिऱ्यासारख्या आणि ज्यांच्या भरवशावर आमचा देश जगत असे अशा लाखो-करोडो माणसांना कनिष्ठ ठरविण्यात येऊन वरपांगी मोठ्या दिसणाऱ्या मोजक्यांना आम्ही प्रतिष्ठित मानू लागलो ! परिणामी आमच्या देशाची दु:खद अशी आर्थिक आणि नैतिक, दुहेरी अवनती झाली. यापैकी कोणते नुकसान अधिक हे सांगणे कठीण आहे.

किसान आणि कारागीर लोकांबाबत आम्ही जी अक्षम्य बेपर्वाई दाखविली तिच्यामुळेच आज आम्ही दरिद्री, मूढ आणि असहाय झालो आहोत, यात शंका नाही. भारताजवळ कोणती साधने नाहीत? उत्कृष्ट हवापाणी, गगनचुंबी पर्वत, विशाल नद्या आणि प्रचंड समुद्रकिनारा या अक्षय साधनांचा जर आम्ही भरपूर उपयोग केला तर या सुवर्णभूमीत दारिद्र्य आणि रोगराईचा शिरकावच कसा होईल? पण ज्या क्षणी आमच्या बुद्धीने परिश्रमाला सोडचिठ्ठी दिली त्या क्षणापासून आमच्या अवनतीला सुरुवात झाली, आणि जगात आज आम्हाला सर्वांत अल्पजीवी, साधनहीन आणि सर्वस्वी पराजित असेच मानण्यात येत आहे.

७. परिग्रह संस्कारिता नव्हे, चोरी होय

एका मर्यादेपावेतो शारीरिक सुखसोयी आवश्यक असल्या तरी त्यापलीकडे त्या आमच्या आध्यात्मिक उन्नतीच्या मार्गात अडथळे निर्माण करतात. अतएव त्यांना भरमसाट वाढवून त्यांची पूर्ती करण्याचा आदर्श हा भ्रम आहे. आमच्या शारीरिक गरजा तर सोडाच, पण आमच्या संकुचित बौद्धिक भुकेलाही कोठे तरी मर्यादा असायलाच पाहिजे; विलासाच्या कक्षेत पोचणे चुकीचे होईल. आपल्या शारीरिक व सांस्कृतिक गरजा आपल्या मानवसेवा-व्रताला (कर्तव्याला) बाधक न ठरतील ही खबरदारी घ्यायलाच हवी.

विचारपूर्वक अपरिग्रहाचा वाढत्या प्रमाणात स्वीकार करणे हे खऱ्या संस्कृतीचे लक्षण आहे. त्यामुळे खरे सुख आणि संतोष वाढत जातात. सेवाक्षमताही वाढते. सवयीने हे शक्य आहे. याकरिता सुवर्णप्राय नियम असा की जे लाखो-करोडो लोकांना उपलब्ध नाही त्याचा उपयोग आम्ही कटाक्षाने टाळावा. ही त्यागवृत्ती एकदम निर्माण होणार नाही. पण आम्ही प्रयत्नपूर्वक त्या दिशेने स्वत:च्या जीवनाला वळण लावण्यास सुरुवात करावी.

अपरिग्रह आणि अस्तेय हे जुळे भाऊ आहेत. आम्ही चोरी केली नसेल, पण अनावश्यक जिन्नसांचा साठा जर आम्ही केला असेल तर ती एक प्रकारची चोरीच होय. भविष्याकरिता संग्रह म्हणजे परिग्रह. रोजच्या गरजेपुरतेच उत्पन्न करण्याचा ईश्वरी नियम माहीत नाही म्हणा की आम्ही त्याकडे बुद्धिपुरस्सर दुर्लक्ष करतो म्हणून म्हणा, पण त्यामुळेच आज जगात विषमता आणि तज्जन्य सर्व दु:खे उभी आहेत. श्रीमंतांकडे अनेक अनावश्यक जिन्नसा वाया जातात आणि दुसरीकडे त्यांच्या अभावामुळे अनेक लोक भटकतात, उपाशी मरतात किंवा थंडीने काकडतात. कोट्यधीशाला अब्जाधीश व्हावेसे वाटते, आणि तरीही त्याचे समाधान होत नाही. कंगालालाही पोटभर मिळून समाधान झाल्याचे आढळत नाही. तरी त्याचा पोटभर मिळण्याचा हक्क अर्थात् आहेच, आणि त्याला आपले पोट भरण्याची पात्रता मिळवून देण्याची समाजावर जबाबदारी आहे. अतएव त्याच्या व स्वत:च्याही खऱ्या संतोषाकरिता श्रीमंताने पुढाकार घ्यावा, बराचसा परिग्रह सोडावा, म्हणजे कंगालालाही पुरेसे मिळेल, आणि दोघांचेही समाधान होईल.

मला कोणा श्रीमंताला लुबाडायचे नाही. ते अहिंसाव्रतात बसणार नाही. त्याच्याजवळ भलेही माझ्यापेक्षा जास्त संपत्ती असो. पण मला जर माझ्या तत्त्वाप्रमाणे

जगायचे असेल तर मला स्वत:जवळ अनावश्यक जिन्नसा ठेवता येणार नाहीत. भारतात लाखो लोक दिवसातून एकदाच खातात, आणि त्यांच्या जेवणातही कोरडी भाकरी व थोडे मीठ यापेक्षा जास्त नसते. सर्वांना पोटभर अन्न आणि अंगभर वस्त्र मिळेपावेतो आम्हाला जीवनमान वाढविण्याचा मुळीच हक्क नाही. आम्ही जास्त समजूतदार मानले जातो, त्यामुळे अवश्य तो संयम दाखविण्याची आमच्यावर जबाबदारी आहे. मग त्यापायी आम्हाला स्वत:ला काही सुखसोयींपासून वंचित रहावे लागले तरी आम्ही तसे स्वेच्छापूर्वक राहिले पाहिजे.

माणसाचे मन चंचल आहे, ते भटकत असते. उपभोगाने शारीरिक भूक शमत नाही; उलट ती वाढते. म्हणून आमच्या पूर्वजांनी भोगवृत्तीला मर्यादा घातली. त्यांच्या लक्षात आले की श्रीमंतांची श्रीमंती त्यांच्या सुखाचे कारण नाही, तद्वतच गरीबांची गरीबी हेही त्यांच्या दु:खाचे खरे कारण नव्हे. अनेक श्रीमंत दु:खी आढळतात, तसेच अनेक गरीब सुखात असल्याचे आपण पाहतो. म्हणून आमच्या पूर्वजांनी वासना-क्षयावर कटाक्ष ठेवला. हजारो वर्षांपासून चालत असलेले नांगर आणि झोपड्या आम्ही टिकविल्या. शिक्षणपद्धतीही पूर्वापार होती तशीच राहिली. परस्परांचा प्राण घेणारी व्यावसायिक चढाओढ आम्ही टाळली. सर्व आपापला धंदा करीत. न्याय्य किंमत देण्यात येई. आम्ही यंत्रांचा शोध करू शकत नव्हतो असे मुळीच नाही. पण आमच्या पूर्वजांची खात्री होती की यंत्रांच्या भानगडीत पडले की माणसाच्या नशिबी गुलामगिरी आल्याशिवाय राहणार नाही. सबब हातापायांनी जे काम करता येईल तेच करावे असा त्यांनी विचार केला. त्यातच खरे सुख आणि आरोग्य आहे.

मोठ्या शहरांची स्थापना म्हणजे कटकटीला आमंत्रण देणे होय, हे त्यांनी ओळखले. लोक तेथे सुखी होणार नाहीत. तेथे धूर्तांच्या टोळ्या आणि वेश्यांच्या गल्ल्या निर्माण होतील. गरीबांची लूटमार होईल. म्हणून ते लहानलहान गावांवरच संतुष्ट होते. राजाच्या तरवारीपेक्षाही नीतिबल हे जास्त श्रेष्ठ असल्याचे त्यांच्या प्रत्ययास आले; म्हणूनच त्यांनी राजापेक्षा ऋषींचा अधिक मान केला.

८. सर्वकल्याणकारी जीवनपद्धती

माझ्या मते भारताचीच नव्हे तर संपूर्ण जगाची अर्थव्यवस्था, कोणालाही अन्न-वस्त्राची विवंचना पडणार नाही अशी असावी. प्रत्येकाला ते प्राप्त करता येण्याइतपत काम असावे, मिळावे. प्राथमिक जीवनोपयोगी जिन्नसा निर्माण करण्याची साधने जनतेच्या नियंत्रणात असतील तरच हे शक्य होईल. ईश्वरदत्त हवा-पाण्यासारखी ती सर्वांना सहज उपलब्ध असावी. कोणत्याही स्थितीत ती शोषणाकरता करण्यात येणाऱ्या व्यापाराची साधने बनू नयेत. त्यांवर (त्या साधनांवर) इतर कोणत्याही उपऱ्या राष्ट्राचा वा समुदायाचा ताबा असणे अन्यायाचे होईल. आमच्या देशात आणि जगात इतरत्र आम्हाला जी गरीबी दिसते ती या अमर सिद्धांताच्या उपेक्षेचा परिणाम होय.

मी अर्थशास्त्राला नीतिशास्त्राहून वेगळे मानीत नाही. वैयक्तिक किंवा राष्ट्रीय नीतिमत्तेच्या चिंध्या उडविणारे अर्थशास्त्र पापी आहे असे मी म्हणेन. उदाहरणार्थ, एखाद्या राष्ट्राने दुसऱ्याचे शोषण करणे मान्य करणारे अर्थशास्त्र अनैतिक आहे. जे मजुरांना न्याय्य मजुरी न देता त्यांचे शोषण करतात अशांनी बनविलेल्या वस्तूंचा उपयोग करणे पाप ठरेल. अशा खोट्या अर्थशास्त्राला कवटाळून आम्ही फक्त मृत्यूला आमंत्रण देऊ शकतो. खरे अर्थशास्त्र तर न्यायपूर्ण राहील आणि सर्वांचे – त्यांत दुर्बळही आलेच – समान कल्याण करण्याचा प्रयत्न करणारे असेल.

सर्वांचा सामाजिक दर्जा सारखाच असेल अशी स्थिती निर्माण करण्याची माझी इच्छा आहे. मजुरांना उच्चभ्रू लोकांनी कैक वर्षे आपणापासून अंतरावर ठेवले आहे. त्यांना कनिष्ठ मानून त्यांना शूद्र म्हटले गेले. मी मात्र शेतकरी, विणकर आणि शिक्षक यांच्या मुलांत भेदभाव कदापि होऊ देणार नाही.

विधायक कार्यक्रमाच्या या पैलूत अहिंसापूर्ण स्वराज्याची गुरुकिल्ली आहे. आर्थिक समतेसाठी काम करणे म्हणजे भांडवलदार आणि मजूर यांच्यातील संघर्ष मिटवणे. याकरिता मूठभर धनिकांच्या हाती गोळा झालेली संपत्ती कमी करून तिचा ओघ अर्धपोटी-अर्धनग्न लोकांकडे वळवावा लागेल. त्यांच्यातील भयावह अंतर कायम असेतो अहिंसापूर्ण राज्यव्यवस्था निर्माण होणे अशक्य आहे. स्वतंत्र भारतात पराकोटीच्या श्रीमंतांच्या हाती जेवढी सत्ता असेल तेवढीच गरीबांच्याही हाती असेल. मग दिल्लीतील महाल आणि शेजारीच असलेल्या मोडक्यातोडक्या झोपड्या यांमधील आजचा दुःखद फरक क्षणमात्र टिकू शकणार नाही. जर श्रीमंत लोक या गोष्टीला स्वखुशीने राजी न होतील तर आमच्या देशात रक्तरंजित क्रांती झाल्याशिवाय राहणार

नाही, याबद्दल आम्ही मुळीच शंका बाळगू नये.

आपल्या स्वाभाविक गरजा भागविण्यापुरती प्रत्येकाजवळ संपत्ती असणे म्हणजे आर्थिक समता. निसर्गतः एखाद्याची भूक पाच तोळ्यांची असेल आणि दुसऱ्याची वीस तोळ्यांची, तर प्रत्येकाला पचनशक्तीनुसार मिळावे. अहिंसक समाजापुढे दुसरा आदर्श असू शकणार नाही. तो आम्हाला भलेही न गाठता येवो, पण त्याच्या जितके जवळ जाऊ तेवढेच समाधान आम्हाला मिळेल; त्या प्रमाणातच अहिंसा प्रस्थापित होईल.

या समताधर्माचे पालन एकट्यानेसुद्धा – इतर न करतील तरी – करता येईल. धर्माचे पालन करण्याचे ठरल्यावर, इतरांनी धर्मपालनास सुरुवात करण्याची वाट पाहण्याची गरज नाही. ध्येयाचे टोक साध्य होणारच नाही, मग उगीच कां त्याग करावा, या भ्रामक युक्तिवादाने निष्कारण आमच्या प्रगतीस अडथळा होतो.

अहिंसेद्वारा आर्थिक समता कशी आणता येईल? प्रथम, हा आदर्श मानणारांनी स्वतःच्या जीवनात आवश्यक बदल करावा. गरीबांकडे पाहून स्वतःच्या गरजा कमी कराव्या. पैसे कमावण्याच्या शक्तीला नियंत्रणात ठेवावे. जे कमवायचे ते प्रामाणिकपणे मिळवायचे, असा निश्चय करावा. सट्टेबाजीला तिलांजली द्यावी. घर साधे असावे आणि संपूर्ण जीवन संयमी असावे. अशा प्रकारे स्वतःची बैठक कायम झाली म्हणजे मग शेजाऱ्यापाजाऱ्यांत या आदर्शाचा प्रचार करावा.

धनिकांनी विश्वस्तांप्रमाणे वागण्याची कल्पना आर्थिक समानतेच्या मुळाशी आहे. या सिद्धांताप्रमाणे कोणत्याही श्रीमंताला शेजाऱ्याहून एक छदामही अधिक बाळगण्याचा अधिकार नाही. मग, त्याच्याजवळ जे जास्त आहे ते त्याच्याकडून हिसकावून घ्यायचे काय? त्यासाठी हिंसा करावी लागेल. आणि हिंसेने हे शक्य झाले तरी त्यात समाजाचा फायदा नाही. उलट समाज एका उत्पादनक्षम माणसाला पारखा होईल. म्हणून यावर इलाज हाच की त्या श्रीमंताने स्वतःच्या न्याय्य गरजा भागून जे उरेल ते गरीबांचे विश्वस्त म्हणून बाळगावे आणि त्या दृष्टीने व दिशेनेच त्याचा वापर करावा. असे केल्यानेच त्याच्या कमाईला धवलता प्राप्त होईल. त्याचे साहससुद्धा अहिंसात्मक राहील. असे होऊ शकल्यास संघर्षाशिवाय एक मूक समाजक्रांती घडून येईल.

'अहो, मनुष्यस्वभावात एवढा बदल झाल्याचे इतिहासात एखादे उदाहरण आहे काय?' – असा प्रश्न विचारला जाईल. वैयक्तिक उदाहरणे तर उपलब्ध आहेतच. मोठ्या प्रमाणावर व्यापक समाजाने असे केल्याचे कदाचित् दाखवून देता येणार नाही. याचा एवढाच अर्थ की अहिंसेचा प्रयोग आजवर मोठ्या प्रमाणावर झाला नाही.

अहिंसा व्यक्तीपुरतीच मर्यादित असते, त्याच पातळीवर ती विकसित करता येते, या गैरसमजाने आमची पक्की पकड घेतली आहे. पण तसे नाही. अहिंसा हा सामाजिक धर्म असून त्या दृष्टीने तिचा विकास शक्य आहे, हे समजावून सांगण्याकरिता माझा प्रयोग व प्रयत्न आहे. केवळ नवीन आहे म्हणून ही गोष्ट कचऱ्याच्या टोपलीत टाका, असे निदान आज तरी कोणी म्हणणार नाही. ती कठीण आहे, म्हणून अशक्य आहे हे म्हणणेही योग्य होणार नाही. कारण अनेक नव्या गोष्टी जुन्या व जुन्या नव्या होताना आम्ही पाहत आहोत. अहिंसेच्या क्षेत्रात साहसाला पुरेपूर वाव आहे असे माझे मत आहे, आणि सर्व धर्मांच्या इतिहासात या गोष्टीचे पुरेसे दाखले आढळतील.

प्रयत्नांची पराकाष्ठा करूनही श्रीमंतांनी विश्वस्तांप्रमाणे वर्तण्यास इन्कार केला आणि ते भुकेलेल्या कोट्यवधी लोकांना अहिंसेचे नाव घेऊन अधिकाधिक चेपीत राहिले तर मग कसे? या प्रश्नाचे उत्तर शोधण्याच्या प्रयत्नातूनच अहिंसात्मक असहयोगाच्या कल्पनेचा जन्म झाला. गरीबांच्या सहकार्याशिवाय कोणीही पैसा मिळवू शकत नाही. हिंसाशक्तीच्या जाणिवेची आम्हाला पूर्वजांनी लाखो वर्षांची जुनी देणगी दिली आहे. चतुष्पाद जीव दोन हात व दोन पायाच्या प्राण्यात साकार झाला तेव्हापासून त्यात अहिंसक शक्ती पण प्रकटली. या नव्या शक्तीची जाणीवही दिवसेंदिवस वाढू लागली. ही जाणीव जर गरीबांत पसरेल तर, ज्या आर्थिक विषमतेचे आज बळी ठरले आहेत तिचा ते अहिंसक मार्गाने अवश्यमेव प्रतिकार करू शकतील.

विश्वस्तव्यवस्था कायदेशास्त्राची एक कल्पना तेवढी आहे, व्यवहारात तिचे कोठे दर्शन घडत नाही असे म्हणता येईल. पण आम्ही तिचा विचार करू आणि त्या दिशेने प्रयत्न करू तर कायद्यापेक्षा प्रेम जास्त सबळ आहे हे सहज पटेल. भलेही ही कल्पना व्यवहारात आणणे अशक्य असेल, पण तिचा पिच्छा पुरवला तर इतर कोणत्याही पर्यायाच्या मानाने समतेच्या मार्गावर आपण जास्त मजल गाठू, हे निर्विवाद.

राज्यसत्ता हिंसेच्या सहाय्याने भांडवलशहांना नष्ट करण्याचा प्रयत्न करेल तर ती स्वतःच हिंसेच्या जाळ्यात अडकेल आणि मग अहिंसेचा विकास करणे तिला अशक्य होईल. राज्यसत्ता हिंसेचे संघटित आणि सघन रूप आहे. माणसात आत्मा असतो, तसा राज्यसत्तेत नसतो. ती एखाद्या जड यंत्राप्रमाणे आहे, म्हणून तिला हिंसेपासून परावृत्त करताच येत नाही. कारण, हिंसेतूनच तर तिचा जन्म झालेला असतो. म्हणून विश्वस्त कल्पनेवर माझा कटाक्ष आहे. लोक स्वेच्छेने जर विश्वस्तांप्रमाणे वागू लागले तर मला अत्यानंद होईल, पण अवश्य तर राज्यसत्तेद्वारा कमीत कमी प्रमाणात हिंसेचा आश्रय घेऊन त्यांची संपत्ती घ्यावी लागेल. माझे मत आहे की राज्यसत्तेच्या हाती फाजील शक्ती

केंद्रित होऊ नये, त्याऐवजी विश्वस्त कल्पनाच फोफावलेली जास्त बरी. पण राज्याची मालकी अपरिहार्यच असेल तर तिचे प्रमाण किमान असावे, असे मी म्हणेन.

अहिंसात्मक समाजाचे संस्थापन व संचालन अशक्य आहे असे म्हणण्याची प्रथा पडली आहे. मला हे म्हणणे मान्य नाही. एखाद्या कुटुंबात बाप स्वतःच्या अपराधी मुलाच्या तोंडात भडकावून देतो तेव्हा मुलाला उलट बापाच्या तोंडात द्यावेसे वाटत नाही. त्या प्रहारामागे त्याला आपल्या पित्याचे दुःखित मन दिसून येते. मला अभिप्रेत असणाऱ्या समाजव्यवस्थेचे हे एक लहान रूप आहे. आणि जे कुटुंबाकरता खरे आहे ते समाजाकरताही खरे आहे, कारण समाज एक विराट कुटुंबच आहे.

अहिंसा हा केवळ व्यक्तिगत गुण नसून तो सामाजिक पण आहे, तेव्हा इतर गुणांप्रमाणेच त्याचा परिपोष व्हावा. समाजाचे अधिकांश नियमन अहिंसाप्रधानच असते. म्हणून मला वाटते की ते देशव्यापी, विश्वव्यापी बनावे.

माझी विश्वस्त कल्पना कामचलाऊ नाही. माझ्या मनातले खरे लपविण्याकरिता म्हणून रचलेले पांघरूण तर ते नाहीच. इतर सिद्धांत विरून गेले तरी हा कायम राहील, कारण त्याच्या बुडाशी धर्म आणि तत्त्वज्ञान आहे. श्रीमंतांनी त्याचे पालन न केल्याने ते तत्त्वच खोटे आहे असे ठरणार नाही; फक्त त्यांचे दुबळेपण सिद्ध होईल. अहिंसेच्या सिद्धांताशी इतरांचा मेळ बसतच नाही. त्याची खुबी अशी की अन्यायी स्वहस्ते आपला अन्याय दूर न करील तर त्याने त्याचाच नाश होईल. कारण, अहिंसात्मक असहयोगापुढे एक तर त्याला चूक कबूल करून ती सुधारणे भाग पडेल, किंवा तो एकटा पडेल.

आपण पैसा कशा तऱ्हेने कमावतो याचा श्रीमंत तर सोडाच, बहुतांश व्यक्ती मुळी विचारच करीत नाहीत. अहिंसक प्रयोग करताना एवढा भरवसा तर हवा की कोणी कितीही पतित असो, त्याचा कुशलता आणि सहानुभूती यांच्या सहाय्याने उद्धार शक्य आहे. माणसातील दैवी अंश जागृत केल्यास अनुकूल परिणामाची अपेक्षा करावयास हवी. प्रत्येकाने आपले शक्तिसर्वस्व स्वार्थाऐवजी सर्वांच्या कल्याणाकरिता राबविले तर सर्वत्र सुखसमृद्धी असणार नाही काय? ज्या समानतेत एखाद्याला स्वतःच्या शक्ति-बुद्धीचा पूर्ण उपयोग करता येणार नाही असली निर्जीव, यांत्रिक समानता मला अभिप्रेत नाही. असा समाज शेवटी नष्ट झाल्याशिवाय राहणार नाही. *'तेन त्यक्तेन भुञ्जीथाः'* या मंत्रात अगाध ज्ञान भरले आहे. शेजाऱ्यांकडे पूर्ण दुर्लक्ष करून स्वतःपुरते जगण्याची आजची जी तऱ्हा आहे त्याऐवजी सर्वकल्याणकारी व्यवस्था जर आम्हाला हवी असेल तर त्याचा वर सुचविलेला मार्गच एकमेव आहे.

९. समाजवाद, साम्यवाद आणि सर्वोदय

भांडवलदार भांडवलाचा दुरुपयोग करीत आहेत हे लोकांच्या लक्षात आले तेव्हा समाजवादाचा उदय झाला, हा गैरसमज आहे. हा अतिप्राचीन वाद ईशावास्य उपनिषदाच्या पहिल्या श्लोकात स्पष्टरूपात सापडतो. *(ईशावास्यमिदं सर्वं यत् किंच जगत्यां जगत् । तेन त्यक्तेन भुञ्जीथा: मा गृध: कस्यस्विद् धनम् ।)* मात्र हे खरे की जेव्हा काही लोकांचा हृदयपरिवर्तनावरील विश्वास उडाला तेव्हा वैज्ञानिक समाजवादाचे 'शास्त्र' निर्माण झाले. हे शास्त्र जो प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करीत आहे तोच सोडविण्यात मी लागलेलो आहे. अर्थात् माझा प्रयत्न अहिंसाधिष्ठित आहे.

खरा समाजवाद आम्हाला आमच्या पूर्वजांपासून प्राप्त झाला आहे. *'सबै भूमि गोपाल की'* या सिद्धांतात 'तुझे-माझे'ला जागाच नाही. हा भेद माणसाने निर्माण केला आणि म्हणूनच हा भेद तो नष्टही करू शकतो. गोपाल म्हणजे भगवान. आजच्या भाषेत राज्य अथवा जनता. आज जमीन जनतेची नाही हे खरे, पण हा त्या शिकवणीचा दोष नसून तिचा त्याग करणाऱ्या आमचा आहे. रशिया वा इतर कोणताही देश जितका या ध्येयानजीक पोचू शकतो तेवढेच आम्ही पण पोचू शकतो, यात मला शंका नाही; आणि तेही हिंसेचे सहाय्य न घेता. धनिकांची संपत्ती जुलमाने हरण न करता चरखा आणि त्यातून निघणाऱ्या सगळ्या गोष्टींचा आम्ही स्वीकार केल्यास आमचे ध्येय सहज साध्य होईल. हिंसक अपहरणाची जागा घेऊ शकणारे चरखा हे अमोघ साधन आहे. जमीन आणि इतर सर्व संपत्ती, जो त्याकरिता राबेल त्याचीच आहे किंवा असते (याचे चरखा हे प्रतीक आहे). दु:ख या गोष्टीचे आहे की शेतकरी आणि मजुरांच्या हे लक्षात आलेले नाही, अथवा हवे तर असे म्हणा की त्यांच्या लक्षात येऊ दिले गेलेले नाही.

कनिष्ठतम अथवा निर्बलतम लोकांबाबत जुलूम-जबरदस्तीने सामाजिक न्यायाचे पालन होणे शक्य नाही, असे मला नेहमी वाटत आले आहे. अत्यंत दबलेल्या लोकांनाही योग्य शिक्षण दिल्यास ते सर्व प्रकारच्या अन्याय-अत्याचाराचा अहिंसक साधनांद्वारा प्रतिकार करू शकतील असा माझा विश्वास आहे. अहिंसक असहकार हेच याचे प्रमुख साधन आहे. क्वचित् सहकारासारखे असहकार हेही कर्तव्य ठरू शकते. स्वत:वर असहायता अथवा गुलामी ओढवून घेण्याबाबत सहकार करण्याचे कोणावरही बंधन असू शकत नाही. दुसऱ्याच्या प्रयत्नाने जे स्वातंत्र्य मिळते ते तो प्रयत्न थांबताच विसर्जितही होईल. ते खरे स्वातंत्र्य नव्हे, पण जेव्हा अगदी शेवटल्यालासुद्धा अहिंसक असहकाराच्या सहाय्याने स्वातंत्र्य प्राप्त करून घेण्याची कला साध्य होईल, तेव्हा

त्याला नवा प्रकाश मिळाल्याचा अनुभव आल्याशिवाय राहणार नाही.

हिंसेने जे कधीच साध्य होणे शक्य नाही ते अहिंसेच्या सहाय्याने साध्य होऊ शकते, असा माझा पक्का विश्वास आहे. तशाने शेवटी अत्याचाऱ्यांचेसुद्धा हृदय-परिवर्तन होईल. आम्ही भारतात अजून अहिंसेला अजून योग्य संधीच दिलेली नाही. तरी, ज्या थोड्या प्रमाणात आम्ही तिचा अवलंब केला त्यानेही आम्हाला आश्चर्यकारक यश प्राप्त झाले आहे.

समाजवाद आणि साम्यवाद हे पाश्चिमात्य सिद्धांत ज्या विचारावर आधारित आहेत, त्यापेक्षा आमच्या कल्पना मूलत: फार भिन्न आहेत. त्यांच्या मते स्वार्थ हा माणसाचा स्थायी भाव आहे. मला हे मत मान्य नाही. स्वत:त उद्भूत होणाऱ्या पाशवी ऊर्मींवर माणूस विजय मिळवू शकतो, हाच तर पशूंत आणि माणसांत महत्त्वाचा फरक आहे. म्हणूनच म्हणायचे की (प्रयत्न केल्यास) माणसाला हिंसा आणि स्वार्थ यांच्यावरही विजय मिळविता येणे शक्य आहे. कारण स्वार्थभावना व हिंसा पशु-स्वभावाची अंगे आहेत; मनुष्यात असलेल्या अमर आत्म्याची नव्हेत. हिंदुधर्माचा हा मूलभूत सिद्धांत असून त्याला अनेक तपस्व्यांच्या तपस्येची पार्श्वभूमी प्राप्त आहे. यामुळेच आमच्याकडे अनेक संतांनी या सिद्धांतापायी शरीर झिजविले व प्रसंगी प्राणार्पणही केले. एवंच आमच्याकडील समाजवाद वा साम्यवाद अहिंसेच्या, तसेच भांडवलदार व कामगार, जमीनदार व शेतकरी आदी सर्वांच्या दरम्यानच्या गोडीगुलाबीच्या सहकार्याच्या पायावरच उभा करावयास हवा.

साम्यवादाचा सारांश आहे, वर्गहीन समाज. हा आदर्श नि:संशय उत्तम आहे. त्याकरिता आम्ही झटलेही पाहिजे. पण हिंसेच्या मार्गांनी जाणाऱ्याची वाट माझी नव्हे. जन्मत: आम्ही सर्व समान आहोत, या ईश्वरी संकेताची आम्ही नेहमी अवज्ञा करीत आलो आहोत. उच्चनीच-भावना असणे वाईट, हे मला मान्य आहे. पण तलवारीच्या धाकाने तिला पळवून लावण्यावर माझा विश्वास नाही. तलवार हे मन:शुद्धीचे साधन असू शकत नाही. जबरदस्तीने लादला जाणारा साम्यवाद भारताला रुचणार नाही. त्याच्या प्रकृतिधर्माशी तो जुळत नाही. संपत्तीची वैयक्तिक मालकी संपुष्टात आणणे हा त्याचा उद्देश आहे. म्हणजे आमच्या अर्थव्यवस्थेत अपरिग्रहाला सुप्रतिष्ठित करणे आमचे काम आहे. लोकांनी या आदर्शाचा स्वेच्छेने स्वीकार केला किंवा त्यांना शांतिपूर्वक समजावले जाऊन ते त्यांना पटले, तर यापेक्षा अधिक चांगले काय असू शकेल? हिंसेच्या पायावर कोणतीही टिकाऊ समाजव्यवस्था उभारणे शक्य नाही असे मला ठामपणे वाटते.

समाजवादी-साम्यवादी लोक म्हणतात की समानतेकरिता ताबडतोब असे आम्हाला काही करता येणार नाही, फक्त प्रचार शक्य आहे. त्यामुळे त्यांचा भर द्वेष, वैर आदी निर्माण करून त्यांचा परिपोष करण्यावर आहे. एकदा सत्ता आमच्या हाती आली म्हणजे नंतर आम्ही जनतेकडून समानतेच्या तत्त्वाची अंमलबजावणी करवून घेऊ, असे ते म्हणतात. माझ्या योजनेत प्रजेने राज्याचे हुकूम पाळायचे नसून राज्यकर्त्यांना प्रजेच्या इच्छांना मूर्त स्वरूप द्यावे लागणार आहे. प्रेमाच्या बळावर मी आपले म्हणणे लोकांना पटवून देईन आणि अहिंसेच्या मार्गाने समानता प्रस्थापित करीन. मात्र सर्व समाज माझ्या मताचा होईपावेतो मी वाट पाहणार नाही. मी स्वत:वरील प्रयोगापासूनच सुरुवात करीन. मी स्वत: पन्नास मोटारी तर सोडाच, पण निव्वळ दहा बिघे जमिनीचा मालक असलो तरी मला माझ्या कल्पनेतील समानतेला जन्म देणे कठीण जाईल. त्याकरिता मला स्वत:ला गरीब बनावे लागेल. गेल्या पन्नास किंवा अधिक वर्षांपासून मी हेच करीत आलो आहे.

म्हणून मी स्वत:ला कट्टर कम्युनिस्ट मानतो. श्रीमंतांनी दिलेल्या मोटारी अथवा सुखसोयींचा मी उपयोग करीत असेन, पण मी त्यांच्या कह्यात नाही. जनतेच्या हिताकरिता त्यांचा त्याग करणे अवश्य असेल तेव्हा क्षणात मी त्यांचा त्याग करू शकेन.

समाजवादाची सुरुवात समाजवाद्यापासून होते. असा एक जरी समाजवादी असला तरी एकाचे दहा आणि दहाचे शंभर (एकावर एक शून्ये ठेवून) होऊ शकतील, पण सुरुवातीलाच शून्य असले तर पुढे हवी तेवढी शून्ये ठेवली तरी शेवटी शून्यच राहील.

समाजवाद स्वत: शुद्ध आहे, त्यामुळे त्याच्या प्राप्तीचे साधनही शुद्धच असावे लागेल. अनिष्ट साधनांनी अनिष्टच पदरी पडणे शक्य आहे. राजाला ठार करून राजा व प्रजा एकजीव कसे होणार? मालकाचे मुंडके उडवून मजूर मालक बनू शकणार नाहीत.

असत्याने सत्य कसे प्राप्त होणार? सत्यप्राप्तीकरिता सत्यमार्गानेच जावे लागेल. सत्य आणि अहिंसा ही अविच्छिन्न आहेत. म्हणून मी नेहमी म्हणतो की त्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. शंभर टक्के पवित्रतेशिवाय सत्य आणि अहिंसा संभवतच नाहीत. काया आणि मन यांची अपवित्रता लपविताक्षणी असत्य आणि हिंसा डोके वर काढतात. म्हणून सत्यवादी, अहिंसक आणि पवित्र व्यक्तीच भारतात समाजवादाची स्थापना करू शकेल. आज जगात एकही देश खरा समाजवादी असल्याचे मला माहीत

नाही. मी उल्लेखिलेल्या साधनांचा अवलंब केल्याशिवाय असा समाज उभा करणे अशक्य आहे.

वर्गयुद्ध भारताच्या प्रकृतीला न मानवणारे आहे. न्याय आणि सर्वांना समान हक्क असावेत अशा प्रकारचा उदार साम्यवाद निर्माण करण्याची भारतात क्षमता आहे. माझ्या कल्पनेतील रामराज्यात राजा आणि रंक दोघांचेही हक्क सुरक्षित राहतील.

शोषित आणि शोषक यांच्यात सहकार्य असावे असे मी कधीच म्हटलेले नाही. शोषण आणि शोषणाची इच्छा शिल्लक असेतो सहकार्य अशक्य आहे. मात्र सर्व भांडवलदार आणि जमीनदार स्वत:च्या एखाद्या अपरिहार्य गरजेपोटी शोषक बनले आहेत असे मला वाटत नाही. त्यांच्या आणि सामान्य जनसमुदायाच्या हितात अपरिहार्य विरोध आहे असेही माझे मत नाही. कोणत्याही प्रकारचे शोषण शोषिताच्या सहकार्यावर आधारलेले असते – मग ते सहकार्य स्वेच्छेने दिलेले असो वा लाचारीने. पण स्वार्थ आड येत असल्यामुळे नाइलाजाने ते मान्य केले जाते, आणि आम्ही स्वहस्ते स्वत:ला शृंखलाबद्ध करून घेतो. हे बंद झाले पाहिजे. याकरिता भांडवलदार आणि जमीनदार यांना नष्ट करण्याची गरज नाही; फक्त त्यांचे व सामान्यांचे आज जे (अप्रिय) संबंध आहेत त्यांना शुद्ध आणि निरामय बनविण्याची गरज आहे. ज्यांना वर्गयुद्ध अपरिहार्य वाटते त्यांनी अहिंसेला पुरेपणी समजून घेतलेले नाही; असलीच तर त्यांची अहिंसेशी फार तर वरपांगी तोंडओळख असावी.

पश्चिमेकडून येणाऱ्या मोहक उद्घोषांपासून आम्ही स्वत:ला वाचवले पाहिजे. आमची स्वत:ची अशी विशिष्ट परंपरा नाही काय? आमच्याकडील भांडवलदार-मजुरांमधील संघर्ष आम्ही आपल्या रीतीने सोडवू शकत नाही काय? आमच्या वर्णाश्रमव्यवस्थेत ही सर्व उत्तरे सापडत नाहीत काय? याबाबतीत जे जे पश्चिमेकडून आले ते सर्व हिंसाप्रचुर आहे. मी त्याचा विरोध करण्याचे कारण एवढेच की त्या मार्गाच्या टोकाशी असलेला नाश मला स्पष्ट दिसत आहे. पश्चिमेकडील काही विचारवंतांच्याही हे लक्षात आले असून ते भयभीत झाले आहेत. तिकडे माझी जी काही प्रतिष्ठा आहे तिचे कारणच हे की मी हिंसा आणि शोषण या दुश्चक्रातून सुटण्याच्या (अहिंसक) मार्गाच्या सतत शोधात आहे. मी त्यांच्या समाज-व्यवस्थेचा सहानुभूतिपूर्वक अभ्यास करणारांपैकी एक आहे, आणि त्यांच्या बेचैनी आणि संघर्षामागे सत्य शोधण्याची प्रामाणिक इच्छा आहे, अशी माझी खात्री झाली आहे. त्यांची भावना आदरणीय आहे. आम्हीही आमच्या पूर्वापार संस्थांचे शास्त्रशुद्ध संशोधन केल्यास जग ज्या समाजवाद-साम्यवादाचे कोरडे स्वप्न पाहत आले आहे

त्यापेक्षा कितीतरी यथार्थ आणि सुंदर समाजवादाचा विकास आम्ही करू शकू. गरीबीवर पाश्चिमात्य लोकांनी शोधून काढलेल्या समाजवादापेक्षा निराळे, अधिक चांगले उत्तर संभवत नाही, हा भ्रम फार चुकीचा आहे.

संघर्षाचे प्रमाण कमीत कमी असणाऱ्या मार्गाने मी जावे असे माझी अहिंसा मला सांगते. शेतकरी-मजुरांना आत्मशक्तीची जसजशी जाणीव होईल तसतसा भांडवलदार-जमीनदारांतील वाईटपणा कमी होऊ लागेल. आम्हाला आमच्या न्याय्य जीवन-गरजा – मुलाबाळांना पोटभर अन्न, वस्त्र, शिक्षण आदी – भागविण्याइतपत जर मजुरी मिळणार नाही तर आम्ही काम करणार नाही, असे मजूर म्हणतील तर बिचारा जमीनदार करूच काय शकतो? खरे म्हणजे जो उत्पादन करतो तोच त्या उत्पादनाचा मालक होय. श्रमजीवी हुशारीने एक होतील तर त्यांच्या एकजुटीचा कोणीच सामना करू शकणार नाही. म्हणूनच मला वर्गयुद्धाची आवश्यकता भासत नाही. मला तसे वाटले असते तर मी अवश्यमेव वर्गयुद्धाचा प्रचार करून त्याचे शिक्षण लोकांना दिले असते. प्रश्न याची-त्याची टक्कर कशी लावून द्यावी हा नसून मजुरांना त्यांच्या स्थितीची (शक्तीची) जाणीव करून देण्याचा आहे. शेवटी जगात श्रीमंत मोजकेच आहेत ना ! आपल्या शक्तीचे भान झाल्यावरही जर मजूरवर्ग प्रामाणिकपणेच वागण्याचे ठरवील तर श्रीमंत पण मग तसेच वर्तणार. त्यांच्यात भांडण लावून वर्गद्वेषाला उत्तेजन दिल्यास अनेक अनिष्ट परिणामांना तोंड द्यावे लागेल. कसेही करून संघर्षाच्या दुष्ट- चक्राला टाळलेच पाहिजे. संघर्ष हे दुर्बलतेचे, हीनतेचे लक्षण आहे. मजुराने आपले स्वरूप ओळखताक्षणी धनिक सरळ होतील, कारण श्रम धनापेक्षा केव्हाही श्रेष्ठ आहे.

भांडवलदार जर काळाच्या या अंगुलिनिर्देशाला ओळखून स्वतःच्या संपत्तीवरील त्यांचा अधिकार ईश्वरदत्त आहे हा विचार सोडून देतील तर आज उजाड असलेल्या आमच्या सात लाख खेड्यांत नंदनवन निर्माण होऊ शकेल. अशाने ते गमावणार काहीच नाहीत; उलट त्यांना सर्व काही प्राप्त होईल अशी माझी खात्री आहे. आम्हाला दोनपैकी एका मार्गाची निवड करायची आहे. एक तर भांडवलदारांनी स्वेच्छेने अतिरिक्त संग्रह सोडावा, अन्यथा ज्या असंतोषाच्या भडक्याला कोणतीही सैन्यशक्ती आवरू शकणार नाही अशा गोंधळास तोंड देण्यास तयार असावे. मला अजून आशा आहे की भारत असंतोषाचा भडका टाळण्यात यशस्वी होईल.

१०. अहिंसक जीवनाची योजना

ईश्वराच्या अनंत नावांपैकी दरिद्रनारायण हेही एक आहे. त्याचा अर्थ आहे, गरीबांतील हृदयस्थ ईश्वर. भुकेला माणूस सर्वप्रथम भूक कशी शमविता येईल याचाच विचार करतो. भाकरीच्या एका तुकड्याकरिता अवश्य तर तो स्वतःच्या स्वातंत्र्यादी सर्वांचा त्याग करील. भारतात आज लाखो लोक अशा स्थितीत आहेत. त्यांच्या लेखी 'स्वातंत्र्य', 'ईश्वर' अशासारख्या शब्दांना काहीच अर्थ नाही. त्यांना ते कर्णकटू वाटतात. त्यांच्यात स्वराज्यप्राप्तीबद्दल भावना निर्माण करायची असेल तर त्यांना घरबसल्या करता येईल असे, निदान पोटापुरते काम द्यावे लागेल.

हातकताई आणि विणाई यांच्या पुनरुज्जीवनाने भारताच्या आर्थिक आणि नैतिक परिस्थितीचेही पुनरुज्जीवन होईल, अशी माझी खात्री आहे. शेतीला असा कोणता तरी जोडधंदा कोट्यवधी लोकांना हवा आहे. कैक वर्षांपूर्वी कातण्याचा कुटीरोद्योग त्यांना उपलब्ध होता. जर त्यांना उपासमारीपासून वाचवायचे असेल तर त्यांना आपापल्या घरी पुन्हा कताई सुरू करता यावी यासाठी समर्थ बनवावे लागेल, आणि प्रत्येक गावात विणाईची व्यवस्था करावी लागेल.

चरखा हा केंद्रबिंदू कसा ठरतो?

जवळपास काहीही खर्च न करता आणि फाजील डामडौलाशिवाय अत्यंत सहज रीतीने आमच्या गरीबीला दूर करण्याची अमोघ शक्ती चरख्यात आहे, असा माझा दावा आहे. चरखा तर घरोघर असावयास हवा. तो राष्ट्राच्या समृद्धीचे, आणि म्हणूनच स्वातंत्र्याचेही प्रतीक आहे.

चरखा हे व्यापारी युद्धाचे (चढाओढीचे) प्रतीक नसून व्यापार क्षेत्रात शांती निर्माण करण्याचे प्रतीक आहे. सद्भावना आणि स्वावलंबनाचा त्याचा संदेश आहे. चरख्याचे रक्षण करण्याकरिता कोणतीही जलसेना लागणार नाही. फक्त लक्षावधी लोकांनी धर्मकृत्य म्हणून घरोघरी – अन्न शिजवितात त्याप्रमाणे – सूत काढले म्हणजे पुरे. करू नये ते करून आणि करायला हवे ते न करून मी इतके प्रमाद केले आहेत की भावी पिढ्या माझ्या नावाने बोटे मोडण्याचा संभव आहे. पण चरख्याचा पुनरुद्धार सुचविल्याबद्दल त्या मला आशीर्वादच देतील. मी माझे सर्व काही चरख्यावर पणाला लावले आहे, कारण सुताच्या प्रत्येक तारेत शांती, सद्भाव आणि प्रेम भरलेले आहे. चरख्याचा त्याग केल्यामुळेच भारत गुलाम बनला, अतएव त्याच्या पुनरुद्धारानेच आम्हाला खरे स्वातंत्र्य मिळेल.

सध्या भारतात मोठमोठे यंत्रोद्योग सुरू करण्याची लाट असल्यामुळे माझ्या या विचारसरणीबाबत अनेक साशंक आहेत. शंकेखोर म्हणतात की मोठ्या यंत्रोद्योगामुळे जे दारिद्र्य निर्माण होते ते अनिवार्य आहे, म्हणून ते ज्याच्या वाट्यास जात असेल त्याने ते सहनच करावयास हवे. सहन करण्याचे तर दूर राहो, माझ्या मते ते मुळात अपरिहार्यच नाही. निव्वळ फुरसतीच्या वेळी जरी लोकांनी सूत काढले तरी भारताची वस्त्राची संपूर्ण गरज सुखाने भागू शकते, हे अखिल भारत चरखा संघाने सिद्ध केले आहे.

चरख्याला मी सामान्यजनांच्या आशांचे प्रतीक मानतो. चरखा हे ग्रामीणांचे उत्पन्नाचे जोडसाधन होते. विधवांचे तो आश्रयस्थान होता. तो ग्रामीणांचे आळसापासून रक्षण करी, कारण चरखा म्हटला की त्याच्यामागोमाग पिंजण, पेळू, ताणा करणे, खळ लावणे, विणकाम, रंगाई अशी कैक कामे उभी राहत. त्यामुळे गावातील सुतार-लोहारांनाही काम मिळे. चरख्याच्या भरवशावर सात लाख खेडी स्वावलंबी होती. चरखा जाताक्षणी तेलघाणी आदी इतर ग्रामोद्योगांचाही लोप झाला. लुप्त उद्योगांच्या जागी नवे उद्योग निर्माण झाले नाहीत. त्यामुळे ग्रामोद्योग, ग्रामीणांची उत्पादक प्रतिभा आणि त्यातून होणारी प्राप्ती, ही सर्व निकालात निघाली.

म्हणून ग्रामीणांना जर पूर्ववत् समृद्ध व्हायचे असेल तर चरखा आणि त्याच्याशी संलग्न असणाऱ्या सर्व प्रक्रियांचे पुनरुज्जीवन होणे अवश्य आहे. आज हे व्हायचे तर निःस्वार्थी, बुद्धिमान आणि देशभक्त लोकांच्या एका सैन्याने चरख्याचा संदेश गावोगावी पोचवावा लागेल आणि ग्रामीणांच्या निस्तेज डोळ्यांत पुन्हा आशा आणि प्रकाशाचे किरण दिसू लागतील अशा जिद्दीने त्यांना एकाग्रतेने काम करावे लागेल. प्रौढ शिक्षण आणि सहकार्य या दिशेने करावयाचा हा एक भगीरथ प्रयत्न आहे. याने न कळत एक शांततामय क्रांती घडून येईल.

माझ्या मते खादी भारतीय जनतेच्या एकात्मतेचे, स्वातंत्र्याचे आणि समानतेचे प्रतीक आहे. खादीवृत्ती म्हणजे आपल्या गरजांच्या वस्तू स्वतः निर्माण करून त्यांचे विकेंद्रित वाटप करणे. शहरांना पुरवठा करायचा असेल तर अधिक उत्पादन करावे. जेव्हा आम्ही ह्या मुख्य ग्रामोद्योगाचा आणि संबंधित उद्योगांचा मागचा-पुढचा विचार न करता निर्दयपणे नाश केला तेव्हापासून आमच्या खेड्यांची बुद्धी आणि तेज नष्ट झाले. त्यांची दशा त्यांच्याच उपाशी मरणाऱ्या गुरागत झाली.

सूत काढतेवेळी माझ्या डोक्यात भारताच्या गरीब लोकांबद्दल विचार सुरू

असतात. भुकेने व्यथित आणि पोटाला भाकरी मिळावी यापलीकडे आकांक्षा नसणाराचे पोटच त्याचा ईश्वर होय. जो त्याला भाकरी देईल तोच त्याचा मालक असतो; त्याच्या द्वारे त्याला ईश्वराचे दर्शनही होऊ शकेल. हातपाय शाबूत असणाराला दान देण्याने दाता आणि घेणारा दोघांचेही पतन होते. त्यांना कोणत्या तरी उद्योगाची गरज असते. आणि कोट्यवधी लोकांना देता येण्यासारखा कताईचाच उद्योग आहे ! म्हणून कताईला मी प्रायश्चित्त अथवा यज्ञ मानतो. गरीबांकरिता जेथे शुद्ध प्रेम असेल तेथे ईश्वर असतो, अतएव चरख्याच्या सुताच्या प्रत्येक तंतूत मला ईश्वराचे दर्शन घडत असते.

गरीबांना ज्या प्रकारचे श्रम करणे भाग पडते तशा प्रकारचे श्रम आम्ही निदान दररोज एक तास करावे, यापेक्षा जास्त उदात्त, राष्ट्रीय कार्यक्रमाची मी कल्पना करू शकत नाही. त्याने गरीब व त्यांच्यामार्फत अखिल जगाशी एकात्मतेचा प्रत्यय येईल. देवाच्या नावाने गरीबांकरिता त्यांच्याप्रमाणे परिश्रम करावे हा ईश्वरोपासनेचा सर्वश्रेष्ठ प्रकार होय, असे मला वाटते. यज्ञ म्हणून करावयाच्या शरीरश्रमाचा सर्वांत चांगला आणि सर्वमान्य प्रकार कोणता याचा मी विचार करतो तेव्हा कताईखेरीज दुसरे उत्तरच मला सुचत नाही.

ग्रामोद्योगाशिवाय गावांचे पुनर्निर्माण होणे नाही

खादीला पर्याय म्हणून खेड्यांतून जे इतर उद्योग आहेत त्यांची गोष्ट निराळी आहे. त्यांच्यात शेवटी किती माणसे सामावणार? म्हणून हे बाकीचे उद्योग खादीला फार तर सहाय्यक ठरू शकतात. खादीशिवाय त्यांना फारसे महत्त्व असणार नाही. पण हेही खरे की त्यांच्याशिवाय खादीलाही शोभा नाही. गावांनी स्वयंपूर्ण बनायचे तर तेथे हाताने दळणे, कांडणे, पाखडणे, साबण-कागद इत्यादी बनविणे, कातडी कमावणे, तेलघाण्या आदी सर्व उपयोगी उद्योग लागतील. त्याशिवाय गावाची आर्थिक रचना पूर्णत्वाला पोचणार नाही. शक्य त्या सर्व वेळी ग्रामीण वस्तूच घेत राहणे हा प्रत्येक व्यक्तीने, भारतीयाने आपला धर्म मानला पाहिजे. अशा प्रकारची मागणी वाढली तर सर्व पुरवठा खेड्यांतून होऊ शकेल, याबद्दल शंका असू शकत नाही. गावांबद्दल जेव्हा आम्ही सहानुभूतिपूर्वक विचार करू आणि आम्हाला ग्रामीण जिनसा आवडू लागतील तेव्हा पाश्चिमात्यांची नक्कल करणाऱ्या यंत्रनिर्मित वस्तू आम्हाला नावडू लागतील आणि आमच्यात जी राष्ट्रीय अभिरुची निर्माण होईल ती जेथे गरीबी, उपासमार, आळस अथवा बेकारी असणार नाही अशा भारताच्या आदर्शाला अनुरूप असेल.

आमच्यापैकी प्रत्येकाला खाण्यापिण्याच्या, नेसण्याच्या आदी जिन्नसांपैकी स्वदेशी कोणत्या आणि परदेशी अथवा शहरी कोणत्या हे सहज ओळखता येईल. ग्रामीण लोक आपापल्या झोपड्यांतून अत्यल्प मोलाच्या अवजारांच्या सहाय्याने ज्या सहज निर्माण करू शकतात अशा जिन्नसांचा कटाक्षाने उपयोग करण्याबाबत हरकत नसावी. ग्रामीण लोक सोप्या अवजारांचा सहजपणे उपयोग करू शकतात आणि बिघडल्यास दुरुस्तीही करू शकतात. असे केल्यास ग्रामोद्योगाला अभिनंदनीय गती मिळेल. त्यानंतर काय करावे हे आपोआप स्पष्ट होत जाईल. समजा, कोणी मुंबई-कलकत्त्यास बनलेल्या ब्रशने आपले दात घासतो. त्याला त्याऐवजी ग्रामीण ब्रश हवा असेल तर त्याला कडुलिंब अथवा बाभळीच्या काडीचा उपयोग करण्याचा सल्ला देता येईल. ते स्वस्त पडेल आणि स्वच्छतेच्या दृष्टीनेही हा पर्याय श्रेष्ठ ठरेल. नंतर तो शहरी दंतमंजनाकडे ढुंकूनही पाहणार नाही. कोळशाची बारीक पूड करून, तिच्यात थोडेसे मीठ मिसळून तो आपले मंजन स्वत: तयार करून घेईल. मिलच्या कपड्याऐवजी तो गावात तयार झालेली खादी वापरील. गिरणीत सडलेल्या तांदळाऐवजी हातकुटाईचेच तांदूळ तो खाईल आणि पांढऱ्याशुभ्र शहरी साखरेऐवजी ग्रामीण गुळाचा तो उपयोग करील. या गोष्टींचा उल्लेख मी फक्त उदाहरणादाखल केला आहे.

सरकारचे कर्तव्य

गावकऱ्यांनी एका विशिष्ट मुदतीच्या आत गावच्या जरूरीपुरती खादी तयार करण्यास सुरुवात करावी असे सरकारने सुचवावे. त्यानंतर त्यांना कोणतेही कापड देण्यात येणार नाही. सरकारने गावकऱ्यांना अवश्य तो कापूस वा सरकी मूळ किंमतीला द्यावी आणि उत्पादनास अवश्य अशी किफायतशीर अवजारे देऊन, सहज फेडता येतील असे हप्ते बांधून द्यावे. अवश्य तेथे त्यांना शिकविणारेही द्यावे आणि गावकऱ्यांनी स्वत:च्या वस्त्राची गरज पुरविल्यानंतर उरलेली खादी सरकारने खरेदी करावी. अशाने विशेष धडपड न करता आणि फाजील खर्च न होता कापडाची वाण पूर्णत: दूर होईल.

गावाबाहेरील सहाय्य न घेता अथवा कमीत कमी सहाय्य घेऊन गावकऱ्यांनाच अवश्य असणाऱ्या अथवा इतरत्र विकता येतील अशा कोणत्या जिनसा स्थानीय स्तरावर निर्माण होणे शक्य आहे हे गावाची पाहणी करून ठरविण्यात येईल. उदाहरणार्थ, घाणीचे तेल, ढेप, जळणाचे तेल, हातकुटाईचे तांदूळ, ताडगूळ, मध, मुलांची खेळणी, मिठाई, चटया, हातकागद, साबण इत्यादी. अशाने निर्जीव खेड्यांना

संजीवन मिळेल आणि शहरी गरजा भागविण्याची त्यांच्यात जी सुप्त शक्ती आहे तीही प्रकट होईल.

गोरक्षण

भारतातील अगणित पशुधनाकडे दुर्लक्ष करून आम्ही पाप केले आहे. माझ्या मते माणसाच्या संपूर्ण विकासात गोरक्षणाचे स्थान अलौकिक आहे. गाईला मी माणसाखालील अखिल मुक्या जगाची प्रतिनिधी मानतो. गाईच्या निमित्ताने माणसाला संपूर्ण मुक्या चेतन-सृष्टीशी तादात्म्याचा अनुभव घेता येईल. गाईलाच हे विशिष्ट स्थान कां देण्यात आले असावे याचे कारण मला स्पष्ट आहे. भारतात गाय हीच माणसाची सर्वश्रेष्ठ सहायक होती. ती आमची एकमेव कामधेनू होती. ती निव्वळ दूध देत नसे, तर ती आमच्या शेतीचा आधारस्तंभही होती. ती दयेची साक्षात् मूर्तिमंत कविता आहे. ती कोट्यवधी लोकांचे पोषण करणारी माता आहे. तिचे रक्षण म्हणजेच अखिल मूक जगाचे रक्षण. ज्या ऋषीने अगर द्रष्ट्याने गोपूजेला निवडले त्याने गाईपासून (फक्त) सुरुवात केली असे म्हणणे अधिक योग्य होईल. पशुसृष्टीची मदतीकरता हाक मूक असल्यामुळे जास्तच प्रभावी आहे. गोरक्षण ही भारताने जगाला दिलेली अमोलिक देणगी आहे.

गाय जन्मदात्रीपेक्षाही अधिक श्रेष्ठ आहे. एक-दोन वर्षे दूध पाजणारी आई पुढे जन्मभर सेवेची अपेक्षा करते. पण बिचाऱ्या गाईला चारा आणि दाणा दिला की पुरे. ती जिवंतपणी तर आमची सेवा करतेच, पण मरणोत्तरही तिचे निर्जीव शरीर अनेक रीतींनी आमच्या उपयोगी पडते. जन्मदात्रीचे महत्त्व कमी करावे म्हणून मी हे म्हणत नाही; गाय किती पूज्य आहे एवढेच स्पष्ट करण्याचा माझा उद्देश आहे.

आम्ही गरीब आहोत म्हणून आमच्या गुरांची दुर्दशा आहे असे म्हणण्याची आम्हाला मोकळीक नाही. आमच्या निर्दय निष्काळजीपणाचाच तो एकमेव परिणाम होय. पांजरपोळ आमच्या दयावृत्तीचे द्योतक असतील, पण त्यांचे संचालन यथातथा आहे. आदर्श गोशाळा, दुग्धालये राष्ट्रीय समृद्धीची साधने म्हणून चालविण्यात येत नाहीत. अपंग पशूंचे अनाथालय एवढीच त्यांची भूमिका असते. एकीकडे गोरक्षणाच्या गप्पा करीत असता प्रत्यक्षत: आम्ही गाईला आणि तिच्या संततीला गुलाम बनविले आहे व परिणामी आम्ही स्वत: गुलाम बनलो आहोत.

गाईचे संगोपन जेव्हा खर्चाच्या दृष्टीने परवडत नाही तेव्हा तिचा प्राण न घेता इतर कोणत्या रीतीने तिला निभवावे, असा प्रश्न आहे. याचे थोडक्यात उत्तर असे की

पशुपालनशास्त्राचा पुरेसा अभ्यास करून हे करता येईल. आज या कामात सर्वत्र अंदाधुंदी आहे. गाय आणि बैल यांच्या प्रती स्वतःचे कर्तव्य हिंदू जर पार पाडतील तर आमची जनावरे भारत, किंबहुना अखिल जगाकरिता भूषणावह ठरतील. आज मात्र उलट होत आहे. पांजरपोळांची पुनर्रचना करावी लागेल. त्यांच्या आजच्या व्यवस्थापकांसमोर कोणतीही योजना नसते आणि ते या कामाचे तज्ञही नसतात.

या सर्वांमागे अहिंसा दडली आहे – दुसऱ्या शब्दांत भूतदया. ही महत्त्वाची गोष्ट उमजेल तर इतर सर्व गोष्टी आपोआप समजतील. अहिंसेच्या पाठोपाठ अपार धैर्य, आंतरिक शांती, बऱ्यावाईटाचे ज्ञान, आत्मत्याग आणि तज्ञत्व आपोआप येते. गोरक्षणाचे काम सोपे नाही. त्याच्या नावाने भारतात पुष्कळच पैशाचा अपव्यय होत आहे. तथापि अहिंसेकडे दुर्लक्ष झाल्यामुळे हिंदूंच्या हातून गोरक्षणाऐवजी गाईंचा नाशच अधिक होत आहे. परकी सत्तेला हुसकून लावण्यापेक्षाही गोरक्षणाचे काम जास्त कठीण आहे.

म्हशीच्या दूध-तुपाबाबतच्या आमच्या आग्रहाचे मला फार आश्चर्य वाटते. हे आमच्या अदूरदृष्टीचे – स्वार्थाचे – लक्षण आहे. तसे नसते तर शेवटी गायच आम्हाला अधिक लाभदायी आहे, हे पटले असते. गायीच्या तुपाला एक खास पिवळा रंग असतो.त्यात ‘ए’ जीवनसत्त्व जेवढे असते तेवढे म्हशीच्या दुधात नसते. त्याला एक खुमारीही आहे. सेवाग्रामला भेट देणाऱ्या विदेशी पाहुण्यांना गायीचे दूध फार आवडते. युरोपात तर म्हशीच्या दुधाची कोणाला माहिती सुद्धा नाही. फक्त एकट्या भारतातच म्हशीला फाजील महत्त्व आहे. त्यामुळे गायीचा नाश झाला. म्हणून मला म्हणायचे की यापुढे आम्ही गायीवर लक्ष केंद्रित न करू तर गाय नष्ट होऊन जाईल.

कायद्याद्वारे गोवध बंद करून गोरक्षण होऊ शकत नाही. ते गोरक्षणाचे एक लहान उपांग आहे. लोकांचा असा पक्का समज आहे की कोणत्याही वाईट गोष्टीविरुद्ध एखादा कायदा केला की ती विनासायास नष्ट होईल. एखाद्या दुर्बुद्ध, अज्ञानी किंवा लहान गटाविरुद्ध कायदा केला जातो व तो परिणामकारक ठरतो; पण ज्या कायद्याविरुद्ध जाणकार व संघटित लोकमत असते किंवा एखाद्या लहानशा मंडळाचा धार्मिक विरोध असतो, तो कायदा यशस्वी होत नाही. गोरक्षणाच्या प्रश्नावर वर मी सांगितलेल्या दिशेने सतत प्रयत्न केला तरच गावांचे व तेथील लोकांचे रक्षण होऊ शकेल, हे माझे मत दिवसेंदिवस दृढ होत आहे.

प्रत्येक शेतकऱ्याला स्वतःच्या घरी गाय-बैल ठेवून त्यांचे उत्तम व शास्त्रोक्त

पद्धतीने पालनपोषण करता येणे शक्य नाही. गोवंशाच्या ह्रासाच्या अनेक कारणांपैकी वैयक्तिक गोपालन हे एक होय. हे काम शेतकऱ्याच्या वैयक्तिक शक्तीच्या आटोक्याबाहेरचे आहे.

आमच्या लोकसंख्येच्या वाढीबरोबरच शेतकऱ्याच्या मालकीची जमीन कमी-कमी होत चालली आहे. परिणामी त्याच्याजवळ आवश्यक तेवढी जमीनसुद्धा असत नाही. असा शेतकरी घरी अथवा शेतावर गाय ठेवू शकत नाही. ठेवलीच तर स्वतःच्या हातांनी पायावर धोंडा पाडून घेतल्यासारखे होते. दयाधर्माचा स्पर्श नसणारे अर्थशास्त्रज्ञ ओरडून सांगत आहेत की भाकड जनावरे (त्यांच्यापायी होणाऱ्या खर्चांपायी) लाखो माणसांचा प्राण घेत आहेत – कारण त्यांच्यापासून लाभ काही नाही, पण त्यांना खाऊ तर घालावेच लागते – अतएव त्यांची कत्तल करावयास हवी. पण दया, धर्म आम्हाला तसे न करण्यास सांगतात.

अशा स्थितीत काय करावे? पशूंचा बोजा वाटण्याऐवजी त्यांचे पालन लाभदायक बनविण्याचा पराकाष्ठेचा प्रयत्न हेच या प्रश्नाचे उत्तर आहे. याला सहकार्य लागेल. सामुदायिकरीत्या केलेल्या पशुपालनाचे अनेक लाभ आहेत. पशूच कां, शेतीसुद्धा सामुदायिक केल्यास अधिक लाभदायक होईल असे मला वाटते. लहान लहान तुकड्यांची शेती वेगवेगळी करण्याऐवजी साऱ्या गावाची शेती एकत्र करून उत्पन्न रीतसर वाटून घेतले तर अधिक फायद्याचे होणार नाही काय? शेतीला जे लागू तेच गुरांच्या बाबतीतही खरे आहे.

आज लोकांना सहकार्य करावयास लावणे कठीण आहे, हे मला मान्य आहे. पण सर्वच चांगली कामे कठीण असतात. गोसेवेची अंगे कठीण आहेत. माझा आशय एवढाच की वैयक्तिक पद्धती चूक आहे, सामुदायिक पद्धतीच योग्य आहे. सहकार तत्त्वाच्या सहाय्याने व्यक्तिस्वातंत्र्याचाही उपभोग घेता येईल. सहकारात अहिंसा आहे; वैयक्तिक प्रयत्नाला हिंसेचा वास येतो.

स्वच्छता आणि खत

श्रम आणि बुद्धी यांच्यातील फारकतीमुळे खेड्याबाबतआम्ही इतके बेपर्वा झालो आहोत की याला गुन्ह्याचे स्वरूप आले आहे. परिणाम असा झाला की जेथे आम्हाला सुंदर खेडी गावे दिसावयास हवी होती तेथे कचऱ्याच्या ढीगवजा घाणेरडी गावे दिसून येतात. गावात शिरताक्षणी जो दुर्गंध नाकात शिरतो तो आह्लादकारक नसतो. गावाबाहेरही इतकी घाण असते की आत जाऊ पाहणाऱ्याला नाक दाबून व

डोळे मिटूनच प्रवेश करावा लागतो.

राष्ट्रीय अथवा सामाजिक सफाईचे आम्ही महत्त्वही जाणले नाही व तिचा विकासही केला नाही. रूढीचा भाग म्हणून आम्ही स्नान अवश्य करतो. पण ज्या जलाशयांच्या काठी आम्ही श्राद्धादी करतो अथवा पवित्र होण्याच्या इच्छेने ज्यांत स्नान करतो अशा नद्या, तलाव इत्यादींना घाणेरडे करण्यात आम्हाला मुळीच संकोच वाटत नाही. त्यामुळे आमची खेडी आणि तीर्थक्षेत्रे यांची लाजिरवाणी दुर्दशा झाली असून आम्ही अनेक रोगांना बळी पडतो. ग्रामसेवकांनी सर्वप्रथम गावाची सफाई आणि आरोग्याच्या प्रश्नाला हात घातला पाहिजे. त्यांना किंकर्तव्यमूढ करणाऱ्या तशा अनेक समस्या आहेत. पण स्वच्छतेकडे सर्वाधिक दुर्लक्ष झाले आहे. त्यामुळे गावांतून रोगराई पसरते. ग्रामसेवकाने भंगीकाम पत्करले तर तो विष्ठेचे खत बनवू शकेल आणि रस्ते झाडू शकेल. गावातील लोकांना योग्य ठराविक ठिकाणीच मलमूत्र-विसर्जन करण्याचे शिकवू शकेल. असे केल्याने होणारे लाभ व न केल्याने होणारे नुकसान तो त्यांना सांगेल. लोक त्याचे ऐकोत न ऐकोत, त्याने स्वत:चे कर्तव्य पार पाडीत असावे. आपण जणू पगारी भंगी आहोत अशा वृत्तीने जर कार्यकर्ते काम करतील, लोकांनी सहभागी व्हावे ही अपेक्षा स्पष्ट करून योग्य ते शिक्षण देतील, तर पुढेमागे गावकरी अवश्यमेव या कामी सहकार्य करू लागतील.

बाजार, रस्ते, व गल्ल्यांना स्वच्छ करीत असले पाहिजे. मग कचऱ्याचे वर्गीकरण करावे. काहीचे खत बनेल, काही निव्वळ पुरून टाकावा लागेल आणि काही कचऱ्यांतून तर उपयुक्त जिनसा बनू शकतील. प्रत्येक हाडाच्या तुकड्याला मोल असेल. त्याचे पीठ केल्यास उत्तम खत होईल. फाटके कागद अथवा चिंध्यांचा कागद बनू शकेल. गावातील गोळा केलेल्या मलमूत्राचे सोनखत तयार होईल. त्याकरिता एक फूट खोल खड्ड्यात ते पुरावे. जमिनीच्या वरच्या थरात कीटाणू असतात. हवा व प्रकाशही तेथे प्रवेश करू शकतात. त्यामुळे आठवड्याच्या आत त्या मलमूत्राचे मुलायम व सुगंधित मातीत रूपांतर झाल्याचे आढळून येईल. कोणाही ग्रामसेवकाला याचा प्रत्यय घेता येईल. इच्छा असणारा कोणीही उद्योगी ग्रामस्थ मलमूत्राचे खत अवश्य करू शकेल. सध्या लक्षावधी रुपये ज्याचे मोल होईल असे खत व्यर्थ वाया जात आहे आणि वर घाण आणि रोगराई पसरत आहे, ते निराळे.

खत-निर्मिती हाही एक ग्रामोद्योगच आहे. पण त्यात अनेकांच्या सहकार्याची गरज आहे. त्याशिवाय तो चालणार नाही. भारताची जनता जर स्वेच्छेने असे सहकार्य देईल तर आम्हाला धान्य कमी तर पडणार नाहीच; उलट गरजेपेक्षा आमचे उत्पादन

जास्त राहील. सेंद्रिय खताने जमिनीची सुपीकता नेहमी वाढते; कधीच कमी होत नाही. अशाने आमची कोट्यवधी रुपयांची बचतही होईल. त्याने अनायास स्वच्छतेचा सद्गुण अंगी बाणतो आणि आरोग्याचेही रक्षण होते.

आमच्या अक्षम्य निष्काळजीपणामुळे आम्ही आपल्या पवित्र नद्यांचे तट बिघडवतो आणि त्यामुळे माशा वाढतात. विष्ठेवर बसणाऱ्या ह्या माशा स्नानानंतर आमच्या अंगावर बसतात ! ह्या गलिच्छ प्रकारापासून वाचायचे तर फक्त एका फावड्याची गरज आहे. हवे तेथे शौचास बसणे, नाक शिंकरणे अथवा रस्त्यावर थुंकणे हे ईश्वर आणि मानवतेविरुद्ध केलेले अपराध असून इतरांबद्दलच्या बेमुरवतपणाचे द्योतक आहेत. जो माणूस स्वत:च्या मलमूत्र-विसर्जनानंतर माती टाकून ते झाकत नाही तो शिक्षेस पात्र आहे – मग तो जंगलात एकाकी का राहत असेना !

गावच्या तलावात सर्व स्त्री-पुरुष स्नान करतात, कपडे धुतात आणि तेच पाणी पिण्याकरिता अथवा अन्न शिजविण्याकरिता उपयोगात आणतात. त्या तलावात बहुधा म्हशीही बसतात. तलावाचा एवढा दुरुपयोग करूनही आजपावेतो महामारीने गावे नष्ट कशी झाली नाहीत, हे आश्चर्यच आहे. आरोग्यशास्त्रज्ञांचे स्पष्ट मत आहे की पाणी स्वच्छ राखण्याबाबतची ग्रामीणांची बेफिकीरी हेच त्यांच्या बहुतांश आजारांचे प्रमुख कारण आहे.

ग्रामरचना

आदर्श खेड्यांची रचना पूर्णत: आरोग्यदायी असावी. सर्व झोपड्यांतून भरपूर प्रकाश आणि हवा खेळावी. पाच मैलांच्या (आठ कि.मी.) परीघात प्राप्त असणाऱ्या साधनांच्या सहाय्याने गावातील झोपड्या बांधल्या जाव्या. त्यांच्या पुढेमागे पुरेसे अंगण रहावे, म्हणजे गुरे बांधण्याची आणि स्वत:चा भाजीपाला प्रत्येकाला उगवता येण्याची सोय राहील. वाटांवर धूळ नसावी. पुरेशा विहिरी, आणि त्याही सर्वांना खुल्या असाव्या. सर्वांसाठी प्रार्थनामंदिर, सभागृह इत्यादी असावे. गुरांच्या चराईकरिता जागा असावी. सहकारी पद्धतीने चालणारी गोशाळा आणि औद्योगिक शिक्षण-प्रधान शाळा असावी. गावाच्या कारभारासाठी ग्रामपंचायत असावी. अन्नधान्य, खादी वगैरे सर्व जीवनावश्यकता गावातच पूर्ण व्हाव्या. सध्या तेथे जी घरे आहेत त्यांत फार थोड्या सुधारणांची आवश्यकता आहे. खेड्यांत पुरेसे परस्पर प्रेम व सहकार्य असेल तर हे सर्व सरकारी मदतीशिवाय स्वावलंबनाने होणे शक्य आहे. आमूलाग्र नवी घरे बांधण्याच्या नादी लागू नये. आणि सरकारी सहाय्य मिळाले तर

गावाची कल्पनातीत सुधारणा सहज शक्य होईल. सध्या मात्र गावकरी स्वत: काय करू शकतील यावरच माझा भर आहे. त्यांना योग्य मार्गदर्शन मिळाल्यास गावाचे – मी व्यक्तीचे म्हणत नाही – उत्पन्न दुप्पट होऊ शकेल. व्यापारी दृष्टीने काम करण्याची साधने गावात भलेही नसोत, पण स्थानिक गरजा भागविण्याची साधने तर जवळपास सर्वत्र आढळतील.

आरोग्य

शरीर, घरे, खेडी आदी स्वच्छ राहतील, आणि त्याला युक्ताहार आणि व्यायाम यांची जोड मिळेल तर आजाराचे प्रमाण किमान होईल असे माझे मत आहे. शिवाय चित्तशुद्धीही असेल तर आजार असंभव होऊन जाईल. रामनामाशिवाय चित्तशुद्धी अशक्य आहे. ग्रामीण जर हे ओळखतील तर त्यांना वैद्य, हकीम, डॉक्टर यांची गरज पडणार नाही.

खरे म्हणजे स्वच्छतेचे नियम पाळले आणि योग्य आहार घेतला तर आम्हाला स्वत:चे डॉक्टर बनता येईल. जो फक्त जगण्यापुरतेच खाईल, जो पंचमहाभूतांशी मैत्री करून ईश्वराचा दास म्हणून जगेल, तो आजारी पडणारच नाही. पडलाच तर ईश्वराचे स्मरण करीत सुखाने प्राण सोडील. गावात उपलब्ध असणाऱ्या जडीबुटींच्या औषधावरच तो समाधान मानेल. नव्याण्णव टक्के रोग घाणेरडेपणा, खाऊ नये ते खाणे आणि अवश्य ते खावयास न मिळणे यांपायी होतात असे डॉक्टरांचे म्हणणे आहे. निसर्ग-नियम तोडण्यानेच रोग निर्माण होतात. म्हणून त्यांच्यावरचा इलाज हाच आहे की रोग्याने त्या नियमांचे पालन सुरू करावे.

९९ टक्के लोकांना आम्ही जगण्याची कला शिकवू शकलो तर उरलेल्या एकाची काळजी न केली तरी चालेल. त्याच्याकरिता कोणी परोपकारी डॉक्टर मिळून जाईल. आज आम्हाला स्वच्छ पाणी, स्वच्छ हवा नि मातीसुद्धा मिळत नाही. उन्हाला आम्ही जवळपास टाळतो. हे सर्व आम्हाला उमजेल तर आम्ही शतकानुशतकांचे काम केल्यासारखे होईल. हे ज्ञान मिळविण्याकरिता डिग्री अथवा पैशाच्या ढिगाची आवश्यकता नाही. ईश्वरावर श्रद्धा हवी, सेवावृत्ती हवी, निसर्गाशी थोडा परिचय हवा आणि योग्य आहाराची माहिती हवी, एवढे पुरे. हे ज्ञान शाळा-कॉलेजांच्या भानगडीत न पडता थोड्या परिश्रमाने, थोड्याच वेळात आम्ही आत्मसात् करू शकतो.

देशाकरिता डॉक्टर आणि शास्त्रज्ञ लोक काय करीत आहेत? खास आजारांचे तज्ज्ञ बनण्याकरिता त्यांना परदेशी जाण्याची उत्सुकता असते. माझा त्यांना सल्ला आहे की

त्यांनी भारताच्या सात लाख खेड्यांकडे लक्ष पुरवावे. मग त्यांच्या प्रत्ययास येईल की डॉक्टरची पदवी घेतलेल्या सर्वांनी पाश्चिमात्य नव्हे तर पौर्वात्य पद्धतीने ग्रामीणांची सेवा करण्याची खरी गरज आहे. मग अनेक देशी इलाज ते स्वीकारतील. भारतात वनस्पती औषधींचे अक्षय भांडार उपलब्ध असता त्याला परदेशी औषधे मागविण्याची मुळीच गरज नाही. पण औषधोपचारापेक्षाही जास्त महत्त्वाचे म्हणजे डॉक्टरांनी ग्रामीणांना सुयोग्य जीवनक्रमाचे शिक्षण द्यावे.

नगरपालिका आणि शहर-सफाई

पाश्चिमात्यांकडून एक आम्ही अवश्य शिकू शकतो – शिकावे. ते म्हणजे शहर-सफाईचे शास्त्र. त्यांनी सामुदायिक स्वच्छता आणि आरोग्याचे एक शास्त्रच बनविले आहे. त्यापासून आम्ही बरेच शिकण्यासारखेआहे; अर्थात् आमच्या विशिष्ट गरजांनुसार आम्ही त्यात अवश्य बदल करावा.

भगवत्प्रेमानंतर माणसाला स्वच्छतेबद्दल प्रेम असायला हवे. मळकट शरीराने आम्ही ईश्वराचे प्रेम संपादन करू शकणार नाही. त्याचा आशीर्वादही आम्हाला प्राप्त होणार नाही. आणि संपूर्ण शहर जर घाणेरडे असेल तर शरीर कोठून स्वच्छ राहणार?

कोणतीही म्युनिसिपालिटी सफाई कर वसूल करून पगारी नोकरांद्वारा नगर-सफाईच्या कामात यशस्वी होऊ शकणार नाही. हे काम श्रीमंत-गरीब, यच्चयावत् नागरिकांच्या सहकार्यानेच शक्य होईल.

खेड्यात तर अनेक गोष्टी आम्हाला बिनधोक करता येतील, ज्या दाट वस्तीच्या शहरांच्या गर्दीत आणि श्वास घेणेही दुर्घट अशा कोंदट गल्ल्यांतून करता येणार नाहीत. शहरी जीवन निराळे पडते आणि तेथे स्वच्छतेच्या बारीकसारीक नियमांचेही काटेकोर पालन करावयास हवे. आज आम्ही हे करतो काय? भारतात मोठ्या शहरांतून स्वच्छतेच्या दृष्टीने जी दुर्दशा आढळून येते त्याबद्दलची जबाबदारी आम्हाला म्युनिसिपालिट्यांवर टाकता येणार नाही. पिढ्यानुपिढ्या जनतेत मुरलेल्या वाईट सवयीचा प्रतिकार करणे कोणत्याही म्युनिसिपालिटीला शक्य नाही. अतएव म्युनिसिपालिटीने नगर-सफाईचा प्रश्न समाधानकारकपणे सोडवावा असे आम्हाला वाटत असेल तर, तिच्याशी आम्ही या बाबतीत स्वेच्छापूर्वक सहकार्य केल्याशिवाय तिला एकटीला ते करणे अशक्य आहे. मला अर्थातच असे म्हणायचे नाही की म्युनिसिपालिटीवर या बाबतीत मुळीच जबाबदारी नाही.

म्युनिसिपालिटीच्या कामांत मला रुची आहे. म्युनिसिपालिटीचे सदस्यत्व

म्हणजे मोठे भाग्य आहे. पण सार्वजनिक जीवनाचा अनुभव असलेल्या व्यक्तीच्या नात्याने मी स्पष्ट करू इच्छितो की हे सदस्यत्व भाग्याची गोष्ट ठरण्याची अनिवार्य अट ही आहे की त्या सदस्यत्वाच्या सहाय्याने वैयक्तिक स्वार्थ साध्य करण्याची मुळीच इच्छा नसावी. त्याकरिता पूर्णतः सेवाभावाने काम करावे लागेल. तरच त्या पदाचे पावित्र्य टिकेल. स्वतःला शहरचे भंगी म्हणवून घेण्यात गौरव मानला पाहिजे. गुजरातीत म्युनिसिपालिटीला जे 'कचरा-पट्टी' अर्थात् भंग्यांचा विभाग म्हणून संबोधतात ते माझ्या मते फार सार्थ आहे. वस्तुतः म्युनिसिपालिटी ही स्वच्छता राखणारी एक प्रमुख संस्था असायला पाहिजे. इतकेच नव्हे तर, या 'स्वच्छते'त सामाजिक आणि सार्वजनिक जीवनातील शुचिर्भूतताही संमिलित असावी.

म्युनिसिपालिट्या, लोकलबोर्डे आदींमध्ये जे प्रतिनिधी निवडून जातात ते प्रतिष्ठेकरिता अथवा आपसात झगडण्याकरिता जात नसतात. नागरिकांची आत्मीयतेने सेवा करण्याकरिता ते निवडले जात असतात. ही सेवा द्रव्याधिष्ठित असू शकणार नाही. आमचा देश गरीब आहे. म्युनिसिपालिटीच्या सदस्यांत जर सेवावृत्ती असेल तर ते नगराचे अवैतनिक भंगी व रस्ते बनविणारे बनतील, आणि त्यात त्यांना गौरव वाटेल. ते इतरांनाही सहकार्याचे निमंत्रण देतील आणि त्यांच्या कामावर जर त्यांना श्रद्धा असेल तर त्यांच्या आदर्शाचा इतरांवर अवश्यमेव प्रभाव पडेल.

११. शिक्षण

इतर देशांत काय असेल ते असो, पण ज्या भारतात ऐंशी टक्के लोक शेती करतात व आणखी दहा टक्के इतर उद्योग करतात अशा देशात शब्दपंडित निर्माण करणारे आणि जनतेला परिश्रम-विमुख बनविणारे शिक्षण देणे हा गुन्हा ठरेल. आमचा बहुंशी वेळ पोटाला मिळविण्यापायी खर्च होत असतो; सबब आमच्या मुलाबाळांना लहानपणापासूनच परिश्रमप्रेमी बनवावयास हवे. परिश्रमाबद्दल तिरस्कार निर्माण करणारे शिक्षण देणे अयोग्य होईल. एखाद्या शेतकऱ्याचा मुलगा शाळेत शिक्षण घेतल्यानंतर शेतकामाला निरुपयोगी कां ठरावा? आमच्या शाळांतील मुले शरीरश्रमाचा तिरस्कार कदाचित् करीत नसतील, पण तो ते नापसंत करतात हे तर खरेच.

भारताला सक्तीच्या मोफत शिक्षणाची निकड आहे असे माझे निश्चित मत आहे. याचा एकच उपाय आहे, तो म्हणजे कोणता तरी उपयोगी उद्योग आम्ही त्यांना शिकवावा व त्याच्याद्वारा मुलांतील शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक शक्ती विकसित कराव्या. असे केल्याने आमच्या खेड्यांच्या होत असलेल्या नाशाला पायबंद बसेल, आणि ज्या समाजात श्रीमंत-गरीब हा भेद उरणार नाही आणि ज्यात प्रत्येकाला अवश्य ते रोटी मिळवून देणारे काम आणि पूर्ण व्यक्तिस्वातंत्र्याची हमी राहील अशा समाजरचनेचा पायाही घातला जाईल.

या ज्या आमच्या देशात लक्षावधी माणसे उपाशी मरत आहेत तेथे जाणीवपूर्वक श्रम म्हणजेच खरे प्राथमिक शिक्षण किंवा प्रौढ शिक्षण ठरेल. हस्तकौशल्यानंतर शब्दज्ञान द्यावे. हस्तकौशल्यच माणसांतील, पशूंत नसणारी विशेष गोष्ट आहे. लिहिण्यावाचण्याखेरीज माणसाचा विकास अशक्य आहे हा निव्वळ भ्रम आहे. शब्दज्ञानाने जीवन अधिक सुंदर बनत असेल; पण त्याच्याशिवाय माणसाचा नैतिक, शारीरिक अथवा आर्थिक विकास होणारच नाही असे समजणे चूक होईल.

हात, पाय, डोळे, कान, नाक यांचा योग्य अभ्यास करवून आणि त्यांच्या सदुपयोगाचे शिक्षण देऊनच बुद्धीचा खरा विकास होऊ शकेल – नव्हे, बालकांच्या बुद्धिविकासाचा हा शीघ्रतम मार्ग होय. शरीर आणि मेंदू यांची समन्वयपूर्वक प्रगती आणि त्याच प्रमाणात आध्यात्मिक प्रगती न होत गेली तर बुद्धीच्या कोरड्या एकांगी विकासाने फारसा फायदा होणार नाही. आध्यात्मिक उन्नती म्हणत असता माझा कटाक्ष सहृदयतेच्या अभ्यासावर आहे. सर्वांगीण विकासाचा हा एकमेव मार्ग आहे. ह्या सर्व गोष्टी अविभाज्य आहेत.

शरीर, मन आणि आत्मा यांच्या विकासात सुसंवादित्व नसण्याचे दुष्परिणाम स्पष्ट असून आमच्या सभोवती ते सर्वत्र विद्यमान आहेत. पण आधुनिक विकृत संस्कारांमुळे ते आम्हाला दिसून येत नाहीत एवढेच. मनुष्य म्हणजे केवळ स्थूल शरीर, किवा बुद्धी, हृदय किंवा आत्मा नव्हे. त्यांच्या योग्य मेळातूनच पूर्ण मनुष्य घडेल. उचित सुसंवादित्व जेणेकरून निर्माण होईल त्यालाच शिक्षण हे नाव शोभेल.

शिक्षणाच्या माझ्या योजनेत अक्षर-ओळखीपूर्वी अवजारे चालविण्यास शिकविले जाईल. डोळे चित्रांच्या सहाय्याने ज्याप्रमाणे जिन्नसा ओळखू लागतात, त्याप्रमाणे मुलांना अक्षरे आणि वाक्ये यांचे शब्द आणि नाद-ज्ञान होईल. अशा प्रकारे संपूर्ण शिक्षण स्वाभाविक स्वरूपाचे राहील; ते मुलांवर कोणत्याही प्रकारे लादले जाणार नाही. उलट त्याचा ते आवडीने स्वीकार करतील. आणि म्हणून हे शिक्षण जगातील इतर सर्व शिक्षण-पद्धतींपेक्षा फलदायी आणि स्वस्त असेल.

हस्तव्यवसाय हा या योजनेचा केंद्रबिंदू असेल. म्हणजे विद्यार्थ्यांनी फक्त शाळेच्या संग्रहालयात ठेवण्यायोग्य निरर्थक वस्तू किंवा खेळणी बनवावी असा याचा अर्थ नव्हे. बाजारात विकल्या जातील अशाच वस्तू त्यांनी तयार कराव्यात. माराच्या धाकाने कारखान्यात पूर्वी मुले काम करीत, तशी ही मुले करणार नाहीत. उलट त्या कामापासून मुलांना आनंद प्राप्त होऊन बुद्धीला उत्तेजन मिळत राहील.

आमच्या येथे प्राथमिक शिक्षणाला चेष्टेचे स्वरूप आले आहे. त्यात भारतातील खेड्यांची आवश्यकता व गरजा यांचा मुळीच विचार केलेला नसतो. किंबहुना शहरांचाहि यत्किंचित् विचार नसतो. वर सुचविलेल्या बुनियादी शिक्षणपद्धतीत मुलांचा – मग ती खेड्यांतील असोत वा शहरांतील असोत – भारताच्या सर्वोच्च आणि शाश्वत तत्त्वांशी संबंध निर्माण होतो. त्यामुळे शरीर आणि मन दोहोंचा विकास होतो. मुलांना स्वतःचे, तसेच देशाचे उज्ज्वल भावी चित्र दिसू लागते आणि बालपणापासून ते चित्र साकार करण्यात ते भाग घेऊ लागतील, अशी व्यवस्था होते.

कारागिरीच्या माध्यमातून मुलांचा शारीरिक, बौद्धिक व नैतिक विकास करणे हे बुनियादी शिक्षणाचे उद्दिष्ट आहे. पण माझे असे मत आहे की कुठल्याही पद्धतीचा – जी शैक्षणिक दृष्ट्या योग्य आहे – चांगला वापर झाल्यास ती आर्थिक दृष्ट्याही उपयुक्त ठरावी. उदाहरणार्थ, आम्ही मुलांना मातीची खेळणी बनवणे शिकवू शकतो. पण नंतर ती तोडून फेकून दिली जातात. यामुळे त्यांच्या बुद्धीचा विकास होत असला तरी मानवी श्रम व साधनसामुग्रीचा अपव्यय करता कामा नये, या महत्त्वाच्या नैतिक

तत्त्वाकडे दुर्लक्ष होते. त्यांचा अनुत्पादक उपयोगही होऊ नये. जीवनातील प्रत्येक क्षण सत्कारणी लागला पाहिजे, या तत्त्वाचे पालन शिकविणारे शिक्षण नागरिकत्वाच्या गुणांचा विकास करणारे सर्वोच्च शिक्षण ठरावे. यामुळे बुनियादी शिक्षण अधिकाधिक स्वावलंबी बनत जाऊ शकते.

आमच्यासारख्या गरीब देशात हस्तव्यवसायप्रधान शिक्षण सुरू केल्याने दोन उद्दिष्टे साध्य होतील. त्याने एक तर मुलांच्या शिक्षणाचा खर्च निघेल, व इच्छा असेल त्यांना भावी जीवनात उपजीविकेचा प्रश्न सोडविण्यासही मदत होईल. या पद्धतीमुळे आमची मुले निःसंशय स्वावलंबी बनतील. श्रमाचा तिरस्कार अंगी बाणल्यास राष्ट्र जेवढे निर्बल होईल तेवढे इतर कशानेही होणार नाही.

उच्च शिक्षण

राष्ट्रीय आवश्यकतांची पूर्ती होण्याच्या दृष्टीने मी कॉलेजच्या शिक्षणक्रमात संपूर्ण बदल घडवून आणीन. यांत्रिक-तांत्रिक शिक्षणासाठी पदव्या राहतील. ते शिकलेल्यांचा भिन्न-भिन्न उद्योगांशी संबंध जोडून दिला जाईल, व त्या उद्योगांना आवश्यक असणाऱ्या स्नातकांच्या प्रशिक्षणाचा खर्च त्या उद्योगांच्या द्वारेच भागविला जाईल. उदाहरणार्थ, टाटा कंपनीच्या मालकांनी राज्याच्या देखरेखीखाली इंजिनियर लोकांना प्रशिक्षण देण्याकरिता कॉलेज चालवावे. त्याचप्रमाणे मिल संघटनांनी त्यांना आवश्यक असणाऱ्या स्नातकांसाठी प्रशिक्षण कॉलेज चालवावे.

अशा कितीतरी उद्योगांचा नामनिर्देश करता येईल. व्यापारी लोकांचे स्वतंत्र कॉलेज असेल. आता राहिली कला, औषधी व शेती. कित्येक कलाकौशल्ये आजही स्वावलंबी आहेत. म्हणून राज्य सरकारने अशी कॉलेजे चालविण्याचे बंद करावे. वैद्यकीय विद्यालये प्रत्यक्ष दवाखान्यांशी संबंधित असतील. श्रीमंतांमध्ये लोकप्रिय असल्यामुळे त्यांनी स्वयंस्फूर्तीने देणग्या देऊन ती चालवावी अशी अपेक्षा आहे. आणि आपली प्रतिष्ठा कायम ठेवण्याच्या दृष्टीने शेतकी विद्यालयांनी तर स्वावलंबी बनलेच पाहिजे. मला शेतकी स्नातकांचा काहीसा वाईट अनुभव आहे. त्यांना व्यावहारिक अनुभव नसतो. त्यांचे ज्ञान वरपांगी असते. देशाच्या आवश्यकतेनुरूप चालणाऱ्या आणि स्वावलंबी अशा शेतांतून प्रशिक्षण घेतल्यास स्नातकांना पदवी ग्रहण केल्यानंतर मालकांच्या खर्चाने (पगारी नोकरी करीत राहून) अनुभव मिळवावा लागणार नाही.

शिक्षण सक्तीचे करायचे असेल, किंवा शिक्षणाची इच्छा असणाऱ्या सर्व विद्यार्थी-विद्यार्थिनींना ते सुलभ व्हायचे असेल तर आमच्या शिक्षणसंस्थांना पूर्णतः

नाही तरी बऱ्याच प्रमाणात स्वावलंबी बनावे लागेल, असे अनेकदा म्हटले जाते. दान, राज्यकर्त्यांचे सहाय्य आणि शिक्षण-शुल्क यांच्या सहाय्यानेही त्या संस्थांना स्वावलंबी बनविता येईल, पण आमच्या विशिष्ट परिस्थितीत ते इष्ट नाही. विद्यार्थ्यांच्या परिश्रमाच्या सहाय्यानेच त्या स्वावलंबी बनाव्या. याकरिता औद्योगिक शिक्षण अनिवार्य करावे लागेल. पुस्तकी शिक्षणाबरोबरच औद्योगिक शिक्षणाचीही व्यवस्था असावयास हवी. आमचे विद्यार्थी जर श्रमाला प्रतिष्ठित मानू लागतील आणि हस्तोद्योगाच्या अज्ञानाला हिणकस ठरवितील तरच हे शक्य आहे. अमेरिका जगातील धनवान देश असल्यामुळे तेथे स्वावलंबनाची गरज नाही, तरी तेथील विद्यार्थी उद्योग करून स्वत:चा पूर्ण अथवा अंशत: खर्च मिळवितात. आमच्याकडे याची विशेषच गरज आहे. गरीब विद्यार्थ्यांना फी-माफी अथवा इतर सवलती देण्यापेक्षा त्यांच्यात तेवढे पैसे कमावण्याची पात्रता निर्माण केल्यास जास्त इष्ट नाही का होणार? खाण्यापिण्याचा आणि शिक्षणाचा खर्च विद्यार्थीदशेतच (मेहनत करून) कमाविणे हे अशिष्टतेचे लक्षण आहे, असा समज विद्यार्थ्यांच्या मनात दृढ करून देऊन आम्ही त्यांचे अपरिमित नुकसान करीत असतो. हे नुकसान भौतिक, तसेच नैतिकही आहे – नैतिक जास्तच आहे. धर्मप्रवृत्तीच्या विद्यार्थ्यावर फी-माफीमुळे मिंधेपणाचा एक कायमचा बोजा पडतो. पुढच्या आयुष्यात त्याला या मिंधेपणाची आठवण अस्वस्थ करते. याउलट जर स्वावलंबनाच्या सहाय्याने आपले शिक्षण पुरे केले असेल तर कोणाला त्याचा अभिमान वाटणार नाही?

विद्यापीठे

विद्यापीठांनी फक्त परीक्षेचे काम करावे आणि त्यांनी परीक्षा-फीच्या भरवशावर स्वत:चा खर्च चालवावा. त्यांच्याकडे निरीक्षणाची आणि विभिन्न अभ्यासक्रम तयार करण्याचीही जबाबदारी राहील. त्यांच्या अगाऊ परवानगीशिवाय खाजगी शाळा चालविण्यात येऊ देऊ नयेत. मात्र व प्रामाणिक व लायक व्यक्तींनी चालविलेल्या संस्थांना संमतिपत्रे उदारतेने दिली जावी. आणि धोरण हे असावे की विद्यापीठाचा कोणताही खर्च सरकारवर पडणार नाही. फक्त केंद्रीय शिक्षणखात्याचा खर्च सरकारला भागवावा लागेल.

ज्यांच्या सेवेचा सरकारला उपयोग असेल तेवढ्यांनाच त्याने (उच्च) शिक्षण द्यावे. बाकी खाजगी संस्थांनाच त्याने उत्तेजन देणे योग्य होईल. शिक्षणाचे माध्यम ताबडतोब कसेही करून बदलण्याची गरज आहे; प्रांतिक भाषांना योग्य दर्जा मिळायला हवा. सध्या जो पैशाचा भयंकर अपव्यय सुरू आहे त्याऐवजी उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात

घटकाभर गोंधळ झालेला सुद्धा मला चालेल.

उच्च शिक्षणाला माझा विरोध नाही. मात्र आज आमच्या देशात उच्च शिक्षण जे दिले जात आहे त्याला माझा अवश्य विरोध आहे. माझ्या योजनेत आजच्यापेक्षा संख्येने आणि पुस्तकांनी अधिक समृद्ध अशी ग्रंथालये असतील; प्रयोगशाळा, संशोधन-संस्थाही अधिक संख्येने आणि अधिक चांगल्या राहतील. जे राष्ट्राची खरी सेवा करतील अशा रसायनशास्त्रज्ञांचे, इंजिनिअरांचे आणि इतर तज्ज्ञांचे एक सैन्यच्या सैन्य उपलब्ध असेल, आणि त्यांच्या सहाय्याने स्वत:च्या अधिकारांची आणि गरजांची वाढती जाणीव होणाऱ्या जनतेच्या गरजा पूर्ण करण्यात येतील. या तज्ञांची भाषा इंग्रजी असणार नाही. ते लोकभाषा वापरतील. त्यांचे ज्ञान ही समाजाची सामूहिक संपत्ती राहील. अशा परिस्थितीत कोरड्या नकलेऐवजी मौलिक काम होऊ शकेल, आणि त्याच्या खर्चाचा बोजा सर्वांवर न्यायपूर्णतेने ठेवला जाईल.

विद्यापीठांकरिता पैसे गोळा करण्याचे काम लोकशाही सरकारचे नाही. लोकांना गरज असेल तर ते पैसे गोळा करतील. अशी विद्यापीठे देशाला भूषणभूत ठरतील. परक्यांचे राज्य असले म्हणजे लोकांना जे मिळते ते वरून, आणि त्यामुळे लोक वाढत्या प्रमाणात परतंत्र बनत जातात. याच्या उलट जेव्हा जनतेच्या इच्छेमुळे काही अस्तित्वात येते तेव्हा त्याचे स्वरूप व्यापक आणि टिकाऊ असते. अशी गोष्ट चांगली असते आणि जनतेला शक्ती प्रदान करते. अशा योजनेत शिक्षण-प्रसारासाठी गुंतलेला प्रत्येक रुपया दसपट लाभाला कारणीभूत होतो. परकी सत्तेने स्थापन केलेली विद्यापीठे उलट दिशेने प्रवास करीत आहेत. कदाचित् हे अपरिहार्य असावे. सबब जोवर आम्हाला नुकतेच मिळालेले स्वातंत्र्य पूर्णपणे पचनी पडत नाही तोवर नवी विद्यापीठे स्थापन करण्याबाबत आम्ही फार खबरदारी घेतली पाहिजे.

स्त्री-शिक्षण

या विषयाबाबत अजून मी स्पष्ट निर्णयाप्रत पोचलेलो नाही. माझे एवढेच म्हणणे आहे की पुरुषांना या बाबतीत जेवढी सुविधा आहे तेवढीच ती स्त्रियांनाही मिळावी, आणि जेथे विशेष सवलतींची गरज वाटेल तेथे त्या मिळाव्या.

अखंड विद्यार्जन

शाळा संपली तरी शिक्षण संपत नसते; खरे शिक्षण तर नंतरच सुरू होते. ज्याला याचे महत्त्व पटेल तो सदाचा विद्यार्थीच असतो. कर्तव्यपालन करीत असता त्याने सतत स्वत:च्या ज्ञानात भर टाकीत असावे. जो प्रत्येक गोष्ट जाणिवेने करील त्याचे ज्ञान सतत

वाढलेच पाहिजे.

शिक्षकाशिवाय शिक्षण प्राप्त होऊ शकत नाही हा गैरसमज आमच्या ज्ञानार्जनाच्या मार्गातील फार मोठी धोंड आहे. हरएक जण स्वत:चा खरा शिक्षक आहे. अलीकडे स्वशिक्षणाची साधने खूप वाढली आहेत. जिज्ञासूला पुष्कळशा गोष्टींचे ज्ञान अशा रीतीने मिळू शकते. जेथे शिक्षकाची गरज असेल तेथे तो शिक्षकही धुंडून घेतो. अनुभव ही फार मोठी शाळा आहे. शाळांत शिकणे अशक्य आहे, असे अनेक उद्योग आहेत. ते फक्त संबंधित दुकाने अथवा कारखान्यांतच शिकता येतात. शाळेतले ज्ञान केवळ पोपटपंचीच्या स्वरूपाचे असते. सबब प्रौढांना शाळेपेक्षा इच्छा, उत्साह आणि आत्मविश्वास असण्याची गरज आहे.

मुलांना शिकविणे हे आईबापांचे कर्तव्य आहे. आम्हाला शाळा वाढविण्याची गरज नाही. ज्ञानार्जनाला अनुकूल असे वातावरण निर्माण करणे जास्त महत्त्वाचे आहे. हे निर्माण झाले म्हणजे जेथे शाळेची खरी गरज असेल तेथे ती आपोआप निर्माण होईल.

प्रौढ शिक्षण

जनतेची सर्वव्यापी निरक्षरता हा भारतावरील फार मोठा कलंक आहे. तो नष्ट झालाच पाहिजे. अक्षर-ओळख झाली म्हणजे सर्व काही त्यात आले असे न मानता उपयुक्त ज्ञानाच्या प्रचाराशी संलग्न अशा रीतीने साक्षरता-प्रसाराचे कार्य झाले पाहिजे. लिहिण्यावाचण्याचे निव्वळ कोरडे शब्दज्ञान अथवा अंकगणित खेडुतांच्या जीवनाचे मुख्य अंग असू शकत नाही. दैनंदिन जीवनात उपयोगी पडेल असेच शिक्षण त्यांना द्यायला हवे. ते त्यांच्यावर लादले जाता कामा नये. त्याच्या प्राप्तीची त्यांना भूक लागावी. आज त्यांना मिळणाऱ्या शिक्षणाची त्यांना गरज नाही; त्यांना त्याचे महत्त्वही नाही. लिहिण्यावाचण्याला जोडून त्यांना गावाशी संबंधित गणित, भूगोल, इतिहास इत्यादीचे असे सामान्य ज्ञान दिले जावे ज्याचा त्यांना प्रतिदिनी उपयोग करता येईल. त्यापुढे ते स्वत:च्या बळावर पुढचा मार्ग चोखाळतील. ज्या पुस्तकांतून त्यांना दैनंदिन उपयोगाचे व्यावहारिक ज्ञान प्राप्त होत नाही ती खेडुतांच्या दृष्टीने निरुपयोगी आहेत.

धार्मिक शिक्षण

सरकारी शाळा-कॉलेजांतून निघालेले विद्यार्थी धार्मिक शिक्षणाबाबत कोरे-करकरीत राहतात ही गोष्ट निर्विवाद आहे. काही लोकांना असेही वाटते की सार्वजनिक शाळांमधून केवळ विशिष्ट विषयांचे शिक्षण देण्यात यावे. भारतासारख्या भिन्न धर्मांचे अनुयायी असलेल्या देशात धार्मिक शिक्षण देणे कठीण असल्याची मला जाणीव आहे. पण आमच्या आध्यात्मिकतेचे दिवाळे वाजू नये असे वाटत असेल तर आम्हाला इतर विषयांइतकेच धर्मशिक्षणालाही महत्त्व द्यावे लागेल. धर्मांचे पुस्तकी ज्ञान आणि 'धर्म' यात पुष्कळच अंतर आहे. पण जर आमच्या मुलामुलींना (मूलभूत) धर्म (वृत्ती) देता येत नसेल तर दुधाची तहान ताकावर भागविण्याच्या न्यायाने त्यांना शक्य ते देण्यावरच समाधान मानणे भाग आहे.

शिक्षक

अध्यापनाची दुर्दमनीय आंतरिक आवड असणारांनीच शिक्षक बनावे आणि निर्वाहाकरिता जे अत्यावश्यक असेल तेवढ्यावरच त्यांनी संतुष्ट असावे. रोमन कॅथॉलिकांमध्ये ही विचारसरणी अजून कायम असल्यामुळे त्यांच्या अनेक संस्था उत्कृष्टपणे चालतात. आमचे ऋषी त्यापलीकडची उडी मारून शिष्यांना कुटुंबातच समाविष्ट करून घेत. पण ते जे शिकवीत ते सामान्यांच्या कामाचे नसे. सामान्य जनतेचे आवश्यक शिक्षण घराघरांतून आणि पारंपरिक उद्योगांद्वारा होत असे. त्या काळात ही व्यवस्था चांगली होती. परिस्थिती पुष्कळच बदलली आहे. शब्दज्ञानाची मागणी जोराने वाढीवर आहे. सामान्यांनाही शिक्षणाची तहान लागली आहे. त्यांच्या या इच्छेचे सुयोग्य प्रवाहीकरण केले तर पुष्कळच लाभ होऊ शकतो. या संधीचा अधिकाधिक चांगला उपयोग करावयास हवा. याकरिता हजारो शिक्षकांची आवश्यकता आहे. त्यासाठी प्रयत्न करावे लागतील. आणि ते भीक मागून उपजीविका करण्यास तयार होणार नाहीत. त्यांना काही निश्चित वेतन देण्याची व्यवस्था करावीच लागेल. आम्हाला शिक्षकांचे एक सैन्यच्या सैन्य लागेल, आणि त्या सर्वांना त्यांच्या कामाच्या महत्त्वानुसार वेतन देणे कधीच शक्य होणार नाही. राष्ट्र त्यांना फक्त यथाशक्तीच देऊ शकेल. अर्थात् जसजसे लोकांना त्यांच्या कार्याचे तुलनात्मक मोल पटेल तसतसे ते त्यांना अधिक वेतन द्यावयास तयार होतील. पण ही वेतनवाढही कदाचित् फार हळू होईल. म्हणून ज्यांना पैशाची पर्वा वाटणार नाही अशा निव्वळ देशभक्तीने प्रेरित लोकांनी पुढे सरसावण्याची फार गरज आहे. असे झाल्यास शिक्षकाच्या पेशाकडे कोणीही तुच्छतेने पाहणार नाही; उलट सर्व समाज त्याच्यावर प्रेम आणि आदर यांचा वर्षाव करील.

१२. शिक्षणाचे माध्यम

शिक्षणासंबंधी माझे विचार स्पष्ट करणे हे माझे देशाबद्दलचे कर्तव्य आहे. जे पटतील त्यांचा लोकांनी स्वीकार करावा. अनेक वर्षांच्या सतत विचारानंतर मी काढलेले निष्कर्ष येणेप्रमाणे :–

(१) माझा उच्च – अगदी उच्चोच – शिक्षणालासुद्धा विरोध नाही.

(२) जे शिक्षण सरकारच्या उपयोगी असेल त्याचा खर्च त्याने करावा.

(३) सरकारने आपल्या सामान्य (कर) उत्पन्नातून उच्च शिक्षणाचा खर्च चालविण्याच्या मी विरुद्ध आहे.

(४) आज आमच्या कॉलेजांतून जे साहित्याचे तथाकथित शिक्षण देण्यात येत आहे ते सर्वस्वी निरर्थक आहे असे माझे ठाम मत आहे. त्यामुळेच आमच्या सुशिक्षित वर्गात बेकारी बोकाळली आहे. इतकेच नव्हे तर त्याच्या बोज्यामुळे आमच्यातील युवक-युवतींच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्याच्याही चिंधड्या उडाल्या आहेत.

(५) विदेशी भाषेचे माध्यम असल्याने आमच्या राष्ट्राची अपार बौद्धिक आणि नैतिक हानी झाली आहे. हे नुकसान किती अनर्थकारी आहे याचा आज आम्हाला अंदाज़ लागत नाही. आणि संकट हे की आम्ही स्वत: या जुलमाचे बळी असून आमच्यावर त्याला जोखण्याची जबाबदारी आहे. हे जवळपास अशक्यप्राय आहे.

या निष्कर्षांची मला कारणे दिली पाहिजेत, ती येणेप्रमाणे :–

१२ वर्षें वयापावेतो मी माझ्या मातृभाषेतून (गुजरातीतून) शिक्षण घेतले. त्या वेळी गणित, इतिहास, भूगोल यांचे मला मोजके ज्ञान होते. नंतर हायस्कूलमध्ये गेलो. पहिली तीन वर्षे तेथेही मातृभाषेचे माध्यम होते. पण शाळामास्तरांवरील एक जबाबदारी आम्हाला इंग्रजीचे इंजेक्शन देण्याची होती. त्यामुळे आमचा अर्धाअधिक वेळ इंग्रजी भाषेच्या शिक्षणात जात असे. आम्हाला ते त्रासदायक वाटे. इंग्रजीची लेखनपद्धती उच्चारानुगामी नसल्यामुळे या संकटात भर पडे. सहज म्हणून मी याचा उल्लेख केला आहे. माझ्या मूळ सिद्धांताशी याचा फारसा संबंध नाही.

पण खरी कटकट चौथ्या वर्गापासून सुरू झाली. भूमिती, बीजगणित, रसायनशास्त्र, खगोलशास्त्र, इतिहास, भूगोल, या सर्वांचे शिक्षण इंग्रजीच्या माध्यमातून सुरू झाले; फार काय, संस्कृत आणि फारसीही इंग्रजीमार्फत शिकावी लागे. गुजरातीतून कोणी विद्यार्थी वर्गात बोलला तर त्याला शिक्षा मिळे.पण जी इंग्रजी

त्याला स्वत:ला नीट येत नसे व जी त्याला शुद्ध बोलता येत नसे, ती इंग्रजी चुकीच्या पद्धतीने बोलण्यास मात्र शिक्षकांना हरकत नसे. शिक्षकाचेच इंग्रजी अशुद्ध, तेथे तो बिचारा कोणत्या तोंडाने आक्षेप घेणार? एवंच जे आम्हाला मुळीच समजत नसे अथवा अर्धवट समजे असे पुष्कळच आम्हाला पाठ करावे लागे. भूमिती म्हटली की माझे डोके दुखू लागे. तेराव्या प्रमेयापावेतो आम्ही गेलो तोपावेतो एक अक्षरही मला समजले नव्हते. मला कबूल करणे भाग आहे की मला मातृभाषेचे उदंड प्रेम असले तरी त्या विषयातील पारिभाषिक शब्दांचे गुजराती पर्याय आजही मला अवगत नाहीत. मला एवढे समजते की ते सर्व विषय जर मी गुजरातीतून शिकलो असतो तर, ज्याला चार वर्षे लागली ते एका वर्षात आले असते. माझ्या गुजराती भाषेच्या ज्ञानातही भर पडली असती. शिवाय विषयही मला नि:संदिग्धपणे समजले असते. पण इंग्रजी शिक्षणामुळे माझे कुटुंबीय – ज्याना इंग्रजी येत नसे – आणि मी यांच्यात जणू काय एक खाई निर्माण झाली. मी काय करीत आहे याचा वडिलांना पत्ता नसे. इच्छा असूनही मी त्यांच्यात माझ्या शिक्षणाबद्दल चौकसपणा निर्माण करू शकलो नसतो. अशा प्रकारे मी स्वतःच्या घरातच परका बनू लागलो. येथवर की माझा पोषाखही हळूहळू बदलू लागला. हा अनुभव केवळ माझाच होता असे नव्हे, तर अनेकांचा असेल.

हायस्कूलच्या पहिल्या तीन वर्षांत माझ्या सामान्यज्ञानात फारशी वाढ झाली नाही. कारण या काळात इंग्रजीचे माध्यम गळी उतरविण्यात येत असे. माझ्या शाळेतील तीनशे विद्यार्थ्यांनी जे ज्ञान मिळविले ते त्यांच्यापाशीच थबकले, सामान्यांपावेतो ते पोचावे अशा त्याचा उद्देशही नव्हता.

आता वाङ्मयाचा विचार करू या. आम्हाला इंग्रजी गद्य-पद्याची अनेक पुस्तके वाचावी लागली. ते सर्व निर्विवादपणे उत्कृष्ट वाङ्मय होते. पण जनसंपर्काच्या व जनसेवेच्या दृष्टीने ते निरुपयोगी होते. मी ते न वाचतो तर एखाद्या मौलिक खजिन्याला आंचवलो असतो असे मी म्हणू शकत नाही. उलट तेच सर्व ज्ञान जर मी गुजरातीतून मिळविले असते तर मला शेजाऱ्यापाजाऱ्यांना त्या ज्ञानात वाटेकरी करता आले असते. गुजराती वाङ्मयातही मी भर टाकू शकलो असतो. आणि देशाची सेवा करण्याची माझी पात्रता आजपेक्षा सरस ठरली नसती असे कसे म्हणता येईल?

विदेशी भाषेचे असह्य ओझे आमची मुलेच पेलू शकतात, पण त्यांना त्याची भरपूर किंमत द्यावी लागते. दुसरे ओझे उचलण्यास त्यांच्याजवळ शक्ती शिल्लक उरत नाही. त्यामुळे आमचे स्नातक बहुतांश अशक्त, निरुत्साही, रोगी आणि कोरडे अंधानुयायी बनून बसतात. संशोधनवृत्ती, स्वतंत्र विचाराला लागणारे धैर्य, साहस,

पराक्रम, निर्भयता आदी गुणांचा त्यांच्यामध्ये लोप होतो. त्यामुळे नव्या योजना बनविता येत नाहीत. बनविल्या तर त्या पूर्ण करता येत नाहीत. ज्यांच्यात वरील गुण प्रत्ययाला येतात ते अपमृत्यूला बळी पडतात. इंग्रजीतून शिकलेल्या आम्हाला या एकंदर नुकसानाचे गणित करता येणार नाही. सामान्यांवर आमचा किती नगण्य प्रभाव आहे इकडे आमचे लक्ष जाईल तर आम्हाला त्याचा अंदाज करता येईल.

आई दूध पाजीत असता जे संस्कार घडविते आणि जे गोड शब्द आमच्या कानी पडत असतात, त्यांच्यात व शाळेतील शिक्षणात मेळ असला पाहिजे. तो विदेशी भाषेतून शिक्षण घेतल्याने राहत नाही. या ताटातुटीचा हेतू शुद्ध असला तरी तो करणारे आमचे शत्रू ठरतील. हे शिक्षण घेऊन आम्ही मातृद्रोही ठरतो. शिक्षित आणि अशिक्षितांमध्ये एक भिंत उभी होते. आम्हाला सामान्य जनतेची ओळख उरत नाही. तीही आम्हाला ओळखेनाशी होते. ती आम्हाला साहेब समजते व भिते. आमच्यावर तिचा विश्वास नसतो. परिणामी आमच्या राष्ट्रीय जीवनाच्या प्रवाहाची गतीच कुंठित झाली आहे.

इंग्रजी भाषेला जरूर तेवढेच स्थान मिळाले व मातृभाषेला तिचे न्याय्य स्थान मिळाले की मग आमची मनोगती शृंखलामुक्त होऊन नंतर ताज्या दमाच्या सुसंस्कृत अशा आम्हाला इंग्रजी भाषा शिकण्याचे ओझे वाटणार नाही. मला तर असे वाटते की नंतरचे हे इंग्रजी भाषाज्ञान अधिक सौष्ठवपूर्ण राहील.

मातृभाषेतून शिक्षण सुरू होताच आमचे निराळे गोड कौटुंबिक संबंध निर्माण होतील. आजची पत्नी खऱ्या अर्थाने सहचरी बनत नाही. तिला नवरा काय करतो याचा क्वचितच पत्ता असतो. मातृभाषेतून शिक्षण झालेले असेल तर आम्ही आमच्या संपर्कात येणाऱ्या धोबी, न्हावी, भंगी आदी सर्वांना सहज शिकवू शकू. विलायतेत हजामत करता करता नापिताशी राजकारणाची चर्चा करता येते. आम्ही तर प्रत्यक्ष स्वतःच्या कुटुंबातसुद्धा असे करू शकत नाही. आमचे कुटुंबीय अथवा न्हावी अज्ञानी आहेत असे नाही. आमच्याकडील न्हाव्याचे ज्ञान विलायती न्हाव्याएवढे खास आहे. त्याच्याशी आम्ही रामायण, महाभारत, तीर्थक्षेत्रे यांची चर्चा करू शकतो, कारण त्याला त्यांचे ज्ञान असते. पण शाळेतील ज्ञान त्यांच्यापावेतो इंग्रजीच्या अडचणीमुळे पोचू शकत नाही, कारण आम्ही त्यांना ते समजावून सांगू शकत नाही.

आज इंग्रजीचा अभ्यास व्यापारी दृष्टीने केला जातो. राजनैतिक दृष्टीही असते. इंग्रजीशिवाय सरकारी नोकरी मिळणार नाही हा आमच्या विद्यार्थ्यांचा समज

स्वाभाविक मानला पाहिजे. मुलींना चांगले स्थळ मिळावे म्हणून इंग्रजी शिकविण्यात येते. मी असे अनेक जण पाहिले आहेत ज्यांना त्यांची पत्नी त्यांच्या मित्रमंडळीत इंग्रजी न बोलू शकली तर फार दुःख होते. काही कुटुंबांत तर इंग्रजी जणू मातृभाषाच बनली आहे. हा दुर्विचार आमच्यात इतका खोल रुजला आहे की इंग्रजी भाषेचे ज्ञान म्हणजेच शिक्षण असे मानण्याइतपत आमची मजल गेली आहे. माझ्या मते हे सर्व आमच्या गुलामी वृत्तीचे आणि अधःपाताचे द्योतक आहे. माझ्या घराच्या खिडक्या-दारे बंद असावीत असे मला मुळीच वाटत नाही. मलाही वाटते की सभोवतीच्या इतर संस्कृतीतल्या चांगल्याची हवा माझ्या घरातून भरपूर खेळावी. पण त्या वावटळीत माझे पाय जमिनीवरून उचलले जाऊन मी तोंडघशी पडलेले मात्र मला चालणार नाही. दुसऱ्याच्या घरात पाहुणा अथवा भिकारी किंवा गुलाम म्हणून राहण्यास मी तयार नाही. खोटा अहंकार अथवा भ्रामक सामाजिक प्रतिष्ठेला बळी पडून भगिनीवर्गावर इंग्रजीचा अत्याचार मी करणार नाही. आमच्या तरुण मंडळींना जिज्ञासा असेल तर त्यांनी अवश्य इतर परदेशी भाषांप्रमाणे इंग्रजीचाही अभ्यास करावा. पण त्यांनी आपल्या ज्ञानाचा लाभ डॉ. जगदीशचंद्र बोस, सर प्रफुल्लचंद्र राय किंवा कविसम्राट टागोर यांच्याप्रमाणे आपल्या देशवासियांच्या आणि जगाच्या पदरात टाकावा. पण कोणाही भारतीयाने आपल्या मातृभाषेला विसरावे, तिची चेष्टा करावी अथवा त्याला तिची लाज वाटावी व उत्तमोत्तम विचार स्वतःच्या मातृभाषेत व्यक्त करता येणार नाहीत असे त्याला वाटावे , हे मात्र मला खपणार नाही.

इंग्रजी भाषेतील श्रेष्ठ साहित्याला माझा विरोध नाही. मी स्वतः ‘हरिजन’ इंग्रजीतून चालवितो, यावरून माझे इंग्रजीवरील प्रेम स्पष्ट व्हावे. मात्र इंग्लंडच्या सृष्टिसौंदर्याचा जसा भारताला उपयोग नाही, तसा इंग्रजीतील साहित्याचाही नाही. भारताने स्वतःचे निसर्ग-सौंदर्य आणि साहित्य यांचाच परिपोष करावा; मग ते इंग्लंडपेक्षा कनिष्ठ प्रतीचे का असेना. दुसऱ्याचा वारसा घेऊ तर आमचा स्वतःचा वारसा नष्ट होईल. खरे म्हणजे परकी सामुग्रीच्या सहाय्याने आम्हाला आत्मोन्नती करताच येणार नाही. भारताने स्वतःचेच भाषाभांडार समृद्ध करावे आणि हवे तर इतर भाषाभांडारातून त्यात भर घालावी. कविसम्राट टागोरांच्या कृतीचा आनंद घेण्यास्तव मला बंगाली भाषा आलीच पाहिजे असे नाही. भाषांतरामार्फत मला तो मिळू शकेल. टॉलस्टॉयच्या गोष्टींचा आनंदही गुजरातीमार्फत मिळविता येईल. इंग्रजांना असा गर्व आहे की जगातील कोणत्याही भाषेत प्रसिद्ध झालेले उत्कृष्ट वाङ्मय ते एका आठवड्याच्या आत इंग्रजी भाषेत स्वतःच्या देशवासियांच्या हाती देऊ शकतात. हे

जर खरे तर शेक्सपीअर अथवा मिल्टन यांना जाणून घेण्याकरिता इंग्रजीचे ज्ञान मला अनिवार्य कां असावे?

कोणत्या ठिकाणच्या मुलामुलींचे शिक्षण कोणत्या भाषेत व्हावे हे ठरविण्याचा अधिकार साहित्यिकांचा नव्हे. राष्ट्राच्या उपजत प्रकृतिधर्माने याचे उत्तर देऊन ठेवलेले आहे. ते उत्तर साहित्यिकांनी फक्त कार्यान्वित करायचे असते. या बाबतीत आम्ही खेळखंडोबा केला तर ज्या स्वतंत्र, समाधानी भारताचे आम्ही स्वप्न पाहत आहोत तो कदाचित् आम्हाला निर्माणच करता येणार नाही असे मला भय वाटते.

प्रथम आम्ही स्वत:च्या संस्कृतीचाच मान राखण्यास शिकले पाहिजे. तिला आत्मसात केले पाहिजे. त्यानंतर इतर संस्कृतींची गोष्ट येईल. आमच्या संस्कृतीशी तुल्यबल अशी मौलिकता इतर संस्कृतींत नाही असा माझा दृढ विश्वास आहे. आम्ही हे ओळखलेले नाही. आम्हाला आमच्याच संस्कृतीचा तिरस्कार करण्याचे शिक्षण दिले गेले आहे. ती आचरणात आणण्याचे तर आम्ही जवळपास सोडूनच दिले आहे. आचरणाशिवाय ज्ञान म्हणजे मसाला भरून ठेवलेला मृतदेह. पहायला तो सुंदर असू शकेल, पण त्यात प्रेरणाशक्ती असू शकणार नाही. माझा धर्म म्हणतो : 'आपली संस्कृती शीक, ग्रहण कर, आणि आचर.' असे न होईल तर आमची, आमच्या संस्कृतीशी फारकत होऊन एक समाज म्हणून आम्ही आत्महत्या करून घेऊ. पण इतर संस्कृतींचा अनादर करू नकोस, त्यांना तुच्छ लेखू नकोस, अशीही माझ्या धर्माची शिकवण आहे.

माझी मातृभाषा कितीही गरीब असो, मूल जसे आईला बिलगून असते तसा मी तिला बिलगून राहीन. तीच मला जीवनास आवश्यक असणारे दूध देऊ शकेल. इंग्रजीने तिची जागा घेतलेली मला खपणार नाही. इंग्रजी आज जगाची भाषा बनली आहे हे मला मान्य आहे, म्हणून मी तिला दुसरे स्थान अवश्य देईन. पण शाळा-कॉलेजांतून नव्हे. काहींनी तिचा अभ्यास करावा, लाखो-करोडोंनी सक्तीने करू नये. आज आमच्याजवळ प्राथमिक शिक्षणास अनिवार्य करण्यासाठी अवश्य तेवढीसुद्धा साधने नाहीत; इंग्रजी भाषेचे शिक्षण देण्याची व्यवस्था आम्ही कशी करू शकू? रशियाने इंग्रजीशिवाय आपली सर्व शास्त्रीय प्रगती केली. निव्वळ मानसिक गुलामीमुळे आम्हाला वाटते की इंग्रजीशिवाय आमचे चालणार नाही. मला हे मुळीच मान्य नाही.

सरकार व सरकारी कचेऱ्या दक्ष न राहिल्या तर संपूर्ण भारतात इंग्रजी भाषा आमच्या भाषेची जागा घेऊन बसेल. त्यामुळे इंग्रजी न समजणाऱ्या आमच्या अनेक

लोकांचे अपरिमित नुकसान होईल. प्रांतीय काम प्रांतीय आणि आंतर-प्रांतीय काम आंतर-प्रांतीय भाषेतून करू शकणारा नोकरवर्गच नियुक्त करणे, हे प्रांतिक सरकारांना सहज करता येईल. माझ्या मते आंतर-प्रांतीय भाषा फक्त नागरी किंवा उर्दू लिपीमध्ये लिहिण्यात येणारी हिंदुस्तानी भाषाच असू शकते.

हे आवश्यक फेरबदल करण्यात एक दिवसही वाया घालविणे म्हणजे देशाचे सांस्कृतिक दृष्ट्या नुकसान करणे आहे. ज्या प्रांतीय भाषा भारताला वरदान म्हणून प्राप्त आहेत त्यांचे आम्ही प्रथम संशोधन करावे. भाषेतील बदल शाळा, कॉलेजे, कचेऱ्या, कोर्टे येथे घडवून आणण्यात वेळ लागेल, असे म्हणणे हा बौद्धिक आळसाचा प्रकार आहे. ज्याप्रमाणे आमच्या स्वातंत्र्याचे जुलूमजबरदस्तीने अपहरण करणाऱ्या इंग्रजी राजवटीला यशस्वी रीतीने आम्ही नष्ट केले, त्याचप्रमाणे आमच्या संस्कृतीची गळचेपी करणाऱ्या इंग्रजी भाषेला पण पदच्युत केले पाहिजे. अर्थात्, व्यापार व राजनीतीच्या क्षेत्रांत आंतरराष्ट्रीय भाषा म्हणून इंग्रजीचे स्वाभाविक महत्त्व सदैव कायम राहील.

माझ्या मते धार्मिक बाबतीत संस्कृत भाषेचा वापर टाळता येऊ शकणार नाही. भाषांतर कितीही शुद्ध असले तरी मूळ मंत्रांचे महत्त्व त्याला प्राप्त होणे नाही. मूळ मंत्रांची वैशिष्ट्ये भाषांतरात दिसून येणार नाहीत. शतकानुशतके ज्या मंत्रांचे संस्कृत भाषेतून सतत पठण सुरू आहे, त्यांच्याऐवजी देशी भाषा वापरल्यास त्यांच्या गांभीर्यात न्यून येईल. पण मंत्रांचा आणि विधींचा अर्थ आणि त्यांचे महत्त्व हे स्पष्ट समजावून सांगायलाच हवे. संस्कृत भाषा व साहित्य यांचा अभ्यास योग्य प्रमाणात न झाल्यास हिंदुधर्माचा नाश होईल यात शंका नाही. वस्तुत: शिक्षण-पद्धतीतील दोषांमुळे संस्कृत शिकणे कठीण वाटते. खरे तर ते कठीण नाही. धार्मिक शिकवणीनुसार आचरण करणे हे अधिक कठीण आहे. म्हणून ज्याला धार्मिक आचरण करावयाचे आहे त्याने त्या मार्गावरील पायऱ्या कितीही कठीण असल्या तरी सोप्याच मानावयास पाहिजेत.

१३. राष्ट्रभाषा आणि लिपी

आमचे एकराष्ट्रीयत्व यथार्थ ठरण्याकरिता आमच्या असंख्य गोष्टी एकरूप असाव्या लागतील. निरनिराळे धर्म व त्यांच्या शाखांना एका सूत्रात बांधणारी आमची एक विशिष्ट संस्कृती आहे. आमचे सर्वांचे दोष व अडचणी सारख्याच आहेत. आमच्या वेषभूषेसाठी एका प्रकारचे कापड पुरेसे आहे; नव्हे, आवश्यक आहे. प्रांतीय भाषांऐवजी नव्हे, तर त्यांना जोडून सगळ्यांना उपयोगी पडेल अशा एका (राष्ट्र)भाषेची आवश्यकता आहे. ती हिंदुस्तानीच असू शकते, जी उर्दू-हिंदी यांचे मिश्रण असलेली, पण संस्कृत, फारशी अथवा अरबी शब्दांचा भडिमार नसलेली अशी असावी, याबद्दल सामान्यत: एकमत आहे.

अनेक लिप्या ही आमच्या मार्गातील मोठी धोंड आहे. एका लिपीचा वापर शक्य झाल्यास एका राष्ट्रभाषेचे आमचे स्वप्न – सध्या ते स्वप्नच आहे – साकार होण्याच्या मार्गातील मोठी अडचण दूर होईल. या भिन्न लिप्या असणे सर्व दृष्टीने हानिकारक आहे. ज्ञानसंपादनाला त्याच्यामुळे अडथळा होतो. आर्यभाषांमध्ये इतके साम्य आहे की भिन्न लिपींचा बोजा जर नाहीसा होऊ शकला तर आम्हाला अल्पावधीत पुष्कळशा भाषा शिकता येतील. उदाहरणार्थ, रवींद्रनाथांचे असाधारण साहित्य देवनागरीत छापले गेले तर संस्कृत जाणणाऱ्या बहुतांश लोकांना ते सहज समजू शकेल. परंतु बंगाली लिपीमुळे त्यांना 'जरा दूर रहा' अशी जणू सूचना दिल्यासारखे होते. त्याचप्रमाणे बंगाली लोकांना देवनागरी अवगत असेल तर त्यांनाही संत तुलसीदासांच्या रचनेतील अद्भुत सौंदर्य व आध्यात्मिकतेचा आस्वाद घेता येईल. संपूर्ण भारताकरिता एका लिपीचा आदर्श घटकाभर लांबचा मानला तरी संस्कृतोत्पन्न आणि दाक्षिणात्य भाषांकरिता एकेक लिपी असावी हे ध्येय व्यवहार्य ठरेल. फक्त याकरिता आम्हाला अवास्तव प्रांतीयतेची रजा घ्यावी लागेल.

उदाहरणार्थ, एखाद्या गुजरात्याने आपल्याच लिपीला चिकटून राहणे बरे नव्हे. अखिल भारतीयत्वास पोषक ठरणारे प्रांतीयत्वच इष्ट ठरेल. इतकेच नव्हे तर हे भारतीयत्वही विश्वबंधुत्वाशी विरोध करणारे नसावे. गुजरात म्हणजेच सर्वस्व, मग तिकडे देशाचे काही का होईना, हा आग्रह बरा नव्हे. देवनागरीच सर्वसामान्य लिपी असणे योग्य होईल हे प्रयत्नपूर्वक पटवून सांगण्याची गरजच नाही, असे मला वाटते. ती अधिकांश भारतीयांना ज्ञात आहे हा तिचा मोठा विशेष होय. प्रत्येक बोलीला चिरस्थायी बनवून तिचा विकास करण्याचा हट्ट राष्ट्र आणि विश्वहितविरोधी ठरेल.

सुसंस्कृत भारताकरिता आम्हाला एक सामान्य भाषा हवी असेल तर भाषांची संख्या वाढवू पाहणाऱ्या विघटनशील वृत्तीचा निरोध करावा लागेल. आम्हाला एका सामान्य भाषेचाच परिपोष करावा लागेल. माझे जर चालले तर इतर प्रांतीय लिप्यांबरोबर देवनागरी आणि उर्दू लिपीचे शिक्षणही मी आवश्यक करीन आणि देशी भाषांतील प्रसिद्ध कृती शब्दश: हिंदी भाषांतराबरोबर देवनागरीतून छापवून घेईन.

लिपीबरोबरच राष्ट्रभाषेचाही आम्ही विचार करावयास हवा. इंग्रजी जर आमची राष्ट्रभाषा बनणार असेल तर शाळांतून तिला अनिवार्य ठरवावे लागेल; अतएव ती आमची राष्ट्रभाषा बनू शकेल काय याचा प्रथम विचार केला पाहिजे. काही देशाभिमानी विद्वानसुद्धा म्हणतात, ''अहो ! हा प्रश्न विचारून स्वत:चे अज्ञान कां प्रकट करता? इंग्रजी राष्ट्रभाषा बनून चुकली आहे.''

आमच्यातील विद्वानांची दशा पाहिली तर घटकाभर वाटून जाते की इंग्रजीशिवाय आमचे सर्व कारभार बंद होतील. पण थोडा खोल विचार केला तर खात्री होईल की इंग्रजी आमची राष्ट्रभाषा बनू शकत नाही – बनू नये.

राष्ट्रभाषेच्या गमकांचा आपण प्रथम विचार करू या.

(१) ती भाषा सरकारी कर्मचाऱ्यांकरिता सोपी असावी.

(२) तिच्या सहाय्याने भारतातील पारस्परिक धार्मिक, आर्थिक आणि राजनैतिक व्यवहार सुलभतेने करता यावे.

(३) ती भारतातील बहुसंख्य लोकांची भाषा असावी.

(४) ती सोपी असावी.

(५) तिचा विचार करताना क्षणिक व (तात्पुरत्या) प्राप्त परिस्थितीचा आम्ही बाऊ करू नये.

इंग्रजी भाषेत वरीलपैकी एकही लक्षण नाही. ज्या लक्षणाचा मी प्रथम उल्लेख केला ते शेवटी लिहावयास हवे होते; प्रथम लिहिण्याचे कारण एवढेच की ते अंशत: इंग्रजी भाषेत आज दृग्गोचर आहे. थोडा विचार केल्यास स्पष्ट होईल की सरकारी कर्मचाऱ्यांच्या दृष्टीनेसुद्धा इंग्रजी तितकीशी सोपी नाही. बहुतांश कर्मचारी आज भारतीय असून त्यांचे प्रमाण वाढीवरच राहणार. त्यांना स्पष्टत: भारतीय भाषांच्या मानाने इंग्रजी जडच जाणार.

दुसऱ्या लक्षणाबाबत हे स्पष्ट आहे की सर्वांना इंग्रजी येईपावेतो आम्हाला धार्मिक विचारांची देवघेव करता येणार नाही. या प्रमाणात इंग्रजीचा सार्वत्रिक प्रसार

(आणि उपयोग) अशक्यप्राय वाटतो.

तिसरे लक्षण इंग्रजीत मुळीच नाही.

चौथेही लक्षण गैरहजरच आहे.

पाचव्या लक्षणाचा विचार करीत असता आम्हाला स्पष्ट दिसत आहे की इंग्रजीचा (आजचा) प्रभाव क्षणिक आहे; चिरकाळ टिकणारा नव्हे. कायम स्थितीत इंग्रजी भाषेची गरज औषधापुरतीच राहणार. फक्त परदेशी कामापुरती ती आम्हाला हवी असेल. आमचे तिच्याशी वैर मुळीच नाही. एका मर्यादेबाहेर तिचे स्तोम माजू नये एवढाच आमचा आग्रह आहे. इंग्रजी राष्ट्रभाषा बनू शकेल ही आमची कल्पनाच आमच्या दुर्बलतेचे प्रतीक आहे.

हिंदी भाषेत वरील पाचही लक्षणे स्पष्टपणे आहेत. याबाबत इतर कोणतीही भाषा हिंदीशी स्पर्धा करू शकणार नाही. बंगालीचा नंबर दुसरा लागेल. पण स्वत: बंगाली मित्र बंगालबाहेर हिंदीचाच उपयोग करतात. हिंदीभाषी अर्थात् सर्वत्र हिंदीचा उपयोग करतात आणि त्याचे कोणाला आश्चर्य वाटत नाही. धर्मोपदेशक आणि मौलवी सर्वत्र हिंदी-उर्दूचा उपयोग करतात व अशिक्षितांनाही त्यांचे बोलणे समजते. थेट द्रविड प्रांतातसुद्धा हिंदी ऐकू येते. मद्रासमध्ये सर्व काम इंग्रजीत चालते हे म्हणणे चूक आहे. अनेक मद्राशांना इतर प्रवाशांशी हिंदीत बोलताना मी ऐकले आहे. तेथील मुसलमान तर चांगले हिंदी बोलतात. अखिल भारतातील मुसलमान उर्दू बोलतात, आणि त्यांची संख्या सर्वत्र कमी प्रमाणात नाही.

अशा प्रकारे हिंदी आधीच राष्ट्रभाषा बनून चुकली आहे. कैक वर्षांपूर्वीपासून आम्ही तिचा तसा उपयोग करीत आहोत. उर्दूलासुद्धा हिंदीमुळेच उत्तेजन मिळाले आहे.

मुसलमान बादशहा फारसी अथवा अरबी भाषांना राष्ट्रभाषा बनवू शकले नाहीत. त्यांनी हिंदी भाषेचे व्याकरण स्वीकारून उर्दू लिपीचा आणि फारसी शब्दांचा उपयोग केला. पण सामान्यजनांशी व्यवहार करताना ते विदेशी भाषा वापरू शकले नाहीत. सैन्यात हिंदी अथवा उर्दू शब्द वापरतात हे संबंधितांना माहीत आहे.

पण हिंदीच राष्ट्रभाषा बनू शकते असे असले तरी दाक्षिणात्य सुशिक्षितांकरिता तो थोडा कठीण प्रश्न आहे. पण महाराष्ट्रीय, बंगाली, सिंधी आणि गुजराती लोकांना हे सोपे आहे. थोड्याच महिन्यांत हिंदी शिकून तिच्यात देशाचे कामकाज चालविता येईल. मात्र तमिळ इत्यादी द्राविडी भाषांचे व्याकरण संस्कृतपेक्षा निराळे आहे.

त्यांच्यात फक्त काही शब्द समान आहेत. पण ही अडचण फक्त आजच्या सुशिक्षितांपुरती आहे. त्यांच्या देशप्रेमावर विसंबून, ते हिंदी भाषा लवकरच आत्मसात करतील अशी अपेक्षा बाळगण्याचा आम्हाला अधिकार आहे. भविष्यात जेव्हा हिंदीला राष्ट्रभाषेचे स्थान मिळेल तेव्हा सर्व दाक्षिणात्य शाळांतून हिंदीचे शिक्षण सुरू होईल, आणि त्यामुळे त्यांचा इतर प्रांतांशी नजीकचा संपर्क निर्माण होऊ शकेल.

द्रविड मित्र लवकरच हिंदी शिकण्यास सुरुवात करतील अशी माझी खात्री आहे. इंग्रजीवर प्रभुत्व मिळण्यास ते आज जे परिश्रम करतात त्याच्या अष्टांश परिश्रम ते हिंदीसाठी करतील तर आज भारतात इतरत्र जे दरवाजे त्यांच्यासाठी बंद आहेत ते त्यांना खुले होतील, आणि पूर्वी कधीही नव्हती अशा प्रमाणात एकात्मता साधेल. अनेक लोक म्हणतील, इतरांनी द्राविडी भाषा शिकूनही हाच परिणाम साध्य होऊ शकेल; हे खरे. पण ते भाषाभाषी अल्पसंख्य असल्यामुळे त्यांनी हिंदी शिकणे हे राष्ट्रशक्तीवर ताण पडण्याच्या दृष्टीने मितव्ययी ठरेल.

द्रविड मित्रांनी निष्कारण हिंदी भाषेचा बाऊ करू नये. मनोरंजनाच्या कार्यक्रमातून दररोज थोडा वेळ इकडे लक्ष दिल्यास एका वर्षाच्या आत सामान्यत: कोणालाही हिंदी यावे. मी अनुभवाने सांगतो की कोणतेही द्रविड मूल अगदी सहज हिंदी शिकते. दक्षिण आफ्रिकेतील सर्व तमिळ-तेलुगुभाषी लोकांना हिंदी येते हे कदाचित् सर्वांना माहीत नसेल. याकरिता करावयाचे थोडेसे श्रमही करण्यास जर आम्ही नाखूश असू तर सामान्य जनतेबद्दलचे आमचे प्रेम निव्वळ ढोंग ठरेल.

दुसरी भाषा न शिकण्याबद्दल बंगालचा पूर्वग्रह आणि हिंदी कठीण आहे हा दक्षिणात्यांचा समज, यामुळे बंगाल आणि मद्रास हे दोन भारतापासून निष्कारण वेगळे पडतात. एखादा बंगाली दररोज तीन तास खर्च करील तर त्याला दोन महिन्यांतच हिंदी येईल, आणि द्रविड मित्राला सहा महिने लागतील. एवढ्या मुदतीत त्यांपैकी कोणालाही इंग्रजी शिकता येणार नाही. भारतात इंग्रजी जाणणारे फार कमी आहेत; हिंदी जाणणारे कितीतरी जास्त आहेत. इंग्रजी येऊन आम्ही फक्त मोजक्या लोकांशी व्यवहार करू शकू. याउलट, हिंदीचे अगदी जुजबी ज्ञान असेल तरी कितीतरी मोठ्या जनसमुदायाशी आम्हाला विचारांची देवघेव करता येईल. द्रविड मित्रांच्या अडचणीची मला जाणीव आहे, पण देशप्रेम आणि उद्यमशीलता यांना काहीही कठीण असू शकणार नाही. आमच्या भोवतीचे वातावरण कृत्रिम नसते तर दक्षिणी मित्रांना हिंदी भाषा शिकणे व्यर्थ अथवा कष्टदायक वाटले नसते.

ज्यांना सामान्य जनतेच्या हिताहिताची जाणीव नाही, त्यांना वाटते की इंग्रजी हिंदीच्या केवळ बरोबरीचीच नव्हे, तर राष्ट्रभाषा बनण्याच्या लायकीची एकमेव भाषा आहे. परदेशी सत्तेचे जोखड मानेवर नसते तर असे कोणाला वाटते ना. दक्षिण भारतातील ज्या अधिकांश जनतेला देशाच्या कारभारात जबाबदारीची भागीदारी करावयाची आहे तिला कोणती भाषा सुलभ जाईल? मूठभर लोक बोलू शकतात ती इंग्रजी की ज्या भाषेत इतर अनेक प्रांतीय भाषांतील शब्दांशी मिळतेजुळते शब्द आहेत ती हिंदी?

हिंदीला राष्ट्रभाषेचा मान देण्याचा विचार स्वराज्याच्या कल्पनेशी निगडित आहे. इंग्रजी बोलू शकणारांपुरतेच जर स्वराज्य असेल तर निर्विवादपणे इंग्रजीच राष्ट्रभाषा असावयास हवी. पण ते तर सर्वांचे – कोट्यवधी अर्धपोटी असणारांचे, निरक्षरांचेही – राहणार आहे. असे असल्यामुळे हिंदीच राष्ट्रभाषा बनू शकते.

प्रांतीय भाषांचे नुकसान करणे वा त्यांना नष्ट करणे कदापि इष्ट होणार नाही, अशी माझी पक्की धारणा आहे. भिन्न प्रांतांमधील व्यवहाराच्या सोयीकरिता आम्ही हिंदी शिकावी एवढाच माझा आशय आहे. असे म्हणण्यात हिंदीच्या तर्फे पक्षपात होतो असे म्हणता येणार नाही.

इंग्रजीशिवाय उच्च समाजात प्रतिष्ठा मिळणार नाही हा कुविचार आमच्या मुलामुलींच्या मनांत रुजविणे म्हणजे एक प्रकारची हिंसा आहे. हा विचार इतका अपमानजनक आहे की मी तो सहन करू शकत नाही. इंग्रजीच्या मोहाचा त्याग ही स्वराज्यप्राप्तीसाठी महत्त्वाची अट आहे.

१४. संतति-नियमन

कृत्रिम साधनांनी संतति-नियमन करण्याच्या इष्टानिष्टतेचा मी विचार करीत आहे. आजकाल डांगोरा पिटून जाहीर करण्यात येत आहे की कर्जफेडीप्रमाणेच वासनापूर्ती हेही एक कर्तव्यच आहे; हे न करू तर शिक्षा म्हणून आमच्या वाट्याला बुद्धिमांद्य येईल. विषयवासना आणि प्रजोत्पत्ती यांचा परस्परसंबंध नसल्याचेही सांगण्यात येते. संतति-नियमनाचे समर्थक तर असेही सांगतात की गर्भधारणा हा निव्वळ अपघात असून पति-पत्नींना संततीची इच्छा न होईल तोपावेतो ती टाळली पाहिजे. माझ्या मते हा सल्ला अत्यंत भयावह आहे. विषयवासनेच्या तृप्तीला जर कर्तव्य मानले तर तिच्या अनैसर्गिक मार्गांनाही वैध – नव्हे स्तुत्य – मानावे लागेल. असले प्रकार आणि कृत्रिम संतति-नियमन यांच्यात फारसा भेद आहे असे मला वाटत नाही.

संतती मर्यादित असावी, याबद्दल दुमत संभवत नाही. याचा ब्रह्मचर्य आणि संयम हा युगानुयुगांपासून आम्हाला उपलब्ध असलेला एकमेव मार्ग आहे. या रामबाण उपायाचा अवलंब करणारांच्या पदरी अनेक लाभ पडतात. कृत्रिम साधनांऐवजी आत्मसंयमाची साधने जर डॉक्टर शोधून काढतील तर मानवजातीवर त्यांचा फार मोठा उपकार होईल.

कृत्रिम साधनांनी दुष्प्रवृत्तींना उत्तेजन दिल्यासारखे होते. त्यामुळे उच्छृंखलता वाढते. आणि या कृत्रिम साधनांना जी प्रतिष्ठा दिली जात आहे त्यामुळे, लोकमतामुळे जो संयम आम्ही पाळत होतो त्याच्या ह्रासाची गती वाढल्याखेरीज राहणार नाही. कृत्रिम साधनांच्या अवलंबनामुळे वीर्यहीनता, किंबहुना नपुसंकताही संभवते. संतति-नियमनाचा हा इलाज रोगापेक्षाही जास्त भयंकर ठरेल.

स्वत:च्या कर्मफलापासून पळण्याचा प्रयत्न करणे अनीतिमय आहे. अति-भोजनामुळे पोट दुखत असेल तर त्यावर लंघन हाच उत्कृष्ट इलाज आहे. जिभेवर ताबा नसल्यामुळे अमाप खायचे व नंतरच्या परिणामापासून बचावण्याकरिता औषधे धुंडाळायची, हे स्पष्टपणे वाईट आहे. पशूंप्रमाणे विषयभोगात डुंबून नंतरच्या परिणामापासून पळ काढणे त्याहीपेक्षा वाईट आहे. निसर्ग कठोर आहे. निसर्ग-नियमांच्या भंगाचे फळ भरपूर भोगावे लागते. संयमाच्या सहाय्यानेच आम्हाला नैतिक परिणाम मिळू शकतो. इतर साधने त्यांच्या हेतूचा नाश करणारीच ठरतील.

विषयोपभोग करूनही कृत्रिम उपायांद्वारा संतती न होऊ देण्याची प्रथा जुनीच

आहे. पूर्वी तिचा गुप्त रीतीने उपयोग करीत. आज तिला प्रतिष्ठेचे स्थान मिळाले असून साधने शास्त्रोक्त रीतीने बनविण्यात आली आहेत. शिवाय या प्रथेवर परमार्थाचा बुरखा चढविण्यात आला आहे. समर्थक म्हणतात, ''भोगेच्छा स्वाभाविक आहे; कदाचित् ते ईश्वराचे वरदानही असेल. भोगेच्छेचे उच्चाटन अशक्य आहे. संयमाचा अंकुश वापरणेही कठीण आहे. अतएव संयमाव्यतिरिक्त इतर इलाज न शोधून काढला तर स्त्रीवर्गावरील प्रजोत्पत्तीचे ओझे असह्य होईल. आणि लोकसंख्येचा विस्फोट होऊन उपाशी मरण्याची पाळी येईल. या दोन्ही संकटांना टाळणे अवश्य असल्यामुळे कृत्रिम उपायांचा उपयोग करणे हे माणसाचे कर्तव्य (धर्म) ठरते.''

या तर्काचा मजवर मुळीच परिणाम झालेला नाही, कारण या उपायांनी माणूस इतर अनेक संकटांना आमंत्रण देतो. मुख्य म्हणजे संयमशीलता गमावून जर तात्कालिक सुख मिळत असेल तर हा सौदा फार महाग ठरेल. आत्मवंचनेमुळे आमच्या अडचणी सुरू होतात. वैचारिक निग्रहामुळे जर संयम केला तर यश मिळाल्यावाचून राहणार नाही. निव्वळ विषयोपभोगाकरिता स्त्री-पुरुषांची जोडी बनविलेली नाही. कामेच्छेबद्दल लाज वाटण्याचे कारण नाही हे खरे, पण फक्त प्रजोत्पत्तीकरताच तिचा उपयोग व्हावा; इतर तऱ्हेने उपयोग केल्यास ते ईश्वर आणि मानवजातीविरुद्ध केलेले पाप ठरेल. संयमावर भरवसा नसणे हे धर्मावर भरवसा नसल्यागत होईल, कारण धर्माची आमूलाग्र उभारणीच मुळी संयमावर आहे.

लपूनछपून करण्यात येणाऱ्या पापामुळे शाळा-कॉलेजांतील मुले-मुली कशी व किती नासली आहेत हे मला माहीत आहे. संशोधनाच्या आडोशाने निर्माण होणारी साधने आणि या प्रथेला मिळालेला सामाजिक आणि राजनैतिक पुढाऱ्यांचा पाठिंबा यामुळे ही समस्या विशेषच कठीण होऊन बसली आहे. त्यामुळे सामाजिक शुद्धीकरण घडवू इच्छिणाऱ्या कार्यकर्त्यांचे काम अशक्यप्राय होऊन बसले आहे. शाळा-कॉलेजांतून शिकणाऱ्या काही कुमारी मुलींजवळ त्या उत्सुकतेने वाचतात असे संतति-नियमनाचे वाङ्मय आणि साधने असतात असे मी सांगेन तर मोठेसे गुपित सांगतो अथवा कोणाचा विश्वासघात करतो असे मला वाटत नाही. ही साधने विवाहित स्त्रियांपावेतोच सीमित राखणे अशक्य आहे. आणि विवाहाचा उद्देश आणि उपयोग यांचे अधिष्ठानच जर पशुतुल्य विषयभोग आणि त्याच्या अपरिहार्य परिणामाबद्दलची बेफिकिरी हे बनेल, तर विवाहातील सर्व पावित्र्यच नष्ट होऊन जाईल.

जे विद्वान स्त्री-पुरुष अगदी मिशनरी उत्साहाने या कृत्रिम साधनांचा प्रचार करीत आहेत ते देशातील युवकांचे अपार नुकसान करीत आहेत, याबद्दल मला बिलकुल

शंका नाही. इच्छेविरुद्ध ज्या गरीब स्त्रियांना संतती होते त्यांचे आम्ही रक्षण करीत आहोत, हा त्यांचा केवळ भ्रम आहे. ज्यांना खरी गरज आहे त्यांच्यापावेतो हे पोचू शकणार नाहीत. पाश्चिमात्य स्त्रियांना जे ज्ञान व शिक्षण प्राप्त आहे ते आमच्या ग्रामीण स्त्रियांना नाही.

एखादा शेतकरी खडकाळ जमिनीत उत्कृष्ट बी पेरील, अथवा उत्कृष्ट जमिनीत चांगले पीक येणे अशक्य व्हावे अशा रीतीने पेरणी करील, तर त्याला तुम्ही काय म्हणाल? पुरुषाला आणि स्त्रीला ईश्वराने अतुलनीय असे बी आणि जमीन ही अनुक्रमे दिली आहेत. या मौलिक संपत्तीचा दुरुपयोग करणे भयंकर मूर्खपणाचे ठरेल. खरे म्हणजे जडजवाहिरापेक्षाही अधिक काळजीपूर्वक या संपत्तीचे रक्षण केले पाहिजे. जी स्त्री नष्ट करण्याच्या इच्छेनेच बीजाचा स्वीकार करते तिलाही मूर्खच म्हणावे लागेल. ईश्वराच्या दरबारात हे दोघेही गुन्हेगार ठरतील, आणि त्यांना जे प्राप्त आहे ते हिसकावून घेण्यात येईल. पूर्वी अशा कृत्रिम साधनांचा उपयोग करणे पाप समजले जात असे. पापावर पुण्याचा छाप मारून त्याचा प्रसार करण्याचे दुर्भाग्य आमच्या पिढीच्याच नशिबी लिहिले आहे !

पुरुषांइतकाच स्त्रियांतही कामविकार प्रबल असतो असे मला वाटत नाही. स्त्रियांकरिता संयम अधिक सोपा आहे. आमच्या स्त्रियांना खरे शिक्षण द्यायचे तर त्यांना खुद्द नवऱ्यालासुद्धा प्रसंगोपात नकार द्यायचे शिकवावयास हवे. पतीच्या हातचे खेळणे अथवा त्याच्या कामपूर्तीचे निव्वळ साधन बनून राहणे हे तिचे कर्तव्य नाही, हे तिला सांगावयास हवे.

मानसिक गुलामीपासून तिला मुक्त करणे, स्वतःच्या शरीराचे पावित्र्य तिच्या मनावर बिंबविणे आणि राष्ट्र व मानवता यांच्या सेवेची प्रतिष्ठा आदी गोष्टी तिला प्रथम शिकविणे गरजेचे आहे. भारतीय स्त्रिया या परिवर्तनाला तयार होणार नाहीत असे मानून, त्यांच्या आरोग्याच्या रक्षणासाठी व प्रजोत्पत्तीला बांध घालण्यासाठी कृत्रिम साधनांचा उपयोग त्यांना शिकवण्याशिवाय गत्यंतर नाही असे मानणे अगदी चुकीचे होईल.

ज्या समाजसेवी भगिनींना अनिच्छेने संतती सहन कराव्या लागणाऱ्या स्त्रियांची कीव येते त्यांनी कृपा करून घाई करू नये. कृत्रिम उपायांचा प्रचार करूनही ताबडतोब उद्दिष्ट साध्य होईल, असे मुळीच नाही. कोणतीही पद्धती असो, तिचे शिक्षण देण्यास वेळ हा लागणारच. मला एवढेच म्हणायचे आहे की , आम्ही सुयोग्य मार्गाचेच शिक्षण

द्यावयास हवे.

कायद्याच्या सहाय्याने वंध्यीकरण ही माझ्या मते अमानुष कल्पना आहे. एखाद्या असाध्य रोग्याने ते करवून घेतले तर मात्र ते इष्ट ठरेल. स्त्रियांबाबत मी या कृत्रिम साधनाच्या विरुद्ध असलो तरी पण पुरुषांनी स्वत:साठी, स्वेच्छेने ते मान्य केले तर मला हरकत नाही, कारण पुरुष हा आक्रमक आहे.

लोकसंख्येच्या विस्फोटाच्या धाकामुळे कृत्रिम संतति-नियमन अपरिहार्य ठरते असे जे म्हणतात त्याबद्दल मला शंका आहे. ही गोष्ट अजून सिद्ध व्हायची आहे. जमिनीसंबंधी कायद्यांत सुधारणा केली, शेतीची स्थिती जर सुधारली आणि तिला जोडून एखादा धंदा चालविला तर आजच्या दुप्पट लोकसंख्येचे पालनपोषण करण्याची क्षमता भारतात आहे असे माझे मत आहे.

आमची पृथ्वी म्हणजे मोजका वेळच चालू शकेल असे खेळणे नव्हे. जनसंख्येचा भार तिला असह्य झाला असे कधी झालेले नाही. सबब कृत्रिम साधनांनी लोकसंख्येला पायबंद न घातला तर शेवटी अन्नाच्या तुटवड्यामुळे पृथ्वीचा नाश होईल हा महान शोध लागला कसा?

वाढत्या लोकसंख्येच्या भयाचे भूत नेहमी आमच्यासमोर नाचविण्यात आले आहे. कृत्रिम उपायांनी त्याला थोपविण्याचा प्रयत्न हे खरे संकट आहे. हे कृत्रिम उपाय राष्ट्राला अध:पतनाच्या खोल गर्तेत नेऊन सोडतील. ज्यांचे डोळे उघडे आहेत त्यांना आजही कृत्रिम उपायांचे दुष्परिणाम दिसत आहेत. नीतीच्या चर्चेत न शिरता मला म्हणता येते की कुत्र्यामांजरांप्रमाणे वाढू शकणाऱ्या लोकसंख्यावाढीला थांबविलेच पाहिजे, पण तिला थांबवीत असता आम्ही स्वत:वर अधिक वाईट परिणाम ओढवून घेणार नाही, याबद्दल खबरदारीही असले पाहिजे. आमची साधने जनतेच्या नैतिक उत्थानाला पोषक अशीच असावी. एका शापाबरोबरच (वाढती लोकसंख्या) इतर अनेक शापही (असंयम, अनैतिकता आदी) आपोआप नष्ट होतील असे शिक्षण जनतेला द्यावे. मार्ग चढणीचा आहे म्हणून त्या मार्गावरून पळ काढण्यात अर्थ नाही. माणसाच्या प्रगतीचे सर्व मार्ग चढणीचेच आहेत. त्यांना भिण्याचे कारण काय? आम्ही तर त्यांचे स्वागत करावयास हवे.

१५. नशाबाजी आणि स्पृश्यास्पृश्यता

मला केवळ एका तासाकरिता जर भारताचा हुकूमशहा बनविले तर सर्वप्रथम मी दारूची सर्व दुकाने, त्यांच्या मालकांना कोणतीही नुकसानभरपाई न देता, बंद करावयास लावीन; तसेच कारखान्यांच्या मालकांकरवी सक्तीने मजुरांच्या निर्वाहाकरिता माणसास शोभेल अशा परिस्थितीची – उदाहरणार्थ, उत्साह आणि आरोग्यवर्धक खाद्यपदार्थ आणि पेये मिळू शकतील अशी उपहारगृहे, मनोरंजनगृहे आदींची – निर्मिती करवून घेईन.

नशाबंदी जबरदस्तीने करण्यात येऊ नये, दारू पिऊ इच्छिणारांना त्याची मुभा मिळायलाच हवी, या वरपांगी तर्कशुद्ध वाटणाऱ्या विचारसरणीच्या भुलावणीला आम्ही बळी पडू नये. प्रजेकरिता व्यसनांची सोय करून देण्याची सरकारवर मुळीच जबाबदारी नाही. कुंटणखाने चालविण्यास आम्ही संमती देत नसतो. चोरांनाही चौर्यकर्माकरिता सवलती देण्यात येत नाहीत. मी तर नशाबाजीला चोरी आणि व्यभिचारापेक्षाही अधिक निंद्य मानतो; कारण दारूच्या पोटीच चोरी आणि व्यभिचार यांचा अनेकदा जन्म होतो ना?

दारूची चट हा एक रोगच आहे. शक्य झाले तर दारू सोडण्याची मनापासून इच्छा असणारे अनेक माझ्या माहितीचे आहेत. दारू आपल्यापुढे आणू नका, असे सांगून नंतर असहायतेने चोरून दारू पिणारेही मी पाहिले आहेत. पण यावरून त्यांच्या समोरून दारूचे प्याले हटविणे चूक ठरते असे मला वाटत नाही. स्वत:च्या रोगाशी स्वेच्छेने लढत देण्याबाबत आम्ही रोग्यांशी (नशाबाजांशी) सहकार्य केले पाहिजे.

दारूच्या सवयीमुळे माणसाच्या आत्म्याचा नाश होतो. तो हळूहळू पशू बनून त्याला पत्नी, आई, बहीण यांच्यातील फरक समजेनासा होतो. मलेरियादी आजारांपासून होणाऱ्या नुकसानापेक्षा दारूच्या सवयीमुळे होणारे नुकसान असंख्य पटींनी जास्त आहे; कारण रोगामुळे फक्त शरीराचे नुकसान होते, पण दारूमुळे शरीर आणि आत्मा दोघांचाही नाश होतो.

भारत गरीब राहिलेला चालेल, पण आमच्यातील लाखो लोकांनी नशेबाज झालेले मला आवडणार नाही. अबकारी उत्पन्नातून शिक्षण चालविण्यापेक्षा दारूबंदी-पायी शिक्षण बंद करावे लागले तरी चालेल. नशाबंदीकरता ही किंमत मला परवडेल.

दारूची सवय जडलेले राष्ट्र विनाशाच्या तोंडाशी उभे आहे असे समजावे. अनेक साम्राज्ये दारूपायी धुळीस मिळाल्याची उदाहरणे जगाच्या इतिहासात उपलब्ध आहेत.

श्रीकृष्णाचा यादववंश यामुळेच नष्ट झाला. रोमन साम्राज्याच्या ह्रासाच्या कारणांपैकी दारू हे प्रमुख कारण होते, यात शंका नाही.

दारूइतकीच विडी-सिगरेटची मला घृणा आहे. विडी-सिगरेटला मी व्यसनच मानतो. त्यामुळे माणसाची विवेकबुद्धी जड बनते. दारूपेक्षाही त्यांचे परिणाम वाईट होतात, कारण ते चोरपावलांनी येतात. एकदा सवय लागली की ती सुटता सुटत नाही. ती सवय खर्चिकही आहे. तोंडाला घाण येते. दातांचा रंग बिघडतो, आणि कधी कधी् कर्करोगासारखा भयंकर रोगही जडतो. एकंदरीत ती सवय वाईटच. दुर्दैवाने या सवयीला भलतीच प्रतिष्ठा प्राप्त आहे.

भारतात तंबाखूचे त्रिविध उपयोग आहेत – पिणे, खाणे आणि वास घेणे. ज्याला आरोग्य हवे तो निग्रहाने या व्यसनांच्या गुलामीतून सुटू शकेल. पुष्कळांना यांपैकी एक, दोन अथवा तिन्ही सवयी असतात. म्हणून त्यांना किळस येत नाही. पण थोडा विचार केला तर दिवसभर धूर सोडणे, तंबाखूचा बोकणा भरून ठेवणे अथवा नाकात नस कोंबत राहण्यास मोठेसे भूषण नाही हे पटेल. ही तिन्ही व्यसने एकंदरीत घाणेरडीच आहेत.

अस्पृश्यतेचा कलंक

अस्पृश्यता हा हिंदुधर्मावरील मोठा कलंक आहे. ती स्मरणातीत कालापासून चालत आली आहे हे मला मान्य नाही. आम्ही जेव्हा अध:पतनाची परिसीमा गाठली असेल त्या काळी तिचा उदय झाला असावा असा माझा समज आहे. हा एक भयंकर अभिशाप आहे. आणि तो जोवर कायम राहील तोवर या भूमीत आम्हाला जे जे सहन करावे लागत आहे ते आम्ही आमच्या अपराधाबद्दल दंड म्हणून मानणेच योग्य होईल.

आज ज्या स्वरूपात अस्पृश्यता हिंदुधर्मात विद्यमान आहे त्या स्वरूपात ती ईश्वर आणि मानवाविरुद्ध होणारा घोर अपराध असून हे विष हिंदुधर्माला हळूहळू निर्जीव करीत आहे. शास्त्रांचा संकलित विचार केल्यास त्यांत अस्पृश्यतेचे समर्थन आढळणार नाही असे मला वाटते. शास्त्रांत एका हितकारी अस्पृश्यतेचा जरूर उल्लेख आहे, आणि तसा तो सर्व धर्मांतून आढळतो. ती अस्पृश्यता स्वच्छतेच्या नियमांच्या पालनाचा भाग आहे. ती नेहमीच राहणार. पण भारतात आज जी अस्पृश्यता आहे ती भयंकर आहे आणि तिची प्रांतोप्रांती, किंबहुना जिल्हानिहाय अनेक रूपे आहेत. तिने स्पृश्यास्पृश्य दोघांचे अध:पतन केले आहे. कोट्यवधींचा विकास अडवून धरला आहे. त्यांना जीवनातील साध्या सोयीही उपलब्ध नाहीत. अतएव या अनिष्टाचे

जितक्या लवकर उच्चाटन होईल तेवढेच ते हिंदुधर्म, भारत आणि कदाचित् अखिल मानवजातीलाही उपकारक ठरेल.

भारतातील एक पंचमांश जनतेला जर आम्ही कायमच्या गुलामीत आणि संस्कृतीच्या लाभांपासून वंचित ठेवण्याचा हट्ट धरू तर आमच्या स्वराज्याला काहीच अर्थ उरणार नाही. या स्वराज्याच्या आत्मशुद्धिप्रधान आंदोलनात आम्ही भगवंताच्या सहाय्याची अपेक्षा करतो, पण त्याच्याच सुपात्र एक पंचमांश लेकरांना मानवतेच्या हक्कांपासून वंचितही ठेवतो. आमच्यातच दया नसेल तर दुसऱ्यांच्या निष्ठुरपणापासून (इंग्रजांच्या गुलामीपासून) आमचे रक्षण कर अशी दयेची याचना ईश्वराजवळ करण्याचा आम्हाला कसा हक्क पोचेल?

प्राचीन आहे, सबब अस्पृश्यतेला असू द्या, असे म्हणता येणार नाही. एखाद्या काळी एखाद्या अपराधाबद्दल शिक्षा म्हणून कोणावर अस्पृश्यता लादण्यात आली असेल असे म्हटले तरी अजूनही त्यांच्या वंशजांना सदर शिक्षा भोगावयास लावण्याचे काहीही कारण नाही. खुद्द अस्पृश्यांत पुन: अस्पृश्यतेचे पापुद्रे आहेत. त्यावरून एवढेच सिद्ध होते की एखादी वाईट प्रथा सुरू झाली म्हणजे तिला पायबंद घालणे दुरापास्त असते. यामुळे तर सुसंस्कृत हिंदू समाजाने हा अभिशाप शक्य तेवढ्या ताबडतोब झटकून मोकळे झाले पाहिजे. जनावराला मारणे आणि मांस, रक्त, हाडे, मल यांच्या संपर्कामुळे ते जर अस्पृश्य ठरत असतील तर प्रत्येक नर्स, डॉक्टर यांनाही अस्पृश्य मानणे भाग पडेल. एवढेच कशाला ! मांसाहार करणाऱ्या वा जनावरांचा बळी देणाऱ्या ख्रिस्ती, मुसलमान आणि खुद्द हिंदूंतील तथाकथित उच्चवर्णीयांनाही अस्पृश्य मानावे लागेल. कसाईखाने, दारूची दुकाने, वेश्यालये ही जशी गावाबाहेर असतात किंवा असावीत, तद्वत् अस्पृश्यांनाही वेगळे ठेवावे असे वाटणे हा केवळ एक पूर्वापार चालत आलेला दृढमूल गैरसमजाचा परिणाम होय. कसाईखाने, ताडीखाने वेगळे असतात आणि असावयास हवेत; पण त्यांच्याशी संबंध असणारांना इतर समाजाहून वेगळे (वाळीत टाकल्यागत) ठेवण्यात येत नाही.

आम्ही आंतरिक प्रलोभने आणि मोह यांनी व्याप्त आहोत आणि आमच्या मनात सतत पापपूर्ण विचार सुरू असतात. आमच्या कसोटीचा हा काळ आहे. अशा स्थितीत अभिमानाला बळी पडून ज्यांना आम्ही विनाकारण हलक्या दर्जाचे मानतो, त्यांच्याबाबत स्पृश्यास्पृश्यतेच्या दृष्टीने आम्ही अतिरेकी बनू नये. आम्ही काय खातो-पितो अथवा कोणाला स्पर्श करतो अथवा करीत नाही, यावरून ईश्वराच्या दरबारी आमचे भलेवाईटपण ठरणार नाही. ते फक्त आम्ही कोणाची किती आणि कशी सेवा

केली यावरून ठरणार आहे. एकाही दीनदुःखी व्यक्तीची आम्ही सेवा केली असेल तर अवश्यमेव आमच्यावर ईश्वराची कृपा होईल. आमच्यातील कपट, ढोंग आणि त्याहूनही मोठी पापे झाकण्याकरिता खानपानादी वरपांगी नियमांचा उपयोग आम्ही करू शकत नाही. त्यांच्या स्पर्शामुळे आमच्या आध्यात्मिक उन्नतीत बाधा तर येणार नाही ना, या भयाने कोणाही पतित अथवा घाणेरडेपणाने राहणाऱ्या बंधु-भगिनींच्या सेवेचा अव्हेर करू शकत नाही.

ज्या समाजाने भंगीकाम वेगळे मानले त्या समाजात फार मोठा दोष दृढमूल झाला असला पाहिजे असे मला कैक वर्षांपासून वाटत आले आहे. या आरोग्यास अनिवार्य कामाला प्रथम कोणी नीचतम ठरविले याचा इतिहास आज उपलब्ध नाही. पण कोणीही असो, त्याने आमच्यावर उपकार केला असे म्हणता येणार नाही. आम्ही सर्व भंगीच आहोत, हा विचार अगदी बालपणापासून मनावर ठसविला गेला पाहिजे, आणि त्याची रामबाण युक्ती ही की आम्ही श्रमजीवनास संडास-सफाईपासूनच सुरुवात करावी. जो हे जाणीवपूर्वक करील त्याला धर्माचा निराळा आणि खरा अर्थ समजू लागेल.

१६. वर्णाश्रम आणि जातिव्यवस्था

प्रत्येक व्यक्ती आपापले वैशिष्ट्य घेऊन जन्मास येते अशी माझी धारणा आहे. प्रत्येकाला मर्यादा असतात. त्याला त्या पार करून जाणे शक्य नसते. या सीमांच्या अवलोकन-अभ्यासातूनच वर्ण निर्माण झाले आहेत. त्यामुळे विशिष्ट प्रवृत्तीच्या व्यक्तींची विशिष्ट कार्यक्षेत्रे ठरतात. असे केल्याने समाजातील घातक चढाओढ टळते. या वर्णव्यवस्थेत व्यक्तीच्या विशिष्ट सीमा मानल्या जावोत, पण त्यात उच्चनीच-भावाला मुळीच स्थान नसते. या व्यवस्थेत प्रत्येकाला त्याचे परिश्रम-फल मिळावे, आणि तो स्वतःच्या शेजाऱ्याला भारभूत होऊ नये अशी योजना असते. या उच्च नियमाचे आज अधःपतन झाले आहे, एवढेच नव्हे तर तो निंदनीय बनला आहे. पण माझी धारणा आहे की सदरहू नियमाचे रहस्य चांगले समजून घेऊनच आम्हाला आदर्श समाज-व्यवस्थेचा विकास करता येईल.

वर्णाश्रम-धर्म माणसाला त्याचे खरे ध्येय सांगतो. दररोज अधिकाधिक पैसा गोळा करणे आणि शरीराचे चोज पुरविणारी साधने हुडकून काढणे याकरिता माणूस निर्माण झालेला नाही. आपली शक्ती पणास लावून स्वतःच्या निर्मात्या ईश्वराला ओळखण्याकरिता त्याचा जन्म आहे. अतएव वर्णाश्रम-धर्म म्हणतो, ''शरीर-निर्वाहासाठी आपल्या पूर्वजांचा धंदाच पुढे चालवा.'' वर्णाश्रम-धर्म फक्त एवढेच सांगतो.

मी अनेक वेळा म्हटले आहे की आज ज्या अर्थाने जातपात मानतात त्या अर्थी मी त्या मानीत नाही. समाजात असणारी ही निरर्थक बाब आमच्या प्रगतीच्या मार्गात धोंड होऊन बसली आहे. याचप्रमाणे माणसामाणसांतील उच्चनीच-भेदही मी मानीत नाही. आम्ही सर्व बरोबरीचे आहोत. पण ही समानता शारीरिक नव्हे, आत्म्याची समानता आहे. म्हणजे हा प्रश्न मनोरचनेचा आहे. या बाबतीत आग्रहपूर्वक बोलावे लागण्याचे कारण असे की आज जगात उच्चनीच-भेद फारच बोकाळले आहेत. या बाह्यात्कारी दिसणाऱ्या उच्चनीचत्वातून आम्हाला समानता निर्माण करावयाची आहे. जो स्वतःला इतरांपेक्षा श्रेष्ठ मानतो, तो माणूस व ईश्वर यांच्याविरुद्ध पाप करतो. या दृष्टीने जातपातीत ज्या प्रमाणात श्रेष्ठत्वाची भावना ग्राह्य मानली जात असेल त्या प्रमाणात ती वाईट ठरते.

वर्ण मात्र मी अवश्य मानतो. पिढ्यान् पिढ्या चालणाऱ्या धंद्यामुळे ते निर्माण झाले आहेत. विद्यादान, दुःखितांचे रक्षण, शेती व व्यापार आणि शारीरिक सेवा ही

मानवी समाजाला अवश्य असणारी जी अंगे आहेत त्यांतून हे चार वर्ण निघाले. हे अखिल मानवजातीकरिता सारखेच (आवश्यक) आहेत. पण हिंदुधर्मात त्यांना जीवनधर्म मानले जाऊन त्यांच्या भरवशावर त्याने समाजातील परस्परसंबंधांचे आणि आचारविचारांचे नियमनही केले आहे. गुरुत्वाकर्षणाच्या नियमाचे आम्हाला भान असो-नसो, परिणाम सर्वांवर होतोच. पण वैज्ञानिकांनी त्यातून जगाला चमत्कृतिजनक वाटणारी प्रमेये आमच्यासमोर ठेवली. अगदी याचप्रमाणे हिंदुधर्माने वर्णव्यवस्थेचा शोध लावून व तिचा प्रयोग करून जगाला थक्क करून सोडणारे निष्कर्ष काढले. हिंदूंना अज्ञानाने घेरल्यानंतर मात्र वर्णव्यवस्थेचा दुरुपयोग सुरू झाला, अगणित जाती बनल्या आणि जातपात आणि रोटी-बेटीव्यवहाराबाबत नकोत ती हानिकारक बंधने निर्माण झाली. वर्णव्यवस्थेचा या बंधनांशी सुतराम् संबंध नाही. भिन्न वर्णांतले लोक आपसात रोटी-बेटीव्यवहार करू शकतात. चारित्र्य आणि आरोग्याकरिता काही बंधने आवश्यकही असतील, पण एखाद्या ब्राह्मणाने शूद्र कन्येशी वा ब्राह्मणकन्येने शूद्राशी विवाह केल्याने वर्णव्यवस्था उलथून पडते असे मात्र नव्हे.

वर्णाश्रम व्यवस्थेत आंतरजातीय खानपानाचा अथवा विवाहाचा कोठेही निषेध आढळत नाही. पण या बाबतीत जुलूमजबरदस्तीही होऊ शकत नाही हे स्पष्ट आहे. खानपान आणि विवाह यांबाबत व्यक्तिस्वातंत्र्य असलेच पाहिजे.

अस्पृश्यतेतून निघालेल्या वाईटाचा नाश करण्याकरिता वर्णव्यवस्थाच नष्ट करणे म्हणजे एखादा अवयव रोगग्रस्त झाल्यास शरीरच नष्ट करणे अथवा पिकातील तण उपटून काढण्याऐवजी संपूर्ण पीकच उपटून फेकण्यागत होईल. अस्पृश्यता आम्हाला अवश्य नाहीशी करायची आहे; आणि वर्णव्यवस्था सावरून ठेवायची असेल तर अस्पृश्यता शीघ्रातिशीघ्र नाहीशी करायलाच हवी. अस्पृश्यता ही जातिभेदातून निर्माण झाली नसून जी उच्चनीच-भावना आतल्याआत हिंदुधर्माला पोखरीत आहे त्या उच्चनीच-भावनेतून प्रकटली आहे. सबब आमचा हल्ला खरे म्हणजे या भावनेवर आहे. अस्पृश्यता नष्ट होताच आमची जातिव्यवस्था शुद्ध होऊन जाईल, आणि ती मूलभूत हितकारी वर्णव्यवस्थेशी एकरूप होऊन जाईल. चारी वर्ण एकमेकांचे पूरक ठरतील. कोणी मोठा राहणार नाही; कोणी लहान राहणार नाही. आपल्या परिपोषाच्या दृष्टीने हिंदुधर्माला सर्व वर्ण सारखेच महत्त्वाचे ठरतील.

१७. स्त्री-शक्ती

अहिंसेच्या पायावर उभारलेल्या समाजरचनेत पुरुषाला स्वतःच्या भवितव्या-बाबत जे अधिकार राहतील तेच स्त्रियांनाही असतील. पण अहिंसक समाजातील प्रत्येक अधिकार कोणत्या तरी कर्तव्याशी निगडित असतो. म्हणून स्पष्ट आहे की समाजातील आचारविचाराचे नियम स्त्री-पुरुषांनी एकत्र विचारविनिमय करून ठरवावे लागतील. या नियमांचे पालन बाहेरील कोणत्या तरी सत्तेच्या दडपणामुळे होऊ शकणार नाही. स्त्रियांबाबत वागताना पुरुषांनी या सत्याकडे पुरेसे लक्ष दिलेले नाही. स्त्रियांना मित्र मानण्याऐवजी त्यांना दासी मानले आहे. याऐवजी त्यांना जीवनात पुरुषांच्या बरोबरीने सहभागी होता येईल असे शिक्षण द्यावे लागेल.

एक वेळ निश्चय केला म्हणजे हा वृत्तीतील आवश्यक फेरबदल घडवून आणणे सोपे आहे. याकरिता आम्ही स्वतःच्या घरापासूनच सुरुवात करावी. एखादी बाहुली अगर उपभोगसाधन मानण्याऐवजी नवऱ्यांनी आपापल्या पत्नीला सेवाकार्यातील सन्मान्य सहकारी म्हणून वागविण्यास सुरुवात करावी. याकरिता ज्यांना शाळा-कॉलेजांतील शिक्षण मिळालेले नाही अशा स्त्रियांनी नवऱ्यापाशी शक्य ते शिक्षण घ्यावे. आया आणि मुलींबाबतही या तत्त्वाचा अवलंब करावा.

स्त्रियांच्या असहायतेचे हे चित्रण थोडेसे एकांगी असल्याची मला जाणीव आहे. खेड्यांतील स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने (जीवनाशी) टक्कर घेतात हे मला माहीत आहे. क्वचित् वरचढ ठरून पुरुषांवर हुकुमतही गाजवतात. पण बाहेरून पाहणारा असेच म्हणेल की एकंदरीत स्त्रीविषयक आमच्या आज ज्या रूढी आहेत त्यांमुळे समाजात आज त्यांचे जे स्थान आहे त्यात दोष आहेत, व ते मुळापासून सुधारणे आवश्यक आहे. स्त्रियांकरिता ज्या रूढी व नियम निव्वळ पुरुषांनी बनविले आहेत (त्यांत स्त्रियांच्या मतांची व भावनांची मुळीच दखल न घेतल्यामुळे) त्यांनी स्त्रियांवर सतत जुलूमच झालेला आहे.

कायदे अधिकतर पुरुषांचेच बनविलेले आहेत. जी जबाबदारी त्यांनी स्वतःवर घेतली ती भागविताना त्यांनी विवेक व न्याय यांचे पालन केले नाही. आमच्या शास्त्रांनी स्त्रीजातीवर जी अपरिहार्य मानून जन्मजात दूषणे लादली आहेत त्यांना बाजूला सारल्याशिवाय स्त्री-जीवनात संजीवन निर्माण करण्याच्या आमच्या प्रयत्नांची सुरुवातच करता येणार नाही. हे कोणी आणि कसे करायचे? यात यश मिळवायचे तर आम्हाला सीता, द्रौपदी, दमयंती आदी स्त्रियांप्रमाणे पवित्र आणि निग्रही स्त्रिया

लागतील. जर अशा स्त्रिया निर्माण झाल्या तर त्यांना पुराणप्रसिद्ध पतिव्रतांप्रमाणेच पूज्यत्व प्राप्त होईल. असे झाल्यास स्त्रियांना अपमानजनक अशा वचनांची आम्हाला लाज वाटू लागेल. अशा क्रांत्या हिंदू धर्मात पूर्वी झाल्या आहेत व पुढेही होतील, आणि त्यामुळे हिंदुधर्म अधिक टिकाऊ बनेल.

स्त्री ही पुरुषाची साथी आहे आणि बौद्धिक योग्यतेत त्याच्यापेक्षा मुळीच कमी नाही. पुरुषांबरोबर स्त्रियांना प्रत्येक प्रवृत्तीच्या अंगोपांगात सक्रिय भाग घेण्याचा हक्क आहे. त्यांना स्वातंत्र्याचेही पुरुषांच्या बरोबरीचे हक्क आहेत. स्वतःच्या खास क्षेत्रात पुरुष जसा सर्वश्रेष्ठ ठरतो तशीच स्त्रीही तिच्या खास क्षेत्रात सर्वश्रेष्ठच ठरावी. अशी परिस्थिती निर्माण होण्याकरिता स्त्रियांचे पुरुषांच्या बरोबरीने शिक्षण होण्याची (मुळीच) आवश्यकता नाही. ही समाजाची सहज स्थिती असावयास हवी. निव्वळ रूढीमुळे महामूर्ख पुरुषसुद्धा स्त्रियांपेक्षा श्रेष्ठ मानला जातो. आमच्या अनेक चळवळी स्त्री-वर्गाच्या मागासलेपणामुळे अडखळून बसतात. त्यामुळे आमच्या पदरात जेवढे यश पडायला पाहिजे तेवढे पडत नाही. एखादा कंजूष व्यापारी पुरेसे भांडवल न घातल्यामुळे व्यापारात नुकसान करून बसतो, तशागत आमची स्थिती आहे.

स्त्रियांच्या अधिकाराबाबत मी कोणतीही तडजोड करण्यास तयार नाही. पुरुषांवर घालण्यात न आलेला कोणताही प्रतिबंध त्यांच्यावर लादता येणार नाही. मुले आणि मुली यांच्यात कोणताही भेदभाव असू नये.

पण या समानतेचा असा मात्र अर्थ नव्हे की त्यांनी समान उद्योगधंदे करावे. शस्त्रधारण अथवा शिकारीबाबत स्त्रियांवर काही निर्बंध असू नये हे खरे, पण त्यापासून ती स्वाभाविकपणे विरतच राहील. स्त्री-पुरुष निसर्गतः एकमेकांचे पूरक आहेत. त्यांच्या शरीररचनेतील भेदामुळे सहजच त्यांच्या विभिन्न क्षेत्रांची रूपरेषा आणि मर्यादा ठरते.

त्यांचा दर्जा समान आहे, पण एक नाही. ते एकमेकांचे पूरक आणि सहकारी आहेत. इतके की ते एकमेकांशिवाय जगू शकत नाहीत. म्हणूनच हेही स्पष्ट आहे की त्यांपैकी कोणीही स्थानभ्रष्ट झाला की दोघेही गडगडणारच. स्त्री-शिक्षणाचा तपशील ठरविणारांनी हे लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे. घराबाहेरची कामे पुरुषांची आहेत. घरातील कामांत स्त्री प्रमुख आहे. म्हणून घराची व्यवस्था, शिशुसंगोपन, त्यांचे शिक्षण इत्यादींचे स्त्रियांना विशेष ज्ञान असावे. यामागे एखाद्याला एखादा ज्ञानमार्ग बंद ठेवण्याचा अर्थातच हेतू नाही. पण वरील गोष्टीचा विचार न करता शिक्षणक्रम ठरविला

गेला तर स्त्री-पुरुष दोघांनाही आपापल्या क्षेत्रात पूर्णत्वाची प्राप्ती करता येणार नाही.

स्त्रियांना योग्य शिक्षण द्यावे या मताचा मी आहे. पण जगाच्या प्रगतीला जर त्यांचे सहाय्य व्हायचे असेल तर ते पुरुषांची नक्कल करून व त्यांच्याशी स्पर्धा करून होणार नाही. त्यांनी स्पर्धा केली तर पुरुषांची नक्कल करून त्या स्वतःची संभाव्य सर्वोच्च उंची गाठू शकणार नाहीत.

हुंड्याची चाल नष्टच व्हावयास हवी. लग्नाला सौद्याचे स्वरूप येऊ नये. या प्रथेचा जातिप्रथेशी निकटचा संबंध आहे. मुलांमुलींच्या निवडीचे क्षेत्र जोवर जातींनी मर्यादित राहील तोवर कितीही ओरड केली तरी ही प्रथा टिकणारच. ती बंद व्हायची तर मुलांमुलींना आणि त्यांच्या मातापित्यांना जातिबंधने झुगारून द्यावी लागतील. याचा अर्थ एवढाच की ज्यामुळे आमच्यातील तरुण-तरुणींची मनोरचना आमूलाग्र बदलेल असे योग्य शिक्षण त्यांना देण्याची गरज आहे.

हुंड्याबद्दल आग्रह धरणारा तरुण स्वतःच्या शिक्षणाला बट्टा लावतो. तो देशालाही कलंकित करून स्त्रीजातीचा अपमानही करतो. आज देशात अनेक युवक-आंदालने सुरू आहेत. त्यांनी असे प्रश्न हाताळावे अशी माझी इच्छा आहे. अशा संघटनांनी काही भरीव सुधारणेचे काम हाती घेऊन स्वतःपासूनच त्याची सुरुवात करावी. हुंड्याच्या या अधःपतनकारी प्रथेविरुद्ध जोरदार लोकमत तयार करण्याची गरज आहे. जे तरुण या पापमय पैशाचा स्वीकार करतील त्यांच्यावर समाजाने बहिष्कार टाकावा. मुलींच्या माता-पित्यांनी इंग्रजी पदव्यांचा मोह सोडावा आणि आपल्या मुलींना सन्मानाने वागविणाऱ्या जावयांच्या शोधात आवश्यक तर जातीय व प्रांतीय मर्यादा तोडण्याचीही तयारी ठेवावी.

१८. मजुरांनी काय करावे?

भारतासमोर आज दोन मार्ग खुले आहेत. 'बळी तो कान पिळी' आणि 'सत्यमेव जयते'; यांपैकी एकाची निवड त्याला करावयाची आहे.

सत्याचा कधीच पराजय होत नसतो. सबल आणि निर्बल दोघांनाही समान न्याय प्राप्त करून घेण्याचा हक्क आहे. वरील निवड सर्वप्रथम मजुरांनी करावयाची आहे. हिंसेच्या मार्गाने शक्य असले तरी तसे करून वेतनवाढ मिळविणे योग्य होईल काय, असा प्रश्न आहे. मजुरांच्या मागण्या कितीही न्याय्य असल्या तरी त्यांनी हिंसेचा आश्रय घेणे योग्य होणार नाही. अधिकारप्राप्तीकरिता हिंसेचा उपयोग सोपा वाटला तरी परिणामी तो मार्ग काटेरीच आढळून येईल. तलवारीच्या सहाय्याने जगणारे तलवारीनेच मरतात. पोहणारा बहुधा बुडूनच मरतो. युरोपकडे पहा. कोणीही सुखा-समाधानात आढळत नाही. भांडवलशहा आणि मजूर यांचा परस्परांवर विश्वास नाही. दोघेही शक्तिमान आहेत. पण शक्ती सांडातही असते. सांडसुद्धा प्राण जाईतो टक्कर देतात. कसलीही गती म्हणजे प्रगती नव्हे. युरोपीयांची प्रगती होत आहे असे मानण्यालायक पुरावा उपलब्ध नाही. त्यांची संपत्ती हे त्यांच्यातील कोणत्याही नैतिक अथवा आध्यात्मिक मूल्याचे लक्षण नाही. दुर्योधनाजवळही अलोट संपत्ती होती, पण विदुर आणि सुदामा यांच्या तुलनेत तो दरिद्रीच होता. आज जग विदुर आणि सुदामा यांची पूजा करते; दुर्योधनाला आम्ही ज्या अनिष्टांना आग्रहपूर्वक टाळावयास हवे अशा अवगुण-समुच्चयाचा प्रतिनिधी म्हणून ओळखतो.

आज भांडवलदार आणि मजूर यांच्या संघर्षात भांडवलदारांची जास्त चूक आहे असे ठोकळ मानाने म्हणता येईल. पण मजुरांना त्यांच्या शक्तीची जाणीव झाल्यास (आणि हिंसेचा वापर करण्याचे ठरल्यास) ते कितीतरी जास्त अत्याचार करू शकतील.

आमच्यासमोरील प्रश्न असा : मजुरांना आत्मशक्तीचा प्रत्यय आल्यानंतर त्यांनी कोणत्या मार्गाचा अवलंब करावा? त्यांनी संख्याबळाचा अर्थात् पशुबळाचा वापर करण्याचे ठरविल्यास ते (परिणामी) त्यांनाच घातक ठरेल. तशाने देशाच्या उद्योगधंद्यांची हानी होईल. उलट त्यांनी पावलोपावली न्यायपूर्ण भूमिका जर कायम ठेवली व त्यासाठी कष्ट सहन केले तर त्यांना यश तर नक्की मिळेलच, संभवत: मालकांचे हृदयपरिवर्तन करण्यातही यश मिळेल. उद्योगधंद्यांचा विकास होईल आणि सरतेशेवटी भांडवलदार आणि मजूर यांत एक-कुटुंबीयत्वाची भावना निर्माण होईल.

मजुरांच्या स्थितीत संतोषजनक सुधारणा घडवून आणण्यासाठी खालील गोष्टी

आवश्यक आहेत :

१. विश्रांतीला पुरेसा वाव राहील एवढेच तास त्यांच्याकडून काम घेण्यात यावे.

२. त्यांच्या शिक्षणाची सोय असावी.

३. त्यांच्या मुलाबाळांच्या दूध (अन्न), वस्त्रादी आणि शिक्षणाची सोय असावी.

४. त्यांना स्वच्छ घरे मिळावी.

५. म्हातारपणी स्वस्थपणे जगण्यास पुरेसे शिल्लक पडेल असे त्यांचे वेतन असावे.

आज तर यांपैकी एकही अट पुरी झालेली दिसत नाही. याबाबतची जबाबदारी दोघांचीही आहे. मालकांना फक्त काम हवे असते. मजुरांचे काय होते याची त्यांना पर्वा नसते. कमीत कमी मोबदला देऊन जास्तीत जास्त काम कसे काढून घेता येईल हे एकमात्र त्यांचे लक्ष्य असते. याउलट कमीत कमी काम करावे लागून अधिकात अधिक पैसा कसा मिळविता येईल या रोखाने मजुरांचे यच्चयावत् डावपेच असतात. परिणामी मजुरांना वेतनवाढ मिळते, पण उत्पादनात फरक पडत नाही. दोघांचे परस्पर-संबंध बिघडतात, आणि मजूर आपल्या वेतनवाढीचा सदुपयोग करीत नाहीत (ते निराळेच).

यादरम्यान एक तिसरा पक्ष मजुरांचा मित्र बनून पुढे आला आहे. अशा पक्षाची गरज आहे हे नाकबूल करता येत नाही, पण हा पक्ष पूर्णत: नि:स्वार्थ राहिला तरच त्याला ही मजूर-मैत्री न्याय्य रीतीने निभावता येईल.

मजुरांचा उपयोग बुद्धिबळाच्या खेळातील प्याद्यांप्रमाणे करण्याचा प्रयत्न होऊ शकेल, अशी आज वेळ आली आहे. राजकारणाच्या क्षेत्रातील लोकांनी याचा विचार करावयास हवा. ते स्वहित साधणार की मजूर आणि राष्ट्र यांची (प्रामाणिक) सेवा करणार? मजुरांना (खऱ्या) मित्रांची निकडीची गरज आहे. नेतृत्वाभावी ते काहीच करू शकणार नाहीत. त्यांना कोणत्या प्रकारचे नेतृत्व प्राप्त होते पहायचे. त्यावरच मजुरांना प्राप्त होणारी भावी परिस्थिती अवलंबून आहे.

अन्य देशातील मजुरांप्रमाणे भारतातील मजूरही सर्वस्वी आपल्या नेत्यांच्या आणि मार्गदर्शकांच्या अधीन आहेत. हे मार्गदर्शक नेहमीच सिद्धांत पाळणारे नसतात, आणि असलेच तर पुरेशा बुद्धीचा अभाव त्यांच्यात असतो. मजुरांत असंतोष आहे आणि त्याला यथार्थ कारणे आहेत हे खरे. त्यांच्या भरवशावरच मालक गब्बर बनत आहे असे जे त्यांना शिकविले जाते त्यातही चूक नाही. मजुरांवर राजकारणाचाही प्रभाव पडत आहे. आणि राजकारणाकरिता संपाचे साधन प्रभावी ठरू शकते असे

मानणारे मजूर-पुढारीही थोडेथोडके नाहीत.

माझ्या मते राजकारणाकरिता मजुरांचे संप घडवून आणणे फार चुकीचे आहे. राजनैतिक उद्देश त्यांच्यामुळे साध्य होतात हे मला नाकबूल नाही. पण ते अहिंसेच्या चौकटीत बसत नाहीत. मजुरांना राजकारण पूर्णपणे समजू लागून सर्वांच्या कल्याणा-करिता झटण्याची इच्छा आणि पात्रता त्यांच्यात निर्माण होण्यापूर्वी राजकारणाकरिता त्यांचा उपयोग करणे धोक्याचे आहे. ही ताबडतोब होणारी गोष्ट नाही. देह आणि आत्म्याच्या गरजांची पूर्ती करून सभ्य आणि संस्कारी जीवन जगणे जोवर त्यांना साधत नाही तोवर अशी आशा करता येणार नाही. आपली योग्यता आणि कार्यक्षमता वाढवून अंशतः मालकाचा दर्जा मिळविणे हा मजुरांच्या विकासाचा खरा मार्ग आहे. सध्या संप करायचेच तर ते फक्त मजुरांची स्थिती सुधारण्याच्या एकमात्र हेतूनेच व्हावे. आणि जेव्हा त्यांच्यात देशभक्तीचा उदय होईल तेव्हा ते तयार करीत असलेल्या मालाच्या योग्य किंमती ठरविण्याच्या उद्देशाने संपाचा अवलंब करणेही योग्य होईल.

पुढील अटींचे पालन केल्यास संप अयशस्वी होऊ नयेत –

१. संपाकरिता कारण न्याय्य हवे.

२. एकमताने संप ठरलेला असावा.

३. संपात भाग न घेणाराविरुद्ध हिंसाचार करता कामा नये.

४. मजूरसंघाच्या कोशातून पैसे न घेता संपाच्या काळात स्वतःचे पालनपोषण करता येईल एवढी क्षमता संप करणारांत असावी. याकरिता त्यांना तात्पुरता दुसरा उत्पादक व्यवसाय करावा लागेल.

५. पुरेसे ऐवजी मजूर जर उपलब्ध असतील तर संप व्यर्थ ठरेल. अशा स्थितीतही जर अन्यायाचा विरोध आवश्यकच असेल तर राजीनामा देणे हा एकमेव मार्ग आहे.

वरील अटी पूर्ण न करणारे संप यशस्वी झाले आहेत, पण त्यावरून एवढेच सिद्ध होते की मालक दुर्बल ठरले आणि त्यांना त्यांच्या अपराधित्वाची जाणीव होती.

भरीव कारणाशिवाय संप होऊच नये, हे फार स्पष्ट आहे.अन्याय्य संप यशस्वीही होऊ नयेत व जनतेने त्यांना पाठिंबा पण देऊ नये. निःपक्षपाती आणि समाजातील आदरपात्र लोक जर एखाद्या संपाचे समर्थन करणार नाहीत तर तो न्याय्य आहे की नाही हे लोकांना ओळखताच येणार नाही. स्वतः संप करणारांना या बाबतीत निर्णयाचा हक्क असू शकणार नाही. अतएव निर्णय दोन्ही पक्षांना मान्य असलेल्या पंचांनी किंवा

कोर्टांनीच करावयास हवा.

अशा रीतीने काम केल्यास सामान्यतः संपाचा प्रश्न जनतेसमोर मांडण्याचा प्रसंगच येत नाही. हे खरे की काही उद्दाम मालक पंच आणि कोर्टे यांचेही निकाल धाब्यावर बसवितात, किंवा मजूरही बळजबरीने मालकांकडून जास्त मिळावे म्हणून ते निकाल अमान्य करतात. अशा स्थितीतच संपाचा प्रश्न चव्हाट्यावर येतो.

ज्या संपांचा उद्देश फक्त मजुरांची स्थिती सुधारणे एवढाच असतो त्यांत राजकीय उद्देशांचे मिश्रण करू नये. अशाने राजकीय प्रगती होणार नाही. बहुधा संप करणारांनाच त्याचे दुष्परिणाम भोगावे लागतात. अशामुळे सरकार थोडेफार पेचात येईल हे खरे, पण त्यामुळे राज्ययंत्र अडखळून मात्र पडणार नाही. न्याय मिळण्याचे इतर सर्व मार्ग खुंटल्यावरच अशा संपांचा अवलंब करता येईल.

अहिंसाप्रधान संघर्षात राजनैतिक संपांचे एक विशिष्ट स्थान आहे. वाटेल तेव्हा त्यांचा उपयोग करता येणार नाही. अशा संपात गुप्तता असू नये आणि त्यांत गुंडगिरी पूर्णपणे गैरहजर असावी. त्यामुळे कोठेही हिंसा होऊ नये.

संप, काम बंद करून बसून राहणे इत्यादी साधने प्रभावी आहेत, यात शंका नाही. पण त्यांचा दुरुपयोग करणे सोपे आहे. मजुरांनी शक्तिशाली बनून आपली यूनियन (संघटना) निर्माण करावी, आणि तिच्या संमतीशिवाय कधीच संप करू नये. संप करण्यापूर्वी मिलमालकांशी बोलून तडजोड करण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. त्यापूर्वी संपाचा धोका पत्करू नये. मालकांना पंच मान्य असतील तर पंच-निर्णयाचा अवश्य स्वीकार करावा. एकदा पंचांनी निर्णय दिला की मग तो पसंत असो-नसो, उभय पक्षांनी तो मान्य करावा.

मजुरांची जशी मालकांबाबत कर्तव्ये असतात तशीच मालकांचीही मजुरांबाबत असतात, पण माझा असा अनुभव आहे की मालकांच्या मानाने मजूरच स्वकर्तव्याचे पालन जास्त प्रमाणात करतात. म्हणूनच विचार करायचा की मालकांना मागण्या मान्य करावयास भाग पाडण्याच्या दिशेने मजूर किती मजल गाठू शकतात. वेतन पुरेसे नसेल अथवा राहण्याची सोय नसेल तर त्यांच्या प्राप्तीचा मार्ग शोधावा लागेल. मजुरांना कोणत्या सुखसोयी अपरिहार्य आहेत याचा निर्णय कोण करणार? उत्तम तर हे की मजुरांनीच आपले (न्याय्य) हक्क ओळखावे, योग्य तो इलाज (मार्ग) शोधावा आणि ते प्राप्त करून घ्यावेत. पण याकरिता मजुरांना थोडे पूर्वशिक्षण प्राप्त असावे लागेल.

मजुरांत पुरेसे संघटन आणि स्वार्थत्यागवृत्ती असेल तर हे अवश्य घडून येईल,

अशी माझी भावना आहे. मालक कितीही जुलमी असोत, माझी खात्री आहे की मजूर आणि त्यांचे मार्गदर्शक पुढारी यांना मजुरांना प्राप्त असणाऱ्या विशाल साधनसंपत्तीची अजून पुरेशी जाणीव नाही. या तोडीची साधनसंपत्ती भांडवलदारांना कधीच उपलब्ध असू शकणार नाही. श्रमाच्या सहाय्याशिवाय कोरडे भांडवल काहीच करू शकणार नाही, हे जर मजुरांना उमजेल तर त्यांना त्यांचे हक्काचे स्थान ताबडतोब मिळाल्याशिवाय राहणार नाही.

दुर्दैव असे की भांडवलाच्या मोहिनीने आम्ही मूढ बनलो आणि भांडवल सर्व काही करू शकेल असे मानू लागलो. 'नाही' हा एक फार जोरदार शब्द आहे. ज्या वेळी भांडवलदारांना मजुरांकडून 'होय' हवे असेल त्या वेळी जर मजुरांना 'नाही' म्हणण्याची इच्छा असेल, तर त्यांनी नि:संकोच 'नाही' चा नारा लावावा. यामुळे मजुरांच्या हे ताबडतोब लक्षात येईल की त्यांच्या इच्छेनुसार 'होय' अथवा 'नाही' म्हणण्याचे त्यांना पूर्ण स्वातंत्र्य आहे, आणि ते भांडवलदारांच्या अधीन नसून भांडवलदारांनाच त्यांना खूश राखण्याची गरज आहे. भांडवलदारांजवळ बंदुका, तोफा आणि विषारी वायू असले तरी वरील परिस्थिती बदलत नाही. मजूर आपल्या नकारावर टिकून राहिले तर त्यापुढे भांडवलदारांची सर्व शस्त्रास्त्रे लंगडी पडतील. मजुरांनी प्रत्याक्रमण न करता, गोळ्या आणि गॅसला बळी पडत असतानाही नकारावर अडून बसण्याची फक्त गरज आहे. मजुरांना बहुधा जे अपयश येते त्याचे मर्म असे आहे की त्यांचा कटाक्ष भांडवलवादाच्या शुद्धीकरणावर नसतो; त्यांना स्वत: भांडवलदार (त्यांच्या सर्व दोषांसह) बनण्याची इच्छा असते. म्हणून संघटित व शक्तिशाली भांडवलदारांना मजूरवर्गात भांडवलशहा बनण्याची इच्छा असणारे उमेदवार आढळून येतात आणि त्यांचा उपयोग ते इतर मजुरांना दाबण्याकरिता करून घेतात. आम्ही भांडवलाच्या मोहिनीने पछाडलो नसतो तर हे स्पष्ट सत्य आमच्या केव्हाच ध्यानात आले असते.

अधिकार आणि कर्तव्याची जोडी

हक्काकरिता भांडण्याच्या या अनिष्ट प्रथेने आम्हाला मोठ्या संकटात टाकले आहे. भांडवलदार आणि जमीनदार आपले हक्क सांगतात; मजूरही आपले हक्क सांगतात. राजेमहाराजे म्हणतात की त्यांचे शासनाधिकार ईश्वरदत्त आहेत. रयत म्हणते की राजांच्या या अधिकारांना विरोध करण्याचा तिलाही हक्क आहे.

सर्वच जर आपापल्या हक्कांचे तुणतुणे वाजवितील आणि स्वकर्तव्याकडे

कोणीच लक्ष देणार नाही तर सर्वत्र अंदाधुंदी माजेल.

याऐवजी प्रत्येक जण कर्तव्यपालनावर कटाक्ष ठेवील तर ताबडतोब सर्वत्र सुव्यवस्था आणि सुबत्तेचे साम्राज्य होईल. राजाचा ईश्वरदत्त शासनाधिकार अथवा त्याचे हुकूम पाळण्याबाबत प्रजेचे अपरिहार्य कर्तव्य या केवळ कल्पना आहेत. खरे असे आहे की राजा आणि प्रजा हा जन्मसिद्ध भेदभाव नष्टच व्हावयास हवा. त्यामुळे समाजाचे नुकसानच होते. पण हेही खरे की आजपावेतो दलित-पीडित राहिलेल्या प्रजेने जर उलट टोक गाठून फाजील मागण्यां(अधिकारां)बाबत हट्ट धरल्यास तेवढेच नुकसान होईल. त्या हट्टामुळे मोजके राजेमहाराजे अथवा जमीनदार यांच्या मानाने करोडो लोकांचेच अधिक अहित होईल. हे मूठभर राजेमहाराजे-जमीनदार नष्ट झाले तरी त्यामुळे सगळे सामाजिक जीवन सुव्यवस्थित अथवा सुखी होईल असे नाही. म्हणून हक्क आणि कर्तव्ये यांचा अन्योन्यसंबंध आम्ही समजून घेतलेला बरा. मी तर असे म्हणेन की जे हक्क शंभर टक्के कर्तव्यपालनाचा परिपाक म्हणून प्राप्त होत नाहीत ते अस्तित्वात असण्याच्या पात्रतेचे नाहीत. त्यांचा आम्ही (स्वेच्छेने) त्वरित त्याग करण्यातच कल्याण आहे. मुलाबाळांप्रती स्वकर्तव्याचे पालन न करणारे मातापिता त्यांच्यावर फक्त आपले हक्क गाजविण्याचा प्रयत्न करतील, तर ते त्यांच्या तिरस्कारास पात्र झाल्याशिवाय राहणार नाहीत. एखादा वाममार्गी नवरा स्वत:च्या पत्नीकडून कर्तव्यपालनाची अपेक्षा करील, तर तो धर्मवचनांचा फक्त एकतर्फी (आणि स्वत:च्या सोयीचा) अर्थ लावतो असे म्हणावे लागेल. पण जी मुले स्वकर्तव्यपालन करणाऱ्या मातापित्यांना अपमानित करतील ती कृतघ्न ठरतील व स्वत:चेच जास्त नुकसान करून घेतील. हा सर्वव्यापी नियम मालक-मजूर, जमीनदार-किसान, राजा-प्रजा, हिंदु-मुसलमान या सर्वांबाबत लागू करण्यात आला तर जीवनाच्या सर्व क्षेत्रांत आम्हाला गोडीगुलाबीचे संबंध प्रस्थापित करता येतील. असे केल्याने भारत अथवा इतरत्र जगात कोठेही सामाजिक जीवन अथवा व्यापारी क्षेत्रात कसल्याच प्रकारचा अडथळा निर्माण होणार नाही. प्रथम कर्तव्यपालन आणि त्याचा परिपाक म्हणून स्वभावत: निर्माण होणारे हक्क, हे सिद्धांत स्पष्ट होण्यातून माझ्या 'सत्याग्रहा'च्या कल्पनेचा उदय झाला आहे.

१९. शांतिसेना

काही दिवसांपूर्वी मी एक सेना उभारण्याचा प्रयत्न केला होता, जी दंगे – विशेषत: जातीय दंगे – थोपविण्याच्या प्रयत्नात प्राणांची बाजी लावण्यासही अनमान करणार नाही. ती पोलिसचीच नव्हे तर सेनेचीही जागा घेऊ शकेल. ही अवास्तव महत्त्वाकांक्षा असेल; हे अशक्यही ठरण्याचा संभव आहे. पण अहिंसेच्या पायावर जर आम्हाला यश मिळवायचे असेल तर परिस्थितीला शांतिमयतेने तोंड देण्याची आमची शक्ती वाढवावीच लागेल.

अशा सेनेच्या सैनिकात कोणते गुण असावे लागतील?

(१) त्या सर्व स्त्री-पुरुषांचा अहिंसेवर अनन्य-विश्वास असावा लागेल. ईश्वरावर अनन्य-विश्वास असणारांनाच हे शक्य होईल. अहिंसक व्यक्ती ईश्वराच्या कृपा-शक्तीशिवाय काहीही करू शकणार नाही. त्याशिवाय त्याला क्रोध, भय अथवा सूडभावनेचा त्याग करून मृत्यूला तोंड देता येणार नाही. सर्वांमध्ये ईश्वर असून ईश्वराच्या सान्निध्यात भयाचे कारण नाही, या श्रद्धेमुळेच असे साहस संभवेल. ईश्वर सर्वव्यापी आहे याचा अर्थच असा की ज्यांना आम्ही विरोधी अथवा गुंड मानतो त्यांच्या प्राणाचीही आम्हाला कदर असावी. मनुष्यात पशुसंचार होतो त्या वेळी त्याला कह्यात ठेवण्याचा हा एक मार्ग आहे.

(२) या शांतिसैनिकाच्या मनात सर्व प्रमुख धर्मांच्या बाबत समान आदरभाव असावा. देशातील भिन्न धर्मांतील सामान्य तत्त्वांची त्याला ओळखही असावी लागेल.

(३) सामान्यत: हे काम त्या त्या वस्तीतील स्थानिक लोकांचे आहे.

(४) हे एकट्याने अगर समूहानेसुद्धा करता येईल. सबब त्याकरिता सोबत्याची वाट पाहण्याची गरज नाही. तरी आपल्या वस्तीतील सहकाऱ्यांची छोटी सेना उभारण्याचा प्रयत्न व्हावा.

(५) या शांतिसैनिकांनी स्वत:च्या अथवा निवडलेल्या इतर क्षेत्रांत पुरेसे जवळचे ओळखीचे संबंध प्रस्थापित करावे, म्हणजे प्रत्यक्ष काम करतेवेळी कोणीतरी उपटसुंभ ढवळाढवळ करण्यास आला आहे असा उपद्रवी लोकांचा गैरसमज होणार नाही.

(६) शांतिसैनिक धवल चारित्र्याचे आणि ज्यांच्या न्यायबुद्धीबाबत सर्वांना खात्री असेल असे असावे, हे मुद्दाम सांगण्याची गरज नाही.

(७) सामान्यत: येऊ पाहणाऱ्या दंगलीची चाहूल पुरेशी आधी लागते. अशा

स्थितीत आगीचा डोंब उफाळेपावेतो शांतिसैनिकांनी वाट पाहू नये. त्याचा संभव दिसू लागताच त्यांनी परिस्थिती आटोक्यात ठेवण्याचा प्रयत्न जारी करावा.

(८) परिस्थिती चिघळल्यास काहींनी आपला पूर्ण वेळ याच कामास दिलेला बरा. पण असे केलेच पाहिजे अशातला भाग नाही. मिळतील तेवढे सज्जन स्त्री-पुरुष गोळा व्हावे ही कल्पना आहे. आपापले काम करूनही भोवतालच्या लोकांशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित करू शकण्याइतपत फुरसत असणारे शांति-सैनिक असण्याची पात्रता असणारे स्वयंसेवक मिळू शकतील तेव्हाच हे शक्य होईल.

(९) या सैनिकांचा एक गणवेश असावा, म्हणजे प्रसंगी त्यांना सहज ओळखता येईल.

या फक्त सामान्य सूचना आहेत. वेगवेगळी केंद्रे आपापल्याकरिता (वरील भूमिकेच्या पायावर) नियम करू शकतील.

हिंसाप्रधान सेनेत सैनिकाच्या वैयक्तिक आचरणाकडे लक्ष देण्याचे कारण नसते. तो शरीरत: लायक असला म्हणजे पुरे. त्याच्या नियंत्रणाकरिता शिक्षेच्या भयाची आणि नच भागले तर प्रत्यक्ष शिक्षेची गरज असते. अहिंसक सैन्यात थेट याच्या उलट असते. या सैनिकात शरीराला गौण स्थान असते. सर्व महत्त्व चारित्र्याला असते. अशा चारित्र्यवान व्यक्तींना ओळखणे कठीण आहे. सबब मोठमोठी शांतिदले स्थापन करणे कठीण आहे. ती लहानच राहतील. जागोजागी, खेडोपाडी, मोहल्ल्यामोहल्ल्यात राहतील. म्हणण्याचा सारांश की परस्पर-ओळखीच्या त्रिज्येतच ती निर्माण होतील. ती आपापला प्रमुख निवडतील. सर्वांचा दर्जा समान राहील. पण समान दर्जाच्या लोकांतही ज्याची आज्ञा इतर सर्व पाळतील असा कोणी तरी असावाच लागेल. त्याशिवाय सर्व मिळून सुनियंत्रित काम करता येणार नाही. अशी शांतिदले दंग्यांना सहज आळा घालू शकतील. या सैनिकांना आखाडबाजीचे संपूर्ण शिक्षण देण्याची गरज नाही; थोडीफार कदाचित् गरज असू शकेल.

जो जो वरील नियमांना (आणि तज्जन्य वृत्तीला) आत्मसात करील त्याला आपोआप सर्व सुचत जाईल. तरी स्वानुभवावरून मला स्पष्ट झालेले काही नियम येणेप्रमाणे –

(१) शांतिसैनिकाने कोणतेही हत्यार बाळगू नये.

(२) शांतिसैनिक म्हणून सहज ओळखता यावे म्हणून त्याने शरीरावर एखादे चिह्न धारण करावे.

(३) त्याच्याजवळ प्रथमोपचाराचे साहित्य असावे. त्याचे शिक्षणही त्याला असावे. अग्निशामक दलाच्या कामाचीही त्याला ओळख असावी.

(४) मोहल्ल्यातील सर्वांची त्याला ओळख असावी. हे देखील एक सेवा-कार्यच आहे.

(५) सतत रामनामाचा जप करावा व ज्यांचा विश्वास असेल अशा इतरांकडूनही करवून घ्यावा.

पुष्कळांना (आळसामुळे) वाटते की ईश्वर तर आहेच व तो आपले काम करतोच, तेव्हा फुकटचे नामस्मरण कशाला? ईश्वराला आम्ही मानतो की नाही यावर त्याचे मोठेपण अवलंबून नाही, हे खरे; पण अभ्यासकच त्याच्या अस्तित्वाचा उपयोग करू शकेल. भौतिक शास्त्रांबाबत जर हा (अभ्यासाचा) नियम खरा आहे तर अध्यात्माबाबत तर त्याहीपेक्षा तो अधिक खरा ठरेल. हे सत्य स्वतःच्या जीवनाने इतरांना पटवून देण्याची पात्रता सेवकात असावी लागेल.

आखाडबाजी हा भित्रेपणावर इलाज नाही. संकटांना निर्भयतेने तोंड देणे हा खरा इलाज आहे. मध्यमवर्गीय लोक भित्रे असतात आणि भित्रेपणाचे बाळकडूच अवाजवी लाड करून आपल्या पोराबाळांना देतात. असे असेतो धोक्याला कसेही करून (वाटेल ती किंमत देऊन) टाळण्याची जी प्रवृत्ती आहे ती कायमच राहील. म्हणून त्यांनी मुलाबाळांना एकटे वावरू देण्याची जोखीम पत्करावी. शरीराने फाटक्या वा खुजे दिसणाऱ्यातही सिंहवृत्ती असू शकेल; उलट आफ्रिकेतील अतिबलशाली झुलू लोकही इंग्रजांची मुले पाहिली की थरकापू लागतात. प्रत्येक गावाने आपल्यातील अशा सिंहवृत्तीच्या व्यक्ती हुडकून काढल्या पाहिजेत.

ज्यांना गुंड समजण्यात येते त्यांच्याशी आम्ही ओळख करून घ्यावी. शांतीची साधना करणारा आपल्या जवळपास असा कोणीच उरू देणार नाही. सर्वांशी त्याचे संबध गोडीचे राहतील, सर्वांची तो सेवा करील. गुंड आकाशातून टपकत नसतात. ते समाजातील कु-व्यवस्थेमुळे निर्माण होतात, म्हणून त्यांच्या निर्मितीची जबाबदारी समाजावर आहे. समाजशरीराचे एक रोगग्रस्त अंग असेच त्यांना मानण्यात आले पाहिजे. या रोगाच्या कारणाचा छडा लावला पाहिजे. कारण सापडल्यास इलाज अवश्यमेव सापडेल. पण या दिशेने अजून प्रयत्नच करण्यात आलेला नाही. निदान आता तरी अविलंब आम्ही या प्रयत्नाला लागावे. या प्रयत्नाच्या यशातच या समस्येचे उत्तर समाविष्ट आहे.

२०. सत्याग्रह

माणसाने निर्माण केलेल्या प्रत्येक संस्थेत धोका हा असतोच. संस्था जेवढी मोठी तेवढेच तिचा दुरुपयोग होण्याचे भय मोठे. लोकशाही अशीच एक मोठी संस्था आहे, अतएव तिचाही भरपूर दुरुपयोग होऊ शकतो. म्हणून लोकशाहीलाच टाळणे हा त्यावर इलाज नसून तिच्या दुरुपयोगाचा संभव किमान करणे हा त्यावर खरा इलाज आहे. लोकशाहीला अनुरूप वृत्ती निर्माण करायची असेल तर आम्हाला असहिष्णू राहता येणार नाही. असहिष्णुता ही आमच्या ध्येयावर आमचा विश्वास नसल्याची खूण आहे.

मतस्वातंत्र्य आणि आचारस्वातंत्र्य जर आम्हाला स्वत:करिता हवे तर ते दुसऱ्यासही द्यावयास पाहिजे. बहुमताचे सरकार लोकांवर जुलूम करू लागले म्हणजे ते अल्पसंख्य नोकरशाहीइतकेच असह्य होते. अल्पसंख्यकांना समजावून त्यांच्या संमतीनेच आम्ही त्यांना धीराने आपल्याकडे वळविले पाहिजे.

एका विशिष्ट मर्यादेपावेतो बहुमताचे शासन मानायलाच हवे. म्हणजे तपशीलाबाबत आम्ही त्यांचे निर्णय अवश्य मानावे, पण सर्वच निर्णय डोळे मिटून मानू तर ते गुलामीचे लक्षण ठरेल. लोकशाही म्हणजे 'मुकी बिचारी कुणी हाका' अशा-सारख्या मेंढराचा समुदाय नव्हे. लोकशाहीत व्यक्तींच्या आचारविचार-स्वातंत्र्याची जपणूक कसोशीने केली जाते, करावयास हवी. म्हणून (इच्छा व गरज पडेल तर) अल्पसंख्यकांना वेगळा मार्ग चोखाळण्याचा पूर्ण अधिकार आहे असे मी मानतो.

ज्या समाजात व्यक्तींना महत्त्व नाही त्या समाजात सत्त्वच राहणार नाही. व्यक्तिस्वातंत्र्य असेल तर एखाद्याला स्वेच्छापूर्वक स्वत:ला समाजार्पण करण्याची स्फूर्ती होईल. त्याचे हे स्वातंत्र्य हिरावून घेतल्यास तो जड यंत्रवत् बनून समाजाची बरबादी होईल. वैयक्तिक स्वातंत्र्य वजा केल्यास सुसंस्कृत समाज निर्माण होऊ शकणार नाही.

सत्याग्रहाचा अधिकार जन्मसिद्ध

सविनय कायदेभंग हा नागरिकाचा जन्मसिद्ध अधिकार आहे. त्यातून कधीच अराजकता निर्माण होऊ शकत नाही. हेतू दुष्ट असेल तरच अराजकता संभवते. अशा कायदेभंगाला सत्तेच्या सहाय्याने सरकार थोपवील. न थोपवू शकले तर ते स्वत: नष्ट होईल. पण सविनय कायदेभंगाला दडपण्याचा प्रयत्न हा अंतरात्म्याच्या आवाजाला दडपण्याच्या प्रयत्नासारखा (व्यर्थ) ठरेल.

माझ्या मते सविनय कायदेभंग हे वैध आंदोलनाचे शुद्धतम स्वरूप होय. अर्थात् आम्ही विनय आणि अहिंसा यांचा केवळ ढोंगपूर्ण बुरखा म्हणून उपयोग केला तर त्यामुळे लोक अध:पतित होतील आणि हा प्रकार निंदनीय ठरेल.

शुद्ध सत्याग्रहाची कसोटी

जो कायदेभंग शुद्ध मनाने केलेला व विनयपूर्ण असेल, ज्यात उर्मटपणा नसेल, जो भरीव तत्त्वावर आधारित असेल आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे ज्यात द्वेष, तिरस्कार यांचा लवलेशही असणार नाही, अशाला शुद्ध सत्याग्रह म्हणता येईल.

सविनय कायदेभंगात फक्त तेच भाग घेऊ शकतील जे इतर कष्टप्रद कायदे – ते सदसद्विवेकबुद्धी आणि धर्मबुद्धीला धक्का पोचवणारे नसतील तर – स्वेच्छेने पाळतात व जे अवज्ञेची शिक्षा आनंदाने भोगण्यास तयार आहेत. कायद्याची अवज्ञा पूर्णत: अहिंसक असावी लागेल, तरच तिला सविनय अवज्ञा म्हणता येईल. आत्मक्लेश आणि प्रेम यांद्वारे प्रतिपक्षावर विजय मिळविणे हे सविनय अवज्ञेमागील तत्त्व आहे.

सत्याग्रह हे प्रत्यक्ष उपायांपैकी एक अत्यंत प्रभावी साधन असल्यामुळे त्याचा उपयोग करण्यापूर्वी इतर सर्व उपायांचा अवलंब करून पाहिला पाहिजे. लोकांना भेटणे, अधिकाऱ्यांना भेटणे, सर्वांना समजावून सांगणे, मन वळविणे आदी सर्व उपाय निरर्थक ठरल्यावरच सत्याग्रहाचा उपयोग करायला हवा. मात्र एकदा सत्याग्रह सुरू केला म्हणजे सत्याग्रही सर्वस्व पणास लावतो आणि नंतर पाऊल मागे घेत नाही.

सत्याग्रह या शब्दाचा बराच सैल उपयोग करतात आणि प्रच्छन्न हिंसेलाही कधी कधी सत्याग्रहाचे नाव देण्यात येते. पण या शब्दाचा जन्मदाता या नात्याने मी स्पष्ट करू इच्छितो की यात कायिक, मानसिक वा वाचिक, कसल्याही प्रकारच्या हिंसेवर पूर्ण बहिष्कार असायला पाहिजे. प्रतिपक्षाचे वाईट चिंतणे अथवा इजा पोचविण्याच्या उद्देशाने त्याच्याशी किंवा त्याच्याबद्दल वाईट बोलणे, याने सत्याग्रहाचे उल्लंघन होते. सत्याग्रहामागे क्रोध अथवा द्वेष नसावा. गोंगाट, प्रदर्शन अथवा उतावळेपणाही असू नये. सत्याग्रह ही बळजबरीच्या थेट उलट कल्पना आहे. ती हिंसेपेक्षा अगदी वेगळी, पण हिंसाचाराशी (परिणामदृष्ट्या) सर्वस्वी तुल्यबल अशी गोष्ट आहे.

मी अनेक वेळा म्हटले आहे की हिंसा, लूटमार, जाळपोळ यांना सत्याग्रहात मुळीच स्थान नाही. पण याला न जुमानता आम्ही घरे जाळली आहेत, जुलुमाने हत्यारे हिसकली आहेत, धमक्या दाखवून लोकांकडून पैसे घेतले आहेत, आगगाड्या अडवल्या आहेत, तारा कापल्या आहेत, निर्दोष माणसांची हत्या केली आहे आणि

दुकाने व घरे लुटली आहेत. तुरुंग किंवा फांशीच्या तख्त्यावरून यामुळे माझी सुटका होऊ शकत असली तरीही वरपैकी एकही गोष्ट केलेली मला आवडणार नाही.

हिंसेच्या प्रयोगात मला भारताच्या नाशाशिवाय इतर काहीही (शक्यता) दिसत नाही. देशातील कायदे मोडून जर लोक आपला राग शमवत असतील तर ते आत्मघात करीत असून भारताला परिणामी अवर्णनीय कष्ट भोगावे लागतील. सत्याग्रह आणि सविनय कायदेभंगाच्या माझ्या कल्पनेत कायद्यांची दुष्टबुद्धीने केलेली पायमल्ली अभिप्रेत नाही. सत्याचा प्रचार हिंसेच्या सहाय्याने होऊ शकत नाही असा माझा अनुभव आहे. ज्यांचा स्वत:च्या ध्येयावर पूर्ण विश्वास आहे त्यांच्यात असीम तितिक्षा असावी लागेल. ज्यांच्यात हिंसेची कोणतीही छटा शिल्लक नाही तेच सविनय कायदेभंगास योग्य ठरतील. ज्याप्रमाणे कोणीही एकाच वेळीं संयत आणि कुपित असू शकत नाही, तद्वत् अवज्ञाही एकसमयावच्छेदेकरून सविनय आणि अविनय (हिंसात्मक) असू शकणार नाही. मनोविकारावर पूर्ण विजय मिळविल्यावरच जसा संयम शक्य ठरतो, तद्वत् देशाच्या कायद्यांचे जर आम्ही सहर्ष आणि पूर्णतया पालन करीत असू तरच आम्हाला सविनय अवज्ञेचा हक्क प्राप्त होईल. प्रलोभनांनी वेष्टिलेल्या परिस्थितीत प्रलोभनांपासून मुक्त असणाराच त्यांच्या पलीकडे गेलेला म्हटला जाऊ शकतो, तसेच रागाची अनेकविध कारणे चौफेर असलेल्या स्थितीतही क्रोधवश न झालो तरच आपण क्रोधावर विजय मिळवला आहे असे होईल.

धरणे वा घेराव

काही लोकांनी धरणे देण्याच्या जुन्या जंगलीपणाला पुन: सुरुवात केली आहे. हा प्रकार अशोभनीय आहे म्हणून मी याला जंगली म्हटले आहे. यात भेकडपणाही आहे. कारण धरणे देणाराची खात्री असते की त्याला चिरडून कोणी पुढे जाणार नाही. ही हिंसा नसेल, पण तिच्यापेक्षाही जास्त निंदनीय गोष्ट आहे. धर्मयुद्धात आपण प्रतिस्पर्ध्यालाही आपणावर वार करण्याची संधी तरी देतो. पण जेव्हा आम्ही त्याला आम्हाला चिरडून पुढे जाण्याचा (एकमेव) पर्याय खुला ठेवतो तेव्हा आम्ही त्याच्यापुढे एक विषम आणि अपमानास्पद परिस्थिती निर्माण करतो. उत्साहामुळे धरणे देणे जंगलीपणाचे आहे, हे आमच्या लक्षातसुद्धा आलेले नाही. पण ज्याच्याकडून सदसद्विवेकबुद्धीच्या आज्ञेनुसार वागणूक आणि हव्या त्या आपत्तींना तोंड देण्याच्या तयारीची आम्ही अपेक्षा करतो तो इतका अविचारी बनू शकणार नाही. अतएव असहयोगी लोकांनी प्रथमपासूनच फार काळजी घ्यावयास हवी. या कामी अधीरता, जंगलीपणा, उर्मटपणा अथवा असमर्थनीय जबरदस्ती यांपैकी काहीही नसावे.

व्यक्तिवाद आणि व्यक्तिस्वातंत्र्य

व्यक्तिगत स्वातंत्र्याची मी कदर करतो. परंतु मनुष्य मूलत: एक सामाजिक प्राणी आहे हे आपण विसरू नये. सामाजिक प्रगतीच्या आवश्यकतेनुसार व्यक्तित्वाला मुरड घालणे शिकूनच तो आजच्या स्थितीला पोचला आहे. निरंकुश व्यक्तिवाद वन्यपशूंतच संभवतो. सामाजिक कल्याणाकरिता संयमापुढे नतमस्तक होण्यातच समाजाचे आणि मनुष्याचे, दोघांचेही कल्याण आहे. मानवी आणि दैवी, दोन्ही नियमांचे स्वेच्छेने सहर्ष पालन करण्याची सवय लावून घ्यावयास हवी. कारण असेच लोक लोकशाहीस पात्र ठरतील. लोकांनी प्रथम स्वत:ला ही कसोटी लावून पहावी. त्यांनी नि:स्वार्थीही असावे लागेल. व्यक्तीपुरता अथवा पक्षापुरताच विचार न करता व्यापक दृष्टीने संपूर्ण लोकशाहीचा विचार करावा लागेल. तेव्हाच सविनय कायदेभंगाचा अधिकार प्राप्त होईल.

उपवास

सत्याग्रहाच्या अस्त्रागारातील उपवास हे अत्यंत प्रभावी अस्त्र आहे. केवळ शरीरत: उपवासक्षमता असून भागणार नाही. ईश्वरावर अनन्यभक्ती नसेल तर इतर सर्व लायकी व्यर्थ होय. एखाद्याची यांत्रिक नक्कल करण्याचीही ती बाब नव्हे. तिची प्रेरणा अंतरात्म्यातून मिळावी लागते, आणि हे फार विरळा आहे.

येथे मी एका सामान्य सिद्धांताचा उल्लेख करतो. सर्व उपाय थकल्यावरच सत्याग्रह्याने उपवास योजावा. सफलतेबद्दल आसक्ती बाळगून उपवास करू नये. तत्त्वहीन, उपहासपात्र उपवास रोगराईसारखे पसरतात व ते हानिकारकच ठरतात. यमनियमांचा पालन करून ज्याने आपले जीवन शुद्ध केलेले नसेल त्याने सत्याग्रह म्हणून उपवास करू नये.

उपवासाला क्वचित् बळजबरीचा वास येतो, हे नाकबूल करता येणार नाही. स्वार्थी उद्देशाकरिता करण्यात येणाऱ्या उपवासात हा वास बराच उग्र असतो. स्वार्थाकरिता एखाद्या व्यक्तीवर असे अन्याय्य दडपण आणण्याला बलात्कारच म्हणावा लागेल. माझ्याविरुद्ध केलेल्या उपवासांना व दिलेल्या उपवासाच्या धमक्यांच्या दडपणाला मी यशस्वितेने तोंड दिले आहे. कोणी म्हणेल की स्वार्थपूर्ण आणि स्वार्थहीन उपवासांमधील विभाजन-रेषा स्पष्ट नाही, तर मी एवढेच म्हणेन की ज्याच्याविरुद्ध उपवास करण्यास आला असेल त्याची जर मनोमय खात्री असेल की त्याच्याविरुद्धचा उपवास अन्याय्य आहे तर उपवास करणारा मेला तरी त्याने त्याची

निग्रहपूर्वक दखल घेऊ नये. असे केले म्हणजे अन्याय्य उपवासांच्या प्रथा आपोआप विरून जातील. माणसाच्या इतर सर्व कामकाजांप्रमाणे उपवासातही योग्यायोग्य आहेच.

सत्याग्रहाचे खरे शिक्षण

ज्यांचे हृदय बावनकशी सोन्यासारखे आहे, ज्यांच्यात देशप्रेम आहे व ज्यांना शिकण्याची इच्छा आहे, ज्यांना वाटते की कोणीतरी त्यांचे मार्गदर्शन करावे, अशा हजारो-लाखो लोकांना आम्ही सत्याग्रहाचे योग्य शिक्षण दिले पाहिजे. फक्त मोजके बुद्धिवान व निष्ठावान कार्यकर्ते यासाठी पुरतील. हे मिळाल्यास संपूर्ण देशाला ताबडतोब कार्यप्रवण करता येईल आणि बहुसंख्येच्या केवळ अव्यवस्थित गर्दीऐवजी सुव्यवस्थित लोकशाही प्रस्थापित होऊ शकेल.

समुदायाच्या क्षोभाची जितकी मला भीती वाटते तितकी सरकारी क्षोभाची वाटत नाही. कारण जनतेतील स्वच्छंदता राष्ट्रीय रोगाची द्योतक आहे, तर सरकारी रोष फक्त मोजक्या यंत्रणेपुरताच मर्यादित असल्यामुळे जनक्षोभाला तोंड देणे त्यापेक्षा कितीतरी कठीण असते. नालायक ठरलेल्या सरकारला पदच्युत करणे सोपे आहे, पण भाऊगर्दीतील अपरिचित व्यक्तींचा उन्माद घालवणे फारच कठीण आहे.

पण हेही खरे की या गर्दीला योग्य शिक्षण देणेही जास्त सुलभ आहे. गर्दीचे काम विचारपूर्वक अथवा पूर्व-योजनाबद्ध असत नाही. गर्दीतील लोक फक्त भावनावेगात काहीतरी करीत असतात. आपल्या चुकांबद्दल त्यांना पश्चात्तापही लवकर होतो.

सरकार किंवा प्रजा, कोणीही दहशतवादाचा अवलंब केल्यास लोकशाहीची भावना रुजवणे कठीण आहे, आणि एका अर्थाने या दोहोंपैकी प्रजेचा दहशतवाद हा लोकशाहीचा जास्त मोठा शत्रू मानावा लागेल.

आदर्श राज्यव्यवस्था

खरीखुरी लोकशाही प्रस्थापित होऊन लोकांच्या हाती सत्ता आल्यास प्रजेच्या स्वातंत्र्यात होणाऱ्या हस्तक्षेपाचे प्रमाण कमी होत जाईल. निराळ्या रीतीने असे म्हणता येईल की राज्यसत्तेच्या हस्तक्षेपाची गरज न पडता जे राष्ट्र आपले व्यवहार शांततामय आणि प्रभावी रीतीने करू शकेल, तेच खऱ्या अर्थाने लोकतंत्रात्मक ठरेल. जेथे अशी परिस्थिती नसेल तेथील राज्य बाह्यत: लोकशाही दिसले तरी खऱ्या अर्थाने ते लोकशाही असणार नाही.

राज्यसत्तेच्या वाढत्या हस्तक्षेपाचे मला फार भय वाटते. कारण, वरपांगी जरी ती शोषण कमी करताना दिसली तरी मनुष्याच्या व्यक्तित्वाला नष्ट करून ती मानवजातीचे फार मोठे अकल्याण करते. कारण व्यक्ती हेच प्रगतीचे मूळ आहे. राज्यसत्ता हिंसेचे केंद्रित आणि संघटित स्वरूप आहे. व्यक्तीला आत्मा असतो, परंतु राज्यसत्ता एक आत्मारहित जड यंत्र असते. सबब राज्यसत्तेची हिंसेपासून मुक्तता होणे नाही.

राज्यसत्तेलाच मी साध्य मानत नाही. प्रजेचा सर्वांगीण विकास आणि उन्नती करण्याचे ती एक साधन मात्र आहे. प्रतिनिधींमार्फत राष्ट्रीय जीवनाचे नियमन करणे एवढाच राज्यसत्तेला अर्थ आहे. जर हे राष्ट्रीय जीवन इतके परिपूर्ण झाले की नियमनाची गरज उरली नाही, तर प्रतिनिधित्वाची गरज राहणार नाही. मग ज्ञानपूर्ण राज्यहीनतेची स्थिती निर्माण होईल. अशा स्थितीत प्रत्येक जण आपापला राजा राहील. शेजाऱ्यांना त्रास न देता आत्मनियमन तो स्वेच्छेने करील. म्हणून आदर्श स्थितीत राज्यसत्ता राहणारच नाही. मात्र जीवनात आदर्श कधीच गाठता येत नाही. म्हणून थीरोने (अमेरिकन तत्त्वज्ञ) म्हटले आहे की जी राज्यसत्ता कमीत कमी शासन करेल ती उत्कृष्ट होय.

राज्यसत्ता गैरहजर असलेला समाज आज जगात कोठेही नाही. जर कधीकाळी तो निर्माण होऊ शकला तर भारतातच संभवतो, कारण भारताने अशी समाजव्यवस्था स्थापन करण्याचा प्रयत्न केला आहे. आजपावेतो आम्हाला या दिशेने कमाल धैर्याचा प्रत्यय देता आला नाही. ज्यांचा यावर विश्वास असेल त्यांनी ही बहादुरी करून दाखवावी, हा याचा एकमेव मार्ग आहे. याकरिता जसा आम्ही तुरुंगभयाचा त्याग केला त्याप्रमाणे मृत्युभयाचाही त्याग करावा लागेल.

२१. युवक हे आह्वान स्वीकारतील काय?

आम्हाला एक दर्जेदार ग्रामव्यवस्थेचा वारसा मिळाला आहे. मला वाटते की आमच्या विशिष्ट देशकालपरिस्थितीने जणू कायमचा निर्णय करून ठेवला आहे की आमच्या येथे ग्रामीण संस्कृतीच असावी. तिच्यातील दोष प्रसिद्ध आहेत, पण ज्याचे निर्मूलन होऊ शकणार नाही असा एकही दोष नाही. या संस्कृतीचे उच्चाटन करून तिच्याजागी शहरी संस्कृती स्थापन करणे माझ्या मते अशक्य आहे. आम्ही एखाद्या अमानुष तंत्राचा अवलंब करून आमची ३० कोटींची लोकसंख्या तीन कोटी किंवा तीस लाखापावेतो कमी केली तर गोष्ट निराळी. म्हणून आम्हाला ग्रामप्रधान संस्कृतीशिवाय तरणोपाय नाही हे लक्षात घेऊन तिच्यातील दोषांचे निवारण करण्याचे प्रयत्न करावयाचे आहेत. हे लक्षात घेऊन मी त्या दोषांवरचे उपाय सुचविले आहेत. पण देशातील युवक जर ग्राम-जीवनाचा स्वीकार करतील तरच त्या उपायांचा उपयोग होऊ शकतो. ते तसे करू इच्छितील तर त्यांना त्यांच्या जीवनक्रमात आमूलाग्र बदल घडवून आणावा लागेल आणि सुट्टीचा प्रत्येक दिवस त्यांच्या शाळा-कॉलेज-नजीकच्या खेड्यात घालवावा लागेल; आणि ज्यांचे शिक्षण पूर्ण झाले असेल किंवा जे शिकत नसतील त्यांना खेड्यात राहण्याचा निश्चय करावा लागेल.

खेड्यांतून काम करणे आमच्या जिवावर येते. आम्हा शहरवासियांना ग्रामीण जीवनाचा स्वीकार करणे फार कठीण वाटते. तेथील कठीण दिनचर्या सहन करण्यास आमची शरीरे तयार नसतात. पण जनतेच्या कल्याणाकरिता जर आम्हाला स्वराज्याची स्थापना करावयाची असेल, फक्त आजच्या शासनकर्त्यांना पदच्युत करून त्यांच्याऐवजी दुसऱ्या एखाद्या संचाला (जो कदाचित् आजच्यापेक्षाही वाईट ठरेल) सिंहासनारूढ करणे हाच केवळ आमच्या खटपटीचा उद्देश नसेल, तर मग (ग्रामीण जीवनात) कितीही अडचणी असोत, त्या सर्वांना धैर्याने, शौर्याने, इतकेच काय पण प्रसंगी जिवावर उदार होऊनसुद्धा तोंड द्यावे लागेल. आजपावेतो हजारो-लाखो ग्रामीणांनी आम्हा शहरवासियांना सुखी करण्यापायी प्राणार्पण केले आहे; आम्ही त्या उपकारांची परतफेड करावयास हवी. मात्र त्यांच्या आणि आमच्या प्राणार्पणात महत्त्वाचा फरक राहील. ते नाइलाजाने, असहायतेमुळे मरत. त्यांच्या या अगतिक बलिदानामुळे आम्ही अध:पतित झालो आहोत. आम्ही समजून घेऊन आणि स्वेच्छेने बलिदान करू तर आपणा सर्वांचेच उत्थान होईल. आम्हाला एक स्वतंत्र, स्वावलंबी राष्ट्र म्हणून जगायचे असेल तर आम्ही या बलिदानापासून पळ काढता कामा नये.

युवकांनी खेड्यांतून जाऊन तेथे कायमची वस्ती करावी अशी माझी इच्छा आहे. त्यांचे मालक अथवा उपकारकर्ते म्हणून नव्हे, तर नम्र सेवक बनून. त्यांनी स्वत:च्या दिनचर्येत आणि राहणीत कोणता व कसा बदल करावयास हवा, हे तुम्ही स्वत:च्या उदाहरणाने पटवून द्या. भारताच्या दु:खीकष्टी आत्म्याला लेप लावून बरे आणि सुखी करणारे देवदूत या नात्याने तुम्ही त्यांच्यात जाऊन रहावे अशी माझी इच्छा आहे.

युवकांनी प्रायश्चित्त करावे

खेड्यांची दुर्दशा होण्याचे प्रमुख कारण असे आहे की ज्यांना सुदैवाने शिक्षण मिळाले, त्यांनी त्यांची फार उपेक्षा केली. त्यांनी स्वत:करिता शहरी जीवनाची निवड केली. सबब सेवाभावी लोकांनी खेड्यांत जावे, आणि तेथील जनतेशी निरोगी संपर्क निर्माण करावा, या हेतूने होणारा ग्राम-आंदोलन हा एक प्रयत्न आहे. सेवाभावाने जे खेड्यात राहू लागले त्यांचा तेथील अडचणींमुळे उत्साहभंग होत नाही. त्यांची सर्व प्रकारच्या अडचणींना – म्हणजे खुद्द ग्रामीण सुरुवातीला उदासीन राहतील या शक्यतेलाही – तोंड देण्याची तयारी असते. ज्यांचा स्वत:वर व स्वत:च्या उद्दिष्टांवर मनोमन विश्वास आहे त्यांचाच ग्रामीणांच्या जीवनावर प्रभाव पडू शकेल. शुद्ध जीवन जगणे हेच असे प्रभावी (उदाहरण) ठरते की ज्याचा सभोवारच्या लोकांवर परिणाम झाल्याशिवाय राहत नाही. पण जे निव्वळ चरितार्थदृष्ट्या खेड्यांतून जातात त्यांना ग्रामजीवनाचे आकर्षण नसणे स्वाभाविक आहे. सेवाभाव मनात नसता जे खेड्यांत जाऊन राहतात, त्यांना तिथली नवलाई संपली की ते जीवन नीरस वाटू लागणार.

नवयुवकांना माझी सूचना आहे की त्यांनी या सर्वाला घाबरण्याऐवजी ग्रामीण जीवन अधिक सोयीचे आणि सुखावह करण्याकरता झटावे. पण हे ग्रामीणांची त्यांना अनुकूल असणारी सेवा करूनच होईल. गाव स्वच्छ राखणे आणि त्याच्यात शिक्षणाचा प्रचार करणे यापासून अशा कामात सुरुवात करता येईल. युवकांचे स्वत:चे जीवन शुद्ध, स्वच्छ आणि परिश्रमी राहील तर त्याची (उपकारक) लागण इतर ग्रामीणांना झाल्याशिवाय राहणार नाही.

ग्रामसेवकाची कर्तव्ये

गावातील सर्व लोकांची ओळख करून घेणे, त्यांना हवी असलेली त्यांची सेवा करणे, यासाठी साधने गोळा करणे आणि त्यांना (त्यांचा उपयोग) शिकविणे, नवे कार्यकर्ते निर्माण करणे इत्यादी कामे या ग्रामसेवकाने करावी. यानंतर त्याचा ग्रामीणांवर

इतका प्रभाव पडेल की ते स्वत:च आपल्या गरजा त्याला सांगतील व अवश्य ती साधने आणि कार्यकर्ते मिळवून देण्यात मदत करतील. समजा, मी गावात एक तेलघाणी लावली तर घाणीशी संबंधित असणारी सर्व कामे तर करीनच, पण मी केवळ फक्त थोडेसे पैसे मिळविणारा तेली बनून राहणार नाही; मी 'महात्मा' तेली बनेन ! 'महात्मा' शब्द मी विनोदार्थ वापरला आहे. माझा आशय एवढाच की त्या घाणीच्या उद्योगातील सर्व सुप्त शक्यता लोकांना स्पष्ट करून देऊन त्यांना चकित करून सोडीन, आणि त्या उद्योगाला ग्रामीणांच्या दृष्टीने आकर्षक बनवीन. मी गीता, कुराण आदी वाचणारा, त्यांच्या मुलाबाळांना शिक्षण देण्याची क्षमता असणारा असा तेली बनेन. कदाचित् वेळेच्या अभावी मी शिकवू न शकलो तर ते म्हणतील, 'तेली महाशय ! आम्हाला एक शिक्षक मिळवून द्या.' मी उत्तर देईन, 'आणून देतो, पण त्याचा खर्च तुम्हाला सोसावा लागेल.' ते आनंदाने हे कबूल करतील. मी त्यांना कातणे शिकवीन. त्यांना विणकर लागेल तेव्हा शिक्षकाप्रमाणेच त्यांना तोही मिळवून देईन. म्हणजे कालांतराने ज्यांना विणकाम शिकण्याची इच्छा आहे त्यांना ते शिकता येईल. मी त्यांना ग्रामसफाईचे महत्त्व पटवून देईन. या कामाकरिता ते भंग्याची मागणी करतील तर मी म्हणेन, ''मी स्वत:च भंगी आहे. या ! मी तुम्हाला हे काम शिकवितो.' समग्र ग्रामसेवेची माझी कल्पना अशी आहे. आपण म्हणाल की असा तेली या युगात जन्मास येणे नाही, तर मी असे म्हणेन की मग आमची खेडी युगानुयुगे आजच्यासारखीच राहतील.

शहरांतून जसे भांडणारे पक्षोपपक्ष आहेत तसेच ते खेड्यांतही असावे, हे आमचे दुर्दैव आहे. आणि आपापल्या पक्षांचे बळ वाढविण्याकरिता खेड्यांचा उपयोग करण्याच्या दृष्टीने जेव्हा राजकारणाचा तेथे प्रवेश होतो तेव्हा त्यांना सहाय्य होण्याऐवजी त्यांच्या प्रगतीत अडथळा मात्र निर्माण होतो. मी तर असे म्हणतो की (ग्रामोद्धाराच्या कार्यात) आम्ही अधिकात अधिक स्थानिक सहाय्य घ्यावे. राजकीय सत्ता हस्तगत करण्याचा मोह टाळू, तर आमच्या हातून एकही वाईट कृत्य होण्याची शक्यता उरणार नाही. शहरांतील इंग्रजी शिकलेल्या स्त्री-पुरुषांनी भारताला आधारभूत असलेल्या खेड्यांचे अस्तित्वच विसरून जाण्याचा अपराध केला आहे. ही आमची कृती आम्ही आठवू तर खचित आमच्यात धीर निर्माण होईल. आजपावेतो मी ज्या ज्या खेड्यात गेलो तेथे कोणी न कोणी एखादा तरी खरा ग्रामसेवक मला भेटतच गेला. पण खेड्यांतूनही बरेचसे ग्रहण करण्यायोग्य चांगले आहे, असे कबूल करण्याची विनयवृत्ती आमच्यात नाही. म्हणूनच तेथे आम्हाला कोणी असा भेटत नाही. आम्ही स्थानिक राजकारणापासून अवश्यमेव अलिप्त असावे, पण जर आम्ही सर्व पक्षांची,

तसेच कोणत्याही पक्षात सामील नसलेल्या अशा सर्वांची मदत घेण्याचे शिकू तरच हे शक्य होईल.

सुसंस्कृत कुटुंब हीच एक मोठी आदर्श शाळा आहे आणि सदाचारी माता-पिता यांच्या तोडीचे चांगले शिक्षक संभवत नाहीत. सध्याचे प्रचलित आणि ग्रामीणांना निरुपयोगी असणारे शिक्षण हे त्यांच्यावर एक व्यर्थ ओझे आहे. त्यांना त्याचा काही उपयोग नाही. त्यांची मुले हे शिक्षण मिळविण्याची आशा करू शकत नाहीत. आणि ईश्वराची अशी कृपा आहे की सुसंस्कृत कुटुंबात जे शिक्षण मिळू शकते ते जर त्यांना मिळेल तर आजच्या प्रचलित शिक्षणाची उणीव त्यांना कधीच भासणार नाही. जर ग्रामसेवक संस्कारवान नसेल, त्याच्यात स्वतःच्या कुटुंबात सुसंस्कृत वातावरण निर्माण करण्याची पात्रता नसेल, तर त्याने ग्रामसेवक बनण्याची, त्यायोगे मिळणारे अधिकार आणि प्राप्त होणाऱ्या मोठेपणाची आकांक्षा सोडून दिलेली बरी.

आपले सर्व ज्ञान आणि पांडित्य एका पारड्यात ठेवा आणि दुसऱ्या पारड्यात सत्य आणि पावित्र्य ठेवून पहा. पांडित्याचे पारडे अस्मानाला टेकल्याचे आढळून येईल. आज नैतिक अपवित्रतेचे विष आमच्या तरुणांत भिनले असून एखाद्या संसर्गजन्य रोगसाथीप्रमाणे त्यांचे नुकसान करत आहे. म्हणून मला तुम्हाला विनवायचे आहे की शरीर व मन पवित्र ठेवा. आज काही शिक्षकांचेच स्वतःचे जीवन शुद्ध आणि पवित्र नसते हे मी जाणतो. अशा शिक्षकांना मी म्हणेन की त्यांनी त्यांच्या विद्यार्थ्यांना कितीही शब्दज्ञान दिलेले असो, त्यांनी जर विद्यार्थ्यांत सत्य आणि पावित्र्याबद्दल निदिध्यास उत्पन्न केला नसेल तर त्यांनी शिष्यद्रोह केला असेच म्हणावे लागेल. आणि त्यांची उन्नती करण्याऐवजी त्यांना आत्मनाशाच्या मार्गावर त्यांनी प्रवृत्त केले असे ठरेल. चारित्र्याच्या अभावी ज्ञान हे अनिष्टाचेच पोषक ठरेल. वरपांगी सज्जन दिसणाऱ्या, पण अंधारात चोरी आणि बेइमानीचे धंदे करणारांच्या बाबतीत हे (ज्ञान आणि बुद्धिमत्तेचा दुरुपयोग) आम्हाला स्पष्टपणे दिसते. ज्यांच्यावर भारताचे भवितव्य अवलंबून आहे असे मानले जाते त्या युवकांना अळणी भारतीय जीवनात स्वाद उत्पन्न करण्याकरिता मिठाची भूमिका भागवावी लागेल. मिठानेच खारटपणाचा त्याग केला तर मग व्हायचे कसे?

युवकांवर विश्वास

माझा भरवसा देशातील युवकांवर आहे. ज्यांना वाईट सवयी असतील ते मुळात वाईट नाहीत. अविचारामुळे त्यांच्यात वाईट शिरले आहे. यामुळे त्यांचे स्वतःचे आणि

देशातील इतर युवकांचे किती (भयंकर) नुकसान होत आहे, हे त्यांनी ओळखावे. त्यांना आत्मनाश व राष्ट्रनाश टाळायचा असेल तर त्यांना संयमशील आणि आत्मशासित जीवनच जगावे लागेल. याला दुसरा पर्याय नाही.

सर्वांत महत्त्वाचे म्हणजे त्यांनी ईश्वराचा शोध करावा. प्रलोभनांपासून रक्षण व्हावे, याकरिता त्याची प्रार्थना करावी. त्याच्या मदतीशिवाय यांत्रिक नियमपालनाने काही साध्य होणार नाही. एखाद्या लहान मुलाला जशी विनासायास स्वतःच्या आईच्या हृदयातील प्रेमाची जाणीव असते तद्वत् ईश्वर आमच्या हृदयांत विराजमान आहे याची जाणीव ठेवावी.

२२. स्वतंत्र भारताचे ध्येय

जगातील एक-पंचमांश लोकसंख्या असलेल्या भारताला इतर कोणाचे शोषण करता यावे, याकरिता मला भारताचे स्वराज्य नको आहे. माझी संपूर्ण शक्ती पणास लावून हा अनर्थ थोपविण्याचा मी प्रयत्न करीन. मला जसे स्वातंत्र्य हवे तसे इतर सर्वांनाही – मग ते सबळ असोत की दुर्बल – असावयास हवे हे मला मान्य केलेच पाहिजे. जर माझी अशी मान्यता नसेल तर मी या स्वातंत्र्यास पात्र ठरणार नाही.

माझे ध्येय केवळ भारताच्या स्वातंत्र्यापेक्षा कितीतरी उच्च आहे. भारताच्या स्वातंत्र्याद्वारा जगातील इतर अनेक दुर्बल देशांची शोषणापासून मुक्तता करण्याची माझी महत्त्वाकांक्षा आहे. भारताने जर आपले न्याय्य व योग्य स्थान प्राप्त केले तर तसे इतर कोणालाही करता येईल.

भारताने अहिंसेच्या सहाय्याने स्वराज्य प्राप्त करण्यात यश मिळविले तर त्याला अफाट स्थळ, जळ आणि वायुसेना जय्यत ठेवण्याची इच्छा राहणार नाही. याकरिता अवश्य ती उंची जर भारताने गाठली तर अखिल जगातली मूल्ये बदलून शस्त्रसंभार निरर्थक ठरेल. असा भारत हा केवळ कल्पनेचा खेळ असू शकेल – कदाचित् ही पोरकट कल्पनाही असू शकेल – पण माझ्या मते भारत अहिंसेद्वारा स्वतंत्र होण्याचे याशिवाय दुसरे फलित असू शकत नाही. मग जगातील इतर शस्त्रधारी देशांना आटोक्यात राखणारी एक महान शक्ती ही भारताची भूमिका राहील.

जग रक्तपाताला कंटाळले आहे, अशी माझी मनोमन खात्री आहे. या असह्य स्थितीतून सुटकेचा मार्ग जग शोधीत आहे. माझा पूर्ण विश्वास आहे – आणि त्याचा मला आनंद आणि अभिमानही आहे – की असा मार्ग दाखविण्याचे श्रेय भारताच्या प्राचीन भूमीच्या वाट्यासच येणार आहे.

भारतीय राष्ट्रीय सरकारचे धोरण कसे राहील याचा मी अंदाज करू शकत नाही. मला कितीही तीव्र इच्छा असली तरी ते पाहण्याकरिता मी जिवंत नसेन. पण तोपावेतो जिवंत राहिलो तर अहिंसेचा यथासंभव संपूर्णपणे उपयोग करण्याचा मी अत्याग्रहपूर्वक सल्ला देईन. विश्वशांती आणि नवीन निर्माण होणाऱ्या जागतिक व्यवस्थेला हे भारताचे सहाय्य ठरेल. भारतात अनेक लढवय्या शूर जाती आहेत, आणि मला तर असेही वाटते की सरकारी निर्णयांबाबत त्यांच्या मतालाही महत्त्व राहणार असल्यामुळे आमच्या राष्ट्रीय सैन्यवादाचा कल आजपेक्षा निराळ्या दिशेने राहण्याची शक्यता आहे. एक राजनैतिक अस्त्र म्हणून आम्ही आजवर जो अहिंसेचा प्रयोग केला तो

सर्वस्वी वाया जाऊ नये, असे मला वाटते. आणि मनोमन अहिंसावादी लोकांचे एक पुरेसे मोठे सैन्य भारतात सिद्ध होईल अशी मला आशा आहे.

भारत जेव्हा स्वावलंबी होईल, दुसऱ्याच्या संपत्तीचा लोभ करणार नाही आणि स्वत:चे शोषणही होऊ देणार नाही, तेव्हा तो कोणत्याही पौर्वात्य अगर पाश्चात्य देशासाठी – मग ते कितीही बलिष्ठ असोत – प्रलोभनाचा विषय बनणार नाही. त्याला सैन्यावर अफाट खर्च न करताही सुरक्षिततेचा आत्म-प्रत्यय येईल. अंतस्थ स्वावलंबन एखाद्या ढालीप्रमाणे त्याचे बाह्य आक्रमणापासून रक्षण करील.

जगातील विचारवंतांना आज एकमेकांवर तुटून पडणारी राष्ट्रे नकोत. त्यांना परस्परांत मित्रभाव बाळगणाऱ्या आणि परस्परपूरक राष्ट्रांचे संघ असावेत असे वाटते. हे ध्येय आज पुष्कळच दूरच्या टप्प्यावर भलेही असो, पण आम्ही पूर्ण स्वातंत्र्याऐवजी अशा परस्परपूरक जागतिक राष्ट्रसंघाचे सदस्य बनण्याचे (ध्येय) घोषित करू तर त्यात मोठेसे नवल अथवा ते अशक्य वाटण्याचे काहीच कारण नाही.

खरे देशप्रेम

माझ्या लेखी देशप्रेम आणि मानव-प्रेम यांच्यात फरक नाही. दोन्ही एकच आहेत. मी मानवप्रेमी आहे म्हणूनच देशप्रेमीही आहे. माझे देशप्रेम वर्जनशील नाही. अर्थात् भारताच्या कल्याणाकरिता मी इंग्लंड अथवा जर्मनीचे नुकसान करू इच्छिणार नाही. माझ्या योजनेत साम्राज्यवादाला मुळीच स्थान नाही. देशप्रेमी माणसाच्या जीवनविषयक कल्पनेत आणि एखाद्या कुटुंबप्रमुखाच्या अथवा जमातप्रमुखाच्या कल्पनेत भेद असत नाही. एखादा देशप्रेमी त्याच प्रमाणात मानवप्रेमी नसेल तर त्याच्या देशप्रेमात काहीतरी उणीव आहे, असे म्हणावे लागेल. व्यक्तिगत आणि राजकीय जीवनात तफावत असू शकत नाही; सदाचाराचे नियम दोघांनाही सारखेच लागू असतात.

देशप्रेमाचा धर्म आज आम्हाला असे शिकवितो की व्यक्तीने कुटुंबासाठी, कुटुंबाने गावासाठी, गावाने प्रदेशासाठी मरणे शिकले पाहिजे. त्याचप्रमाणे एखाद्या देशाने स्वतंत्र यासाठी झाले पाहिजे की वेळ आल्यास तो जगाच्या कल्याणासाठी आपले बलिदान करू शकेल. म्हणण्याचा आशय असा की मानवजातीच्या व्यापक कल्याणार्थ भारताला स्वत:चे बलिदान करण्याच्या तयारीत असावे लागेल; स्वातंत्र्यप्राप्तीचे उद्दिष्टच ते असावे.

इतर सर्वांचे उत्थान व्हावे याकरिता मला भारताचे उत्थान हवे; इतरांच्या

नाशाच्या पायावर मला भारताच्या उत्थानाची उभारणी अभिप्रेत नाही.

पन्नास वर्षांच्या सार्वजनिक सेवेच्या अनुभवानंतर मी म्हणू शकतो की देशसेवा आणि विश्वसेवा यांत कोणतीही विसंगती नाही. माझा हा विश्वास वाढीवरच आहे. या भूमिकेच्या सहाय्यानेच जगातील कष्ट व दुःखे नाहीशी होऊन भिन्न-भिन्न राष्ट्रांत जो वैरभाव आज दिसून येतो तो नाहीसा होईल.

भारताला जर आपल्या कर्तव्याचा विसर पडेल तर पुरा आशिया मरून जाईल. भारतात अनेक संस्कृतींचे मिश्रण अस्तित्वात आहे. सर्वांनी शेजारी राहून आपला योगक्षेम चालविला आहे. आम्ही असे वागावे की जगातील कोणत्याही पददलितांना आमच्याकडे पाहून आशा वाटू लागेल.

पाश्चिमात्यांना एखादा संदेश देणे असेल तर आम्ही तो सत्य आणि प्रेम यांचा द्यावा. दलितांत जागृती निर्माण होत असलेल्या आजच्या काळी आम्ही या संदेशाचा सर्वत्र जगात प्रचार करू शकतो. आमचे शोषण झाले म्हणून त्याचा सूड उगवून नव्हे, तर समजूतदारपणाने आम्ही पाश्चिमात्यांवर विजय मिळवू शकतो. अशा आमच्या विजयाने स्वतः पाश्चिमात्यसुद्धा प्रसन्न होतील.

पाश्चिमात्य आज खऱ्या ज्ञानाकरिता पिपासायुक्ततेने चौफेर पाहत आहेत. अणुबाँबमुळे ते हताश झाले आहेत, होत आहेत. कारण अणुबाँबमुळे त्यांचाच नव्हे तर अखिल जगाचा नाश होणार आहे. जणू काय बायबलमधील भविष्यवाणी खरी होण्याच्या बेतात आहे. जगातली कुटिलता आणि पाप यांकडे जगाचे लक्ष वेधून त्यातून वाचवण्याचे काम आता तुमच्याकडे (भारताकडे) आहे.

आमचे अन्य गांधी-साहित्य :

- ☞ हिंदस्वराज्य
  गांधीजी
- ☞ मंगल-प्रभात
  गांधीजी
- ☞ आरोग्याची किल्ली
  गांधीजी
- ☞ गांधी जसे पाहिले जाणिले विनोबांनी
  विनोबा (सं. कांति शाह)
- ☞ 'हिंदस्वराज्य'चा संदेश
  वसंत पळशीकर, कांति शाह
- ☞ महात्माजींच्या सहवासातील काही आठवणी
  बाळकोबा भावे

परंधाम प्रकाशन, पवनार